# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सत्य

✦ अमरावती, बुधवार १७ जून २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ ८







## उद्धव ठाकरेंना मोठा झटका, 9 पैकी 7 खासदार सोडणार साथ; दोघे दिल्लीत पोहोचले



### पुन्हा राजकीय भूंकप !


**मुंबई/प्रतिनिधी :** शिवसेना पक्ष फुटीच्या धक्क्यातून सावरलेल्या उद्धव ठाकरे यांना आणखी एक मोठा धक्का बसणार आहे. २०२४ मध्ये निवडून आलेले पक्षाचे ९ पैकी ७ खासदार ठाकरेंची साथ सोडणार आहेत. त्यामुळे महाराष्ट्रात तिस-यांदा राजकीय भूकंप होणार आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, नउपैकी सात खासदार साथ सोडणार असून, यापैकी दोन खासदार दिल्लीतही पोहोचले आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे सात खासदार पक्षातून बाहेर पडल्यानंतर वेगळा गट तयार करणार आहेत आणि हा गट नंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत हा गट सामील होणार होणार आहे. माहितीनुसार, जे खासदार बंडखोरी करून बाहेर पडणार आहेत, त्यात अरविंद सावंत, संजय जाधव, संजय पाटील, नागेश बापूराव आष्टीकर, ओमप्रकाश राजे निंबाळकर, भाउसाहेब वाकचौरे आणि संजय देशमुख यांचा समावेश आहे.दरम्यान, पक्षात होत असलेली ही मोठी फूट रोखण्यासाठी खासदार अनिल देसाई आणि खासदार संजय राउत हे दिल्लीत आहेत. यात शिर्डी मतदारसंघाचे खा.भाउसाहेब वाकचौर आणि यवतमाळचे खासदार संजय देशमुख दिल्लीत पोहोचले आहेत. त्याचबरोबर इतर पाच खासदार रात्री दिल्लीत पोहोचणार आहेत. शिवसेनेचा ६०वा वर्धापन दिवस १९ जून रोजी होत आहे आणि त्यापूर्वीच हे खासदार शिंदेंच्या शिवसेनेत सामील होण्याची शक्यता आहे.

## एअरफोर्स अधिका-याच्या पत्नीवर बलात्कार

**■ हात धरून धार्मिक मंत्रांचे पठण, महिलेकडून विनवण्या!**

**■ धर्मांतरासाठी शोषणाच्या व्हायरल व्हिडिओने खळबळ**

**■ नागपुरात संतापाची लाट**




**नागपूर/प्रतिनिधी :** भारतीय वायुसेनेत नोकरी करणा-या जवानाच्या २४ वर्षीय पत्नीवर धर्मांतराचा दबाव टाकत तिच्यावर केलेल्या अत्याचाराचा व्हिडिओ समाजमाध्यमांवर व्हायरल झाल्याने संताप व्यक्त होत आहे. त्यात आरोपींकडून धर्मांतरासाठी दबाव टाकला जात असल्याचे स्पष्ट होत आहे. हीघटना समोर आल्यानंतर सोनेगाव पोलिसांनी या प्रकरणात आरोपी आरोपी अय्याज ताज मदारे (२६) आणि आमिन शेख या दोघांना हातकड्या टाकल्या. त्याच्या दुस-याच दिवशी हा व्हिडिओ व्हायरल झाल्याने खळबळ उडाली आहे. या प्रकरणातला तिसरा आरोपी हजरत मौलाना याच्या अटकेसाठी पोलीस मध्य प्रदेशातील छिंदवाडा जिल्ह्यातल्या तामीया येथे दाखल झाले आहे.

समाजमाध्यमांवर वेगाने व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये अय्याज हा महिलेचे हात धरून धार्मिक मंत्रांचे पठण करताना दिसत आहे. त्याने महिलेचे हात करकचून धरून ठेवले आहेत. त्यात महिला स्वतःची सुटका करण्यासाठी वारंवार विनवणी करत आहे. अस्वस्थ महिला रडकुंडीला- हिंदी भाषेमध्ये संभाषण असलेल्या या व्हिडिओत महिला अय्याज ला उद्देशून बोलताना तुला भांडण्याची खूप सवय आहे ना, हात सोडा ना सोड, अशा विनवण्या करताना दिसत आहे. महिला त्याच्या तावडीतून सुटण्यासाठी रडताना देखील दिसत आहे. मात्र तरीही तो तिचे हात बळबजरीने धरून ठेवत आहे. संपूर्ण व्हिडिओमध्ये ती महिला अस्वस्थ दिसत असून त्या व्यक्तीच्या कृतीला विरोध करताना दिसत आहे.

अखेर पोलिसांना सांगितली आपबिती-अखेर स्वतःची सुटका करून घेतलेल्या महिलेने सोनेगाव पोलिसांत केलेल्या तक्रारीनुसार यातला मुख्य आरोपी अयाज ताज मदारे हा शाळेच्या काळापासून तिचा परिचित आहे. अत्याचार करण्यापूर्वी त्याने धार्मिक मंत्रांचे पठण केले आणि तिच्या चेह-यावर वारंवार फुंकर घातली, असेही तिने केलेल्या तक्रारीत नमूद आहे. आपल्याला अनेकदा अय्याजने सरबत ➪(पान २ वर)

## राम मंदिरातून आता सोनेही गायब



**अयोध्या//वृत्तसंस्था :** राम मंदिरात दान स्वरुपात आलेला पैसा आणि वस्तूंमध्ये झालेल्या कोट्यवधींच्या कथित चोरी प्रकरणी सोमवारपासून तपासाला सुरुवात झाली असून देणगीची रक्कम गायब करणे आणि पुरावे नष्ट करणे, असा आरोप असलेल्या व्यक्ती एसआयटी तपासाच्या कक्षेत आहेत. माध्यमांतील काही वृत्तांमध्ये, देणगीतील दोन किलोची सोन्याची गदा आणि कोट्यवधींचे सोने-चांदीचे दागिनेही गायब झाल्याचा दावा करण्यात आला आहे. महत्वाचे म्हणजे, मंदिर ट्रस्टच्या पदाधिका-यांच्या जवळच्या व्यक्तींवरही आरोप होत आहेत. त्यांची आर्थिक स्थिती अचानक अनेक पटींनी सुधारली आहे. या सर्वांची सखोल चौकशी होउ शकते. दरम्यान, या संपूर्ण प्रकरणावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि विश्व हिंदू परिषद यांनी अद्याप भाष्य केलेले नाही. ➪(पान २ वर)

### 2 वर्षांपूर्वी रामलल्ला आणि तिन्ही भावांचे सोन्याचे मुकुट गायब झाले होते

दरवर्षी श्रावण महिन्यातील झोका मेळ्याच्या वेळी भगवान रामाचा त्यांच्या तिन्ही भावांसह -भरत, लक्ष्मण आणि शत्रुघ्न यांच्यासोबत विशेष श्रृंगार केला जातो. परंपरेनुसार, झुलन उत्सवावर चारही भावांना सोन्याचे मुकुट परिधान केले जातात. त्यानंतर त्यांना झोक्यावर विराजमान करून भक्तांना दर्शन दिले जाते. दोन वर्षांपूर्वीची गोष्ट आहे, रामलल्ला आणि त्यांच्या तिन्ही भावांचे सोन्याचे मुकुट गायब झाले.अनेक महिने मुकुटाचा पत्ता लागला नाही. श्रावण मेळ्यादरम्यान रामलल्लाच्या पुजा-यांनी वारंवार मुकुटाची मागणी केल्यावर शोधमोहीम सुरू झाली. शोधमोहिमेत मंदिराच्या आवारात ट्रस्टच्या एका पदाधिका-याच्या कपाटातून मुकुट सापडले. हे मुकुट गाझियाबाद येथील एका भाविकाने आपल्या आईचे दागिने विकून रामलल्लाला अर्पण केले होते.

## दहशतवादी हल्ल्यांचा कट उधळला



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** दिल्ली पोलिसांनी मंगळवार दि. १६ जून रोजी दिल्ली-एनसीआर भागात सक्रिय असलेल्या आणि पाकिस्तानचा पाठिंबा असलेल्या एका दहशतवादी-गुन्हेगारी टोळीचा पर्दाफाश केला. या कारवाईत सीमेपलीकडून शस्त्रे आणि अंमली पदार्थांची तस्करी केल्याचा आरोप असलेल्या ७ जणांना अटक करण्यात आली आहे.ही टोळी पाकिस्तानात असलेले आणि गँगस्टरमधून दहशतवादी बनलेले शाहझाद भट्टी आणि अजमल गुज्जर यांच्याद्वारे चालवली जात होती. त्यांच्यावर पाकिस्तानची गुप्तहेर संघटना आयएसआयचा वरदहस्त असल्याचे मानले जाते. अधिका-यांनी दिलेल्या माहितीनुसार, हे आरोपी पंजाब सीमेवर ड्रोनद्वारे पाडण्यात आलेली बेकायदेशीर शस्त्रे, दारूगोळा आणि अंमली पदार्थ मिळवून ते दिल्ली-एनसीआरमध्ये पुरवण्याचे काम करत होते. या कारवाईदरम्यान पोलिसांनी ५ अत्याधुनिक सेमी-ऑटोमॅटिक पिस्तूल, ४१ जिवंत काडतुसे, ७ मोबाईल फोन (ज्यामध्ये भट्टी आणि गुज्जर यांच्याशी संबंधित संशयास्पद चॅट्स आणि व्हाईस नोट्स आहेत), १ एसयूव्ही कार आणि अंमली पदार्थ, तसेच बेकायदेशीर शस्त्रांच्या विक्रीतून मिळालेला पैसा हस्तांतरित करण्यासाठी वापरण्यात आलेल्या अनेक बँक खात्यांची माहितीही पोलिसांनी जप्त केली आहे.

■ **अटक करण्यात आलेले आरोपींची नावे-** अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे अनस त्यागी, मोहित उर्फ योगी, दीपक ग्रोला, आरिफ उर्फ प्रधान, जतन आणि साबीर (सर्व राहणार गाझियाबाद) आणि करणवीर सिंग(राहणार पंजाब)अशी आहेत. हे सर्व २६ ते ३८ वर्षे वयोगटातील असून त्यांच्यावर खून, खुनाचा प्रयत्न, दरोडा, तसेच आर्म्स अ‍ॅक्ट (शस्त्र कायदा) आणि एनडीपीएस कायद्यांतर्गत गुन्हे दाखल असल्याचे पोलिसांनी सांगितले.

■ **सोशल मीडियाद्वारे तरुणांची भरती-**दिल्ली पोलिसांच्या विशेष पथकाने दिलेल्या ➪(पान २ वर)

## महिला बचत गटांना सरकार देणार 1 हेक्टर जागा

**नागपूर/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार राज्यातील महिला बचत गटांना व महिलांच्या को-ऑपरेटिव्ह संस्थांना रोजगारनिर्मिती करण्यासाठी महसूल विभागाकडून प्रत्येक बचत गटाला एक हेक्टर जागा पाच वर्षांच्या लीजवर देण्यात येणार आहे.



महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी याची घोषणा केली. या बचत गटांना डीपीसी किंवा स्थानिक खनिकर्म निधीतून एक लाख रुपयांचे अनुदानही देण्यात येणार आहे. याबाबत चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, महिला बचत गटांनी या एक हेक्टर जागेमध्ये ग्रासलँड डेव्हलपमेंट करायचे आहे. चारा किंवा बांबू लागवड करायची आहे. नेपियर गवत लावायचे आहे. आज जर एखाद्या बचत गटाला आम्ही अडीच एकर जागा, म्हणजेच एक हेक्टर जागा दिली तर त्यातून होणारे वार्षिक उत्पन्न चार ते पाच लाख रुपये असेल. हे उत्पन्न पूर्णपणे महिला बचत गटाला मिळेल. सरकार त्यातून कोणताही हिस्सा घेणार नाही. त्या चा-यामधून किंवा इतर उत्पादनातून जो काही पैसा मिळेल, तो संपूर्ण पैसा बचत गटालाच मिळेल. एकंदरीत एका बचत गटामध्ये दहा महिलांना रोजगारनिर्मिती करण्यासाठी महसूल खात्याने हा मोठा प्रकल्प हाती घेतलेला आहे असं त्यांनी सांगितले. तसेच महसूल खात्याच्या सर्व पडीत जमिनी आता पडीत राहू नयेत, त्यावर अतिक्रमण होउ नये यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या जमिनी गावागावांमध्ये, रानावनांमध्ये आहेत आणि त्यावर अतिक्रमण होत आहे. त्यामुळे या जमिनी सुरक्षित ठेवण्यासाठी आणि महिला बचत गटांना रोजगार देण्यासाठी सरकारने ही पालिसी आणलेली आहे. प्रत्येक महिला बचत गटाला आम्ही अडीच एकर जागा देणार आहोत, ज्या ठिकाणी जागा उपलब्ध आहे. ही जागा देउन त्यांच्यासाठी रोजगारनिर्मितीचे मोठे साधन आम्ही ➪(पान २ वर)

## रूग्णवाहिके अभावी घरातच प्रसुती; महिला दगावली


**चंद्रपूर/प्रतिनिधी-**बाळाच्या आगमनाच्या आनंदाने उजळलेले घर काही क्षणांतच शोकसागरात बुडाले. एका गोंडस मुलीला जन्म देताच २५ वर्षीय संगीता गेडाम यांचा अतिरिक्त रक्तस्त्रावामुळे मृत्यू झाला आणि नवजात चिमुकलीच्या डोक्यावरून आईचे छत्र कायमचे हरपले. जिवती तालुक्यातील दुर्गम घोडणकप्पी गावात घडलेली ही घटना केवळ वैद्यकीय गुंतागुंत नव्हे तर रस्ते आणि आरोग्य सुविधांच्या अभावाने आजही जीव जात असल्याचे विदारक वास्तव



अधोरेखित करणारी आहे. घोडणकप्पी गावाला आजही बारमाही रस्ता नसल्याने रुग्णवाहिका मुख्य रस्त्यापर्यंतच येउ शकली. रुग्णवाहिका उपलब्ध न झाल्याने आणि वेळेत उपचार न मिळाल्याने संगीता यांना जीव गमवावा लागला. रविवारी पहाटे संगीता यांना प्रसूती वेदना सुरू झाल्या. कुटुंबीयांनी त्यांना तातडीने रुग्णालयात नेण्याचा प्रयत्न केला.परंतु गावाकडे जाणारा रस्ता अत्यंत खराब असल्याने शासकीय रुग्णवाहिका मुख्य रस्त्यापर्यंतच येउ शकली. मदतीसाठी धावलेल्या गावातील महिलांनी त्यांना डोंगर उतरवून रस्त्यापर्यंत आणण्याचा प्रयत्न केला; मात्र, वेदना असह्य झाल्याने त्यांना पुन्हा घरी आणावे लागले. घरातच झालेल्या प्रसूतीत संगीताने एका गोंडस मुलीला जन्म दिला. कन्याप्राप्तीचा आनंद साजरा करण्याआधीच संगीता यांना प्रसूतीनंतर अतिरक्तस्त्राव सुरू झाला. माहिती मिळताच आरोग्य विभागाचे पथक गावात पोहोचले आणि उपचार सुरू केले. प्रकृती गंभीर होत असल्याने त्यांना खाजगी मालवाहू वाहनातून शंकरपठार येथे उभ्या असलेल्या रुग्णवाहिकेपर्यंत नेण्यात आले. मात्र, उपचारासाठी रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच वाटेत त्यांची प्राणज्योत मालवली.

## पंतप्रधान मोदी यांनी 16 महिन्यांनंतर घेतली डोनाल्ड ट्रम्प यांची भेट

### G-7 परिषदेत 5 मिनिटे चर्चा केली; मेलोनी मोदींना म्हणाल्या- आपण इंस्टाग्रामवर सर्वात प्रसिद्ध



### हस्तांदोलनाने जागतिक वर्तुळाचे वेधले लक्ष

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी फ्रान्समधील एव्हियान येथे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची भेट घेतली. दोन्ही नेत्यांमधील ही भेट १६ महिन्यांनंतर झाली. पंतप्रधान मोदी यांनी एव्हियान येथे जी७ शिखर परिषदेच्या आउटरीच सत्रात सहभाग घेतला, तिथे त्यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी हस्तांदोलन केले. या सत्रादरम्यान दोन्ही नेते एकमेकांच्या शेजारी बसले होते. जी ७ शिखर परिषदेच्या निमित्ताने दोन्ही नेत्यांची संपूर्ण द्विपक्षीय बैठक उद्या सायंकाळी ६.३० वाजता होणार आहे. फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रान यांनी ➪(पान २ वर)

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** फ्रान्समधील एव्हियान येथे झालेल्या जी-७ शिखर परिषदेदरम्यान पंतप्रधान मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांची भेट झाली. त्यांनी सुमारे पाच मिनिटे संवाद साधला आणि बैठकीदरम्यान ते एकत्र बसलेले दिसले.ही बैठक १६ महिन्यांनंतर झाली. जी-७ च्या संपर्क सत्रातही पंतप्रधान आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष एकत्र बसलेले दिसले होते. त्यांची शेवटची भेट फेब्रुवारी २०२५ मध्ये व्हाईट हाउसमध्ये झाली होती.१७ जून रोजी सायंकाळी ६:३० वाजता दोन्ही नेते व्यापार करारावर चर्चा करण्याची शक्यता आहे. व्हाईट हाउसच्या निवेदनानुसार, भारत आणि अमेरिका यांच्यातील शुल्क, गुंतवणूक आणि सामरिक भागीदारीशी संबंधित मुद्द्यांवर चर्चा होण्याची शक्यता आहे.मंगळवारी दुपारी जी-७ शिखर परिषदेसाठी एव्हियान येथे आगमन झाल्यावर फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रान यांनी मोदींचे स्वागत केले. जी-७ देशांच्या राष्ट्रप्रमुखांनी एक गट छायाचित्रही काढले.दरम्यान, मोदी आणि इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांनीही संवाद साधला. मेलोनी मोदींना म्हणाल्या, 'पुन्हा भेटून आनंद झाला. आपण इंस्टाग्रामवर सर्वात प्रसिद्ध आहात.'खरं तर, मोदींनी गेल्या महिन्यात पाच देशांचा दौरा केला, जिथे त्यांनी रोममध्ये पंतप्रधान मेलोनी यांना 'मेलोडी' कँडी भेट दिली. याचा एक व्हिडिओ व्हायरल झाला होता.भागीदार देश म्हणून या शिखर परिषदेतील भारताचा हा १३ वा सहभाग आहे. पंतप्रधानांचा या जागतिक मंचावरील सहभाग सातव्यांदा आहे. पंतप्रधान मोदी यांनी हजेरी लावलेले सत्र हे 'नवीन भागीदारी निर्माण करणे आणि आंतरराष्ट्रीय एकतेचे नूतनीकरण करणे' या संकल्पनेवर आधारित एक उच्चस्तरीय कार्यसत्र होते. या सत्राला जी-७ देशांचे नेते, भागीदार देशांचे नेते आणि जागतिक बँक व आफ्रिकन विकास बँकेचे प्रमुख प्रतिनिधी उपस्थित होते.



*ग्रुप फोटो सेशन दरम्यान मोदींनी इटलीचे पंतप्रधान मेलोनी यांची भेट घेतली. दोन महिन्यांतील ही त्यांची दुसरी भेट आहे. यापूर्वीची भेट २० मे रोजी रोममध्ये झाली होती.*

## बोगस खत कारखान्यावर छापा; 22 लाखांची खते जप्त

**अहिल्यानगरः** कृषी विभागाच्या पथकाने नेवासा तालुक्यातील शिंगवेतुकाई एमआयडीसीमधील खताच्या बोगस कारखान्यावर छापा टाकून २१ लाख ८० हजार रुपये किंमतीचा बेकायदेशीर साठा जप्त केला. यासंदर्भात शासनाची फसवणूक केल्याच्या आरोपावरून कंपनीच्या मालकावर सोनई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.कृषी विभागाचे जिल्हाध्यक्ष कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांनी या कारवाईची माहिती दिली. काल, सोमवारी रात्री ९ च्या सुमारास सुरू केलेली कारवाई आज, मंगळवारी पहाटे २.३० पर्यंत सुरू होती. त्यामध्ये वेगवेगळ्या कंपनीच्या नावाने तयार करण्यात ➪(पान २ वर)



## नाकेबंदीत अडकलेल्या जहाजावर भारतीयाचा मृत्यू

**तेहरान/वृत्तसंस्था :** मध्य पूर्वेतील तणावादरम्यान इराणजवळ एका भारतीय नाविकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली असून एमटी सेलेस्टियल या ऑइल टँकरवर असलेल्या निशांत उर्थनाथन या भारतीय क्रू मेंबरची प्रकृती अचानक खालावली होती. मात्र वेळेत वैद्यकीय



उपचार न मिळाल्यामुळे त्याचा मृत्यू झाला. या घटनेमुळे आंतरराष्ट्रीय सागरी क्षेत्रातील तणाव आणि भारतीय नाविकांच्या सुरक्षेचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ११ जून रोजी निशांत यांची प्रकृती खालावली आणि त्यानंतर त्यांचा मृत्यू झाला. जहाजावर मृतदेह ठेवण्यासाठी कोणत्याही प्रकारचे कोल्डस्टोरेज नसल्यामुळे त्यांच्या सहकारी कर्मचा-यांनी अत्यंत हृदयद्रावक पाउल उचलले. निशांत यांचा मृतदेह सडू नये म्हणून सहका-यांनी तो प्लास्टिकमध्ये गुंडाळला आणि त्यावर पाण्याच्या थंड बाटल्या ठेवल्या. सोशल मीडियावर या घटनेचा एक व्हिडिओही समोर आला होता ज्यामध्ये एक सहकारी कर्मचारी आजारी निशांत यांना जेवण भरवण्याचा प्रयत्न करताना दिसत होता. ➪(पान २ वर)

## कौटुंबिक वाटणीची जमीन मोजणी अवघ्या 200 रुपयांत

### 90 अन् 30 दिवसांचा नवा 'डेडलाईन' फार्म्युला जाहीर



**मुंबई/प्रतिनिधी :** राज्य शासनाने जमीन मोजणीच्या शुल्क व वर्गीकरणात मोठे बदल करत सर्वसामान्यांना दिलासा दिला आहे. आता कुटुंबातच झालेल्या वाटणीची मोजणी करावयाची असल्यास २०० रुपयात होईल. तर 'नियमित मोजणी' ९० दिवसांत आणि 'दृतगती मोजणी' ३० दिवसांत पूर्ण करणे बंधनकारक करण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेवरून महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. यामुळे मोजणी प्रक्रियेतील उशीर आणि भ्रष्टाचाराला पूर्णपणे आळा बसेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. या निर्णयानुसार ग्रामीण भागात २ हेक्टरपर्यंत नियमित मोजणीसाठी २,००० रुपये तर शहरी भागात १ हेक्टरपर्यंत ३,००० रुपये शुल्क निश्चित करण्यात आले आहे.

**कौटुंबिक वाटणी मोजणी :** कोर्ट वाटप किंवा संमतीने होणा-या मोजणीसाठी प्रति पोटहिस्सा अवघे २०० रुपये शुल्क.

**ग्रामीण मोजणी दर :** २ हेक्टरपर्यंत नियमित मोजणीसाठी २,००० रुपये, तर दृतगतीसाठी ८,००० रुपये शुल्क.

**शहरी मोजणी दर :** १ हेक्टरपर्यंत नियमित मोजणीसाठी ३,००० रुपये, तर दूतगतीसाठी १२,००० रुपये शुल्क.

**अर्जदार मोजणीच्या दिवशी गैरहजर राहिल्यास मूळ फीच्या ५०% किंवा कमाल १०,००० रूपये दंड**

**पुनर्भेट शुल्क झटका :** अर्जदार मोजणीच्या दिवशी गैरहजर राहिल्यास मूळ फीच्या ५०% किंवा कमाल १०,००० रुपये दंड. ➪(पान २ वर)

## मान्सूनला विलंब, विदर्भात 25 जूनला सक्रिय होईल?

**नागपूर/प्रतिनिधी :**धो-धो मान्सूनच्या प्रतीक्षेत असलेल्या विदर्भ व राज्यातील नागरिकांसाठीही काहीसी निराशाजनक बातमी आहे. सध्या तळकोकणात खोळंबलेला मान्सून पुन्हा सक्रिय होण्यास आठवडा लागण्याची शक्यता आहे. दुसरीकडे विदर्भाला पाउस देणारी बंगालच्या उपसागरातील शाखासुद्धा स्थिरावली असल्याने इकडेही पावसाला विलंब होण्याचा अंदाज आहे. निरीक्षणानुसार विदर्भात २५ जून ते १ जुलैपर्यंत मान्सून सक्रिय होण्याची शक्यता हवामान तज्ज्ञांनी वर्तवली आहे. हवामान विभागाचे माजी अधिकारी माणिकराव खुळे यांनी दिलेल्या माहितीनुसार विदर्भाला पाउस देणारी बंगाल उपसागरीय मान्सूनची शाखा ही सध्याच्या पूरक प्रणाली अभावी सध्याच्या आठवड्यात काहीशी स्थिरावून धिम्या गतीने वाटचाल करू शकते. ही शाखाही २५ जून ते १ जुलै दरम्यानच्या आठवड्यात सक्रिय होवून तेथे मान्सूनच्या पावसाची शक्यता जाणवते.दुसरीकडे कोकणापर्यंत ८ जूनलाच धडकलेल्या मान्सूनची गती नंतर मंदावली असून पुढेही प्रगती दिसून येत नाही. वायव्येकडून वाहणा-या उष्ण वा-याचा तसेच अरबी समुद्रात असणारी ➪(पान २ वर)




# ४७ लाखांच्या बिलासाठी २५ लाखांची मागीतली लाच

## मनपा प्रभारी पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.सचिन बोंद्रे ताब्यात!

## लाचलुचपत विभागाची मोठी कारवाईः

अमरावती/प्रतिनिधीः- महापालिका अंतर्गत श्वान नियंत्रण व लसीकरणाच्या कामाचे प्रलंबित बिल मंजूर करण्यासाठी तब्बल २५ लाख रुपयांची लाच मागून, तडजोडीअंती १ लाख रुपये लाच स्वीकारण्यास सहमती दर्शविणाऱ्या अमरावती महानगरपालिकेच्या प्रभारी पशुवैद्यकीय अधिकाऱ्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अखेर ताब्यात घेतले आहे. सचिन छगनअप्पा बोंद्रे (वय ४७ वर्ष, रा. कलोती नगर, अमरावती, मूळ रा. चिखली, जि. बुलढाणा) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या लाचखोर लोकसेवकाचे नाव आहे.

तक्रारदार यांच्या संस्थेने अमरावती महानगरपालिका अंतर्गत श्वान उत्पत्ती, नियंत्रण, निर्बीजीकरण आणि लसीकरण कार्यक्रमाचे कंत्राट पूर्ण केले होते. या केलेल्या विविध कामांची एकूण ४७ लाख रुपयांची देयके मंजूर करायची होती. ही बिलं टप्प्याटप्प्याने मंजूर करून देण्यासाठी आरोपी सचिन बोंद्रे याने तक्रारदाराकडे २५ लाख रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. त्यापैकी पहिला टप्पा म्हणून २ लाख रुपये देण्याचे ठरले होते. या प्रकरणी तक्रारदाराने ८ जून २०२६ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती येथे रीतसर तक्रार नोंदवली होती. तक्रारीच्या अनुषंगाने १० जून २०२६ रोजी पंचांसमक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी करण्यात आली. त्यामध्ये आरोपी सचिन बोंद्रे याने पहिल्या टप्प्यातील २ लाख रुपयांच्या मागणीवर तडजोड करत १ लाख रुपये लाच घेण्याचे मान्य केले.त्यानंतर ११ जून २०२६ रोजी लाचेचा सापळा रचण्यात आला होता. यावेळी आरोपी बोंद्रे हा आपले शासकीय वाहन न वापरता तक्रारदाराच्या दुचाकीवर मागे बसून मनपा कार्यालयातून बाहेर पडला. दोघेही पंचवटी चौकाकडे जात असताना, रस्त्यातच सचिन



बोंद्रे याला काहीतरी संशय आला. संशय आल्यामुळे त्याने लाचेची रक्कम न स्वीकारता, रस्त्यातच दुचाकीवरून खाली उतरून आपले शासकीय वाहन बोलावले आणि त्यात बसून तो निघून गेला.

### अखेर घरातून ठोकल्या बेड्या-

आरोपीला संशय आल्याने तो आता लाचेची रक्कम स्वीकारणार नसल्याची खात्री तक्रारदाराला झाली. त्यामुळे आज तक्रारदाराने दिलेल्या पुरवणी निवेदनावरून एसीबीच्या पथकाने थेट कारवाई करत आरोपी सचिन बोंद्रे याला त्याच्या राहत्या घरातून ताब्यात घेतले. लाचेची मागणी निष्पन्न झाल्याने त्याच्याविरुद्ध कोतवाली पोलीस स्टेशन येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. ही धडक कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परिक्षेत्राचे पोलीस अधीक्षक बापू बांगर , अपर पोलीस अधीक्षक सचिन्द्र शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

, अमरावती, अकोला, वाशीम, यवतमाळ आणि बुलढाणा जिल्ह्यातील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय अधिकारी किंवा कर्मचाऱ्याने, अथवा त्यांच्या वतीने कोणत्याही खाजगी व्यक्तीने शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर शुल्काव्यतिरिक्त लाचेची मागणी केल्यास तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती येथे संपर्क साधावा. तक्रारदाराच्या तक्रारीवर तातडीने कारवाई केली जाईल,असे आवाहन करण्यात आले आहे.

### महापालिकेत भ्रष्टाचाराचा कळस- नगरसेवक अनिल अग्रवाल

'महानगरपालिकेचे प्रभारी पशुवैद्यकीय अधिकारी सचिन बोंद्रे याला लाचखोरीच्या प्रकरणात एसीबीने रंगेहाथ पकडणे, हे महापालिकेतील प्रचंड आणि उघड-उघड सुरू असलेल्या भ्रष्टाचाराचे जळजळीत उदाहरण आहे. मी मागील आमसभेतच हा अधिकारी आणि संपूर्ण विभाग किती भ्रष्ट आहे, हे पुराव्यानिशी सभागृहासमोर मांडले होते. आज माझ्या त्या दाव्यावर अधिकृतपणे शिक्कामोर्तब झाले आहे,' अशी घणाघाती आणि झणझणीत प्रतिक्रिया नगरसेवक अनिल अग्रवाल यांनी दिली आहे. अग्रवाल यांनी पुढे बोलताना प्रशासकीय अनागोंदीवर तीव्र संताप व्यक्त केला. ते म्हणाले, ' जनतेमधून निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना हा अधिकारी कवडीची किंमत देत नव्हता. त्यांची एकूणच कार्यपद्धती अत्यंत आक्षेपार्ह आणि संशयास्पद होती. श्वान नियंत्रण आणि निर्बीजीकरणासारख्या जनहितार्थ कामाच्या ४७ लाख रुपयांच्या बिलासाठी तब्बल २५ लाखांची लाच मागण्याची हिंमत या अधिकाऱ्याची होतेच कशी? हा महापालिकेच्या इतिहासातील लाचखोरीचा अत्यंत लाजिरवाणा प्रकार आहे.'

या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून या रॅकेटमध्ये महापालिकेतील आणखी कोणते मोठे मासे अडकले आहेत, शोधून काढण्याची आणि बोंद्रेवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणीही नगरसेवक अनिल अग्रवाल यांनी या प्रसंगी केली आहे.

शेतकरी नेते रविकांत तुपकर यांच्या

# कर्जमुक्ती आंदोलनास किसान सभेचा पाठिंबा

**अमरावती/प्रतिनिधीः-** कर्जमुक्ती योजना २०२६ चे पार्श्वभूमीवर ,सरसकट व विनाअट कर्जमाफी असावी आणि शेतकऱ्यांच्या पिक विमा हक्कासाठी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे नेते रविकांत तुपकर १५ जून पासून बुलढाणा येथे त्यांनी निवासस्थानी आमरण उपोषण आरंभले आहे.

महाराष्ट्र राज्य किसान सभेच्या प्रतिनिधी मंडळाने उपोषण स्थळी बुलढाणा येथे १६ जून रोजी भेट दिली आणि त्यांना पाठिंबा घोषित केला .सोबतच कर्जमुक्तीच्या या आंदोलन लढाईमध्ये सहभागी असल्याचे सांगितले. सदर प्रतिनिधी मंडळामध्ये कॉ.अशोक सोनारकर ,सरचिटणीस कॉ. नयन गायकवाड अकोला ,कॉ भीमराव गवई बुलढाणा ,सागर दुर्योधन अमरावती यांचा समावेश होता. आंदोलनाचे गांभीर्य व शासनाच्या वतीने तातडीने हस्तक्षेपाची भूमिका महाराष्ट्र शासनाला कळवण्याकरीता १७ जून ला



१२ वा. अमरावती विभागीय कार्यालयासमोर संयुक्त किसान मोर्चा च्या वतीने निदर्शने व निवेदन देण्याचे ठरले आहे.

सदर आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन संयुक्त किसान मोर्चा च्या सर्व घटक संघटनांच्या वतीने निमंत्रक अशोक सोनारकर, सतीश चौधरी महादेवराव गारपवार, डॉ. ओमप्रकाश कुटेमाटे ,श्याम शिंदे ,महेश देशमुख, प्रा.साहेबराव विदळे , निळकंठ ढोके ,जे. एम .कोठारी ,सुभाष पांडे, सुनील देशमुख ,अश्विन चौधरी, डॉ. प्रफुल्ल गुडधे, सागर दुर्योधन सुनील घटाळे, संजय मंडवधरे , उमेश बनसोड यांनी केले आहे.

## १ व १० वरिल उर्वरित

### एअरफोर्स अधिका-याच्या पत्नीवर

आणि फळांच्या रसातून गुंगी आणणारा द्रवपदार्थ प्यायला दिला. काही घटनांच्या वेळी आपण अर्धवट शुद्धीवर असताना आपल्याला जबरदस्तीने धर्मांतर सोहळ्यात सहभागी करून घेतले गेले आणि इच्छेविरुद्ध धर्मांतर केले. त्यानंतर आपल्यावर बलात्कारही करण्यात आला, असा आरोपीही महिलेने दिलेल्या तक्रारीत केला आहे. मदारे आणि त्याच्या साथीदारांनी हे कृत्य करताना खंडणी आणि जबरदस्तीने धर्मांतर केल्याचा आरोप करत या महिलेने सोनेगाव पोलिसांकडे धाव घेतल्यानंतर काही दिवसांनीच हा व्हिडिओ समोर आल्याने संताप व्यक्तहोत आहे.

### राम मंदिरातून आता

या प्रकरणी, बँकेने नियुक्तकेलेल्या एजन्सीच्या कर्मचा-यांनीच ही चोरी केल्याचा आरोप मंदिर ट्रस्टचे कार्यालय प्रभारी प्रकाश गुप्ता यांनी केला आहे. तसेच ट्रस्टच्या देखरेख टीमचा निष्काळजीपणाही समोर आला आहे. दान मोजणा-या ४४ कर्मचा-यांची चौकशी केली जाउ शकते. यात ४० बँक आणि एजन्सीचे तर ४-५ ट्रस्टचे लोक आहेत. बाबरी खटल्याचे पक्षकार राहिलेले इक्बाल अन्सारी यांनीही निष्पक्ष तपासाणीची मागणी केली आहे. महत्वाचे म्हणजे, ट्रस्टचे सरचिटणीस चंपत राय यांच्या जवळच्या, राम शंकर यादव या माजी ड्रायव्हरवर, सर्वात गंभीर आरोप आहेत. त्याची मालमत्ता कोट्यवधींवर पोहोचली आहे.

### दहशतवादी हल्ल्यांचा कट

माहितीनुसार, मे महिन्यात मिळालेल्या गुप्तचर माहितीवरून असे समोर आले होते की, भट्टी आणि गुज्जर हे सोशल मीडिया प्लॅटफार्मद्वारे तरुणांना झटपट पैसा आणि गुन्हेगारी जगतातील ग्लॅमरचे आमिष दाखवून दिल्ली-एनसीआरमध्ये हल्ले घडवून आणण्याचा कट रचत होते. या गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी सर्वात आधी मोहित उर्फ योगी याला अटक केली. त्याच्याकडून बेकायदेशीर शस्त्रे आणि पाकिस्तानातील हँडलर्सच्या संपर्कात असल्याचे पुरावे जप्त करण्यात आले होते.

### महिला बचत गटांना

तयार करून देणार आहोत. देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राच्या जनतेसाठी रोजगारनिर्मितीचा एक मोठा संकल्प केला होता. त्या संकल्पाला आम्ही आता पुढे नेत आहोत आणि राज्यातील महिला बचत गटांना तसेच महिलांच्या को-ऑपरेटिव्ह सोसायट्यांना हा प्रकल्प देत आहोत असं बावनकुळे यांनी म्हटलं.

### हस्तांदोलनाने जागतिक वर्तुळाचे

आयोजित केलेल्या एका कार्यक्रमासाठी जागतिक नेते एकत्र जमले असताना, दोन्ही नेत्यांमध्ये हा संक्षिप्त संवाद झाला. फेब्रुवारी २०२५ मध्ये पंतप्रधानांच्या वाशिंग्टन भेटीनंतर, ट्रम्प यांनी आपल्या दुस-या कार्यकाळाला सुरुवात केल्यापासून दोन्ही नेत्यांमधील ही पहिलीच समोरासमोरची भेट होती. भारत-अमेरिका संबंधांसाठी हा संवाद एका महत्त्वाच्या वेळी झाला आहे.

### बोगस खत कारखान्यावर

आलेले बोगस खताच्या २ हजार ३४ गोण्या जप्त करण्यात आल्या. त्याची किंमत २१ लाख ८० हजार ४८० रुपये आहे. बोगस व अनधिकृत खत निर्मिती करणा-या कारखान्यावरील छाप्यामुळे हंगामाच्या पार्श्वभूमीवर खळबळ उडाली आहे. अधिक तपास सोनई पोलीस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक अनिल मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुरज मेढे करत आहेत.जिल्हा परिषदेचे मोहीम अधिकारी निलेश अभंग यांना शिंगवेतुकाई येथील कृषी गौरव फर्टीलायझर कंपनीमध्ये बेकायदेशीर खत निर्मिती व साठवणूक होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती.

### नाकेबंदीत अडकलेल्या जहाजावर

**अमेरिकन मरीनने घेतली होती जहाजाची झडती**

ज्या एमटी सेलेस्टियल या व्यावसायिक जहाजावर निशांत यांचा मृत्यू झाला, ते जहाज गेल्या महिन्यापासून वादात सापडले होते. मे २०२६ मध्ये स्ट्रेट ऑफ होर्मुजमध्ये अमेरिकेची नाकेबंदी तोडल्याच्या संशयावरून अमेरिकन मरीनने हे जहाज रोखले होते. त्यानंतर अमेरिकन सैन्याने संपूर्ण जहाजाची कसून झडती घेतली होती. २० मे रोजी युएस सेंट्रल कमांडने जारी केलेल्या अधिकृत निवेदनानुसार, झडती पूर्ण झाल्यानंतर या जहाजाला सोडण्यात आले होते, पण त्यांना त्यांचा मार्ग बदलायला सांगितला होता. या नाकेबंदी आणि आंतरराष्ट्रीय वादामुळेच जहाजाला वेळेत बंदरावर पोहोचता आले नाही आणि निशांत यांना वेळेवर उपचार मिळू शकले नाहीत.

### कौटुंबिक वाटणीची जमीन

**भूमापक गैरहजर राहिल्यास सवलत :** मोजणीच्या दिवशी अधिकारी अनुपस्थित राहिल्यास अर्जदाराला कोणतेही पुनर्भेट शुल्क नाही.

**गुंठेवारी मोजणी :** महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियमांतर्गत येणा-या भूखंडांच्या मोजणीसाठी दीडपट शुल्क. **उच्चतपासणी फी** : कनिष्ठ भूमापकाच्या मोजणीवर आक्षेप असल्यास तपासणीसाठी ३ ते ५ पट अधिक शुल्क. **सरकारी संस्थांना सवलत :** निमशासकीय संस्थांना मोजणी दरात ५०%, तर पूर्णत? शासकीय जमिनींना ७५% सवलत मिळेल.

### मान्सूनला विलंब, विदर्भात

प्रत्यावर्ती वा-याची प्रणाली मान्सूनच्या वाटचालीस अडथळा ठरत आहे. सध्याच्या निरीक्षणानुसार जागेवर खोळंबलेला मान्सून मुंबईपर्यंत पोहोचण्यास कदाचित आठवड्याभराचा कालावधी लागू शकतो. २३ जूनला वातावरणात बदल होवून मान्सून ला पुढे सरकण्यास सक्रियता मिळण्याची शक्यता जाणवते. २५ जूननंतरच मुंबईत चांगल्या पद्धतीने सेट झालेला मान्सून सह्याद्री ओलांडून मध्य महाराष्ट्राच्या अंतर्गत भागात हजेरी लावू शकतो.

विदर्भात चार दिवस उष्णतेची लाट

मान्सूनपूर्व पावसाने चार दिवस गारवा मिळाल्यानंतर विदर्भ पुन्हा उष्ण लाटेच्या सावटात आला आहे. सोमवारपर्यंत वर्धा व गोंदियाची होरपळ केल्यानंतर आता उष्णतेचा प्रभाव इतरही जिल्ह्यात वाढला आहे. मंगळवारी गोंदियात ४२ अंश तापमानाची नोंद झाली असून ते सरासरीपेक्षा ६.१ अंशाने अधिक आहे. ब्रम्हपुरीत सर्वाधिक ४२.२ अंश तापमान असून सरासरीच्या तुलनेत ५.९ अंशाने अधिक आहे.

### पाण्याच्या टाकीत सापडलेल्या

तपास सुरू केला होता.

दरम्यान, गुन्हे शाखा आणि नागपुरी गेट पोलिसांनी शहर व ग्रामीण भागातील बेपत्ता व्यक्तींची माहिती गोळा केली. तपासादरम्यान ३१ मार्च २०२६ रोजी बेपत्ता झालेल्या अब्दुल रियाज अब्दुल अनीस (रा. अलीम नगर, अमरावती) याच्याबाबत संशय निर्माण झाला. त्यानंतर करण्यात आलेल्या डीएनए चाचणीत पाण्याच्या टाकीत सापडलेला मृतदेह अब्दुल रियाजचाच असल्याचे निष्पन्न झाले.मात्र मृतदेहाची ओळख पटल्यावरही आरोपींचा कोणताही ठोस सुगावा पोलिसांच्या हाती लागत नव्हता. अशा परिस्थितीत गुन्हे शाखेने गुप्त माहितीदारांचे जाळे, सीसीटीव्ही फुटेज, मोबाईल लोकेशन आणि इतर तांत्रिक पुराव्यांचा आधार घेत तपासाची चक्रे वेगाने फिरवली.तपासात धक्कादायक माहिती समोर आली. मृतकाची पत्नी नसरीन बानो हिने तिचा साथीदार शेख ईकराम शेख चांद याच्या मदतीने कट रचल्याचे उघड झाले. दोघांनी अब्दुल रियाज याला त्याच्या वडिलांच्या घरातून बोलावून घेतले. त्यानंतर त्याचा खून करून मृतदेह ऑटो रिक्षामधून नेऊन वजीर पटेल यांच्या बंद दवाखान्याच्या छतावरील पाण्याच्या टाकीत फेकल्याची कबुली आरोपींनी दिली.अटक आरोपीमध्ये शेख ईकराम शेख चांद (वय २७), व्यवसाय – चालक, रा. सहारा नगर, अमरावती व नसरीन बानो अब्दुल रियाज (वय ३७), रा. अलकरीम नगर क्रमांक २, अमरावती यांचा समावेश आहे. या प्रकरणातील दोन्ही आरोपींना पुढील तपासासाठी नागपुरी गेट पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. प्रत्यक्ष साक्षीदार नसताना आणि मृतदेहाची ओळखही अस्पष्ट असताना केवळ डीएनए अहवाल, सीसीटीव्ही फुटेज, गुप्त माहिती आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे गुन्ह्याची उकल करण्यात गुन्हे शाखेला यश आले. त्यामुळे शहरातील अलीकडील काळातील सर्वाधिक क्लिष्ट आणि आव्हानात्मक खून प्रकरणांपैकी एकाचा छडा लागल्याची चर्चा पोलीस वर्तुळात सुरू आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपआयुक्त यशवंत सोळंके, रमेश धुमाळ, सहाय्यक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे व कैलास फुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा आणि सायबर पोलिसांच्या संयुक्त पथकाने केली.

### गुपचूप विक्रेत्यावर चाकूहल्ला

खान आणि त्याच्या दोन साथीदारांनी त्याच्याकडे खर्चासाठी पैशांची मागणी केली. पैसे देण्यास नकार दिल्यानंतर आरोपी संतापले. यातील एका विधीसंघर्षित बालकाने धारदार चाकू काढून फिर्यादीच्या मुलाच्या छाती, पोट, कंबर आणि शरीराच्या विविध भागांवर सपासप वार केले. दुसऱ्या विधीसंघर्षित बालकानेही धारदार शस्त्राने हल्ला करत त्याला गंभीर जखमी केले. या हल्ल्यात युवक गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. या घटनेनंतर फ्रेजरपुरा पोलिसांनी आरोपीविरूद भारतीय न्याय संहितेच्या कलम १०९(१) व ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या डीबी पथकाने तातडीने तपासाची सूत्रे हाती घेतली. गुप्त माहिती आणि तांत्रिक तपासाच्या आधारे मुख्य आरोपी रिजवान खान उर्फ छोटू शमी खान (वय २५, रा. चमन शाहवली, अमरावती) याला विद्यापीठ परिसरातून ताब्यात घेण्यात आले. चौकशीदरम्यान आरोपीने दोन विधीसंघर्षित बालकांसह गुन्हा केल्याची कबुली दिली. दरम्यान, दोन्ही बालके सुपर हायवे मार्गे पळून जाण्याच्या तयारीत असताना पोलिसांनी त्यांनाही ताब्यात घेतले.या प्रकरणात मुख्य आरोपीला अटक करण्यात आली असून दोन्ही विधीसंघर्षित बालकांना बाल न्याय मंडळासमोर हजर करण्यात आले आहे. पुढील तपास फ्रेजरपुरा पोलीस करीत आहेत. गंभीर स्वरूपाच्या या प्राणघातक हल्ल्यानंतर आरोपी पसार होण्याच्या तयारीत होते. मात्र फ्रेजरपुरा पोलिसांच्या डीबी पथकाने जलद हालचाली करत अवघ्या २४ तासांत तिघांनाही ताब्यात घेतल्याने पोलिसांच्या कामगिरीचे कौतुक होत आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके, सहाय्यक पोलीस आयुक्त कैलास फुंडकर आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक रविंद्र राजुलवार यांच्या मार्गदर्शनाखाली डीबी प्रमुख पोलीस उपनिरीक्षक राहुल महाजन व त्यांच्या पथकाने केली.

### महिलांसाठी भव्य सायकलिंग

अनिवार्य करण्यात आलेले आहे. ग्रामीण आणि शहरी भागातील मुलींना संधी यामध्ये मिळणार आहे. शारीरिक दृष्ट्या सुदृढ राहण्यासाठी सायकल चालवणे महत्त्वपूर्ण आहे, हा संदेश या माध्यमातून देण्यात येणार आहे. स्पर्धेमध्ये मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी अतुल कळमकर(९३७२८७२२४७), लक्ष्मीकांत खांडागळे (९४२२६८०९९१) व सचिन पारेख (९९६०३९०९६०) यांच्याशी संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पत्रकार परिषद मध्ये सायकलिंग असो.चे सचिव अतुल कळमकर , पियुष क्षीरसागर,संजय मेंडसे उपस्थित होते.

### तडीपार गुन्हेगाराकडून देशी

आली होती. दरम्यान, १६ जून रोजी गुन्हे शाखेला गुप्त माहिती मिळाली की, नागपुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीतून तडीपार करण्यात आलेला अहेसान खान हसन खान (वय २५, रा. गुलिस्ता नगर, अमरावती) हा देशी कट्टा घेऊन फेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील परिहारपुरा-वडाळी पूल परिसरातून आशियाना क्लबकडे येत आहे.

माहितीच्या आधारे गुन्हे शाखेच्या पथकाने आशियाना क्लब परिसरात सापळा रचून संशयिताला ताब्यात घेतले. अंगझडतीदरम्यान त्याच्या कंबरेला लपवून ठेवलेला एक देशी बनावटीचा कट्टा (पिस्तूल) आणि दोन जिवंत काडतुसे आढळून आली. पोलिसांनी तत्काळ शस्त्र आणि काडतुसे जप्त केली. चौकशीत आरोपीने हे शस्त्र रेहान खान अयुब खान उर्फ 'रेहान बंदूक' (रा. पाटीपुरा, अमरावती) याच्याकडून घेतल्याची माहिती दिली. यानंतर पोलिसांनी शस्त्र पुरवठादाराविरुद्धही गुन्हा दाखल केला असून त्याचा शोध सुरू आहे. पोलिसांच्या माहितीनुसार अहेसान खान हा सराईत गुन्हेगार असून त्याच्याविरुद्ध यापूर्वीही गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. त्याला अमरावती शहर व ग्रामीण जिल्ह्यातून दोन वर्षांसाठी तडीपार करण्यात आले होते. मात्र कोणतीही अधिकृत परवानगी न घेता तो शहरात वावरत असल्याचे आणि त्याच्याकडे बेकायदेशीर अग्निशस्त्र आढळल्याने पोलिसांनी त्याच्यावर कठोर कारवाई केली.

**३७ हजारांचा मुद्देमाल जप्त-** कारवाईदरम्यान पोलिसांनी आरोपीकडून एक देशी बनावटीचा कट्टा (पिस्तूल) किंमत ३५,०००, दोन जिवंत काडतुसे किंमत २,००० असा एकूण ३७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात आर्म्स ॲक्ट कलम ३/२५ तसेच महाराष्ट्र पोलीस कायद्याच्या कलम १४२ व १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुप्त माहितीच्या आधारे कारवाई ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके, श्याम घुगे, रमेश धुमाळ तसेच सहाय्यक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे व अतुल वर यांच्या नेतृत्वाखालील पथकाने केली.

### निलेश विश्वकर्मा यांना

मतदारापासून महत्त्वाची बातमी दडविण्याचा प्रकार असल्याने निवडणूक विभागाने ही कार्यवाही केली. यामुळे लोकशाही प्रक्रियेतील पारदर्शकतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण होते. उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे यांनी सांगितले की निलेश विश्वकर्मा यांना पुन्हा स्मरणपत्र सह नोटीस बजावण्यात येणार आहे. त्यानंतरही आवश्यक माहिती प्रसिद्ध न केल्यास सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा तसेच निवडणूक आयोगाच्या कायदेशीर तरतुदीचा अवमान झाल्याची नोंद घेऊन पुढील योग्य निर्णय घेतला जाईल. यामुळे आता राजनीतिक वर्तुळासह मतदारांमध्ये चर्चा जोरावर आहे. या प्रकरणाकडे सर्वांच्या नजरा आता लागल्या आहे.

### स्कुटीवरून विदेशी दारूची

ब्लेंडर्स प्राईड या ब्रँडच्या एकूण ३० विदेशी मद्याच्या क्वॉर्टर बाटल्या जप्त केल्या. जप्त करण्यात आलेल्या दारूची किंमत १४ हजार २५० रुपये असून वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली टीव्हीएस स्कुटी(एमएच-२७-एव्ही-४२६४) किंमत ३० हजार रुपये असा एकूण ४४ हजार २५० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला. याप्रकरणी आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ६५ (ई) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त श्याम घुगे आणि सहाय्यक पोलीस आयुक्त संजय खताळे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण, पोउपनि मिलिंद हिवरे तसेच राजापेठ पोलीस ठाण्याच्या पथकाने केली.

### वृद्ध नागरिकाला विष पाजल्या

कुटूंबियांनी केली आहे.

१० जून २६ रोजी सकाळच्या सुमारास दादाराव अभ्यंकर यांना शेतात निखील गणेशे व त्याच्या सोबत असलेल्या तीन व्यक्तींनी विष पाजून जिवे मारण्याचा प्रयत्न केला होता.

दादाराव अभ्यंकर यांच्यावर अमरावती येथील खाजगी दवाखान्यात उपचार सुरु असून त्यांची प्रकृती अत्यंत चिंताजनक असल्याची माहिती आहे.

याबाबत रहीमापूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असली तरी अद्यापपर्यंत संबंधित आरोपींना अटक करण्यात आलेली नसल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे. तसेच गंभीर अवस्थेत असलेल्या दादाराव अभ्यंकर यांचा मृत्यूपूर्व जबाब देखिल अद्यापपर्यंत नोंदविण्यात आला नाही.

सदर प्रकरणाची सखोल व निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी तसेच पीडित कुटुंबाला न्याय मिळावा यासाठी खासदार अनिल बोंडे व जिल्हा पोलिस प्रशासनाकडे मागणी करण्यात आली आहे.

### चिरंजीवी टुरिझमच्या संचालकांकडून

त्यांना घेण्यासाठी १७ सीटर बस आली. बस मध्ये बसताच चालकाने दहा हजार रुपये मागितले. पर्यटक पूर्ण पैसे पहिलेच देऊन चुकले होते. हा निष्काळजीपणा झाल्यानंतर ज्या हॉटेलमध्ये त्यांच्या राहण्याची व्यवस्था करण्यात आली होती त्यामध्ये पार्किंग सुद्धा होती. रस्ता व्यवस्थित नव्हता. सकाळी ११.३० वाजता हॉटेलमध्ये पोहोचल्यानंतरही त्यांना २ वाजेपर्यंत रूम देण्यात आली नाही. जेवण ऑर्डर केल्यावरही त्यांना दोन तास जेवण नाही मिळाले. हॉटेलमध्ये सामान उचलण्यासाठी कोणताही कर्मचारी उपलब्ध नव्हता. यासंदर्भात संचालक किरण पांडे यांना फोन केले असता त्यांच्याशी संपर्क नाही झाला. पंधरा लोकांचा टूर असल्यावरही एकही टूर मॅनेजर नव्हता. ड्रायव्हरला रस्त्यांची माहिती नव्हती यामुळे पर्यटकांना मोठा त्रास सहन करावा लागला. त्यांना आर्थिक नुकसानही सोसावे लागले असा आरोपही करण्यात आला. नुकसान भरपाई देण्याची मागणी पर्यटकांनी केलेली आहे. पत्रकार परिषदमध्ये एड. अरुण ठाकरे, विवेक मार्कंडेय, डॉ.रामसिंह येवतीकर, सुजित देशमुख, डॉ.जितेंद्र राजकुमार, वैशाली अनासाने, डॉ.आर्यन जितेंद्र सिंह राजकुमार आदि उपस्थित होते.

### माती वाहतुकीमुळे वाहनचालकांच्या

किंवा अन्य संरक्षक आच्छादन असणे आवश्यक आहे. मात्र अनेक वाहनचालक या नियमांकडे दुर्लक्ष करत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. संबंधित विभागाने तात्काळ दखल घेऊन नियमभंग करणाऱ्या वाहनांवर कारवाई करावी व नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शहरवासीयांकडून होत आहे.खुल्या माती वाहतुकीमुळे उडणारी धूळ नागरिकांच्या आरोग्यासह वाहतूक सुरक्षेलाही धोका निर्माण करत आहे. प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे.


## जाहीर नोटीस

**विद्यमान ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती**

आर.एम.जे.सी.क्र.२८३/२०२६ — ने.ता.१७.०७.२०२६

अर्जदार : १. **चंदा भाष्कररराव डमके**, वय ६० वर्षे, धंदा - घरकाम
रा.बेलोरा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
२. **रुपाली विनोदराव लांडे**, वय ३६ वर्षे, धंदा - घरकाम
रा.कामनापुर (जावरा), ता.भातकुली, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मृतक भाष्कर नथ्थूजी डकमे** यांचा मृत्यू दिनांक **०७.१२.२०२१** रोजी **तसेच मृतक अनुसयाबाई नथ्थुजी डमके हिचा मृत्यू दि.०५/१०/२००५ रोजी रा.बेलोरा,ता.चांदूर बाजार, जि.अमरावती** येथे झालेला आहे.

यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदारांना मय्यताचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरीता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.२८३/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.१२.०५.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार



## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती**

**आर.एम.जे.सी.क्र.११९/२०२६** — **ने.ता.२२.०६.२०२६**

अर्जदार : १. **विनोद नारायणराव खेलदार**, वय ६० वर्षे,धंदा - शेती
रा.तळवेल, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
२. **विलास नारायणराव खेलदार, (मय्यतांचे वारस)**
**२अ) प्रमिला विलास खेलदार** (पत्नी), वय ६८ वर्षे, धंदा - घरकाम
रा.तळवेल,ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
**२ब) मंगेश विलास खेलदार** (मुलगा), वय ४० वर्षे, धंदा - शेती
रा.तळवेल,ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
**२क) शिल्पा संजयराव काळे** (मुलगी), वय ४३ वर्षे, धंदा - घरकाम
रा.तळवेल,ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
३. **विजय नारायणराव खेलदार (मय्यत)**
**३अ) संगिता विजय खेलदार** (पत्नी), वय ५१ वर्षे, धंदा - घरकाम
रा.तळवेल,ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
**३ब) दामिनी विजय खेलदार**, वय २५ वर्षे, धंदा - घरकाम
रा.तळवेल,ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
**३क) पायल विजय खेलदार**, वय २३ वर्षे, धंदा - घरकाम
रा.तळवेल,ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
**३ड) गायत्री विजय खेलदार**, वय १८ वर्षे, धंदा - घरकाम
रा.तळवेल,ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
**३इ) काजल विजय खेलदार**, वय १६ वर्षे, धंदा - शिक्षण
रा.तळवेल,ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
**३ई) गौरी विजय खेलदार**, वय १६ वर्षे, धंदा - शिक्षण
रा.तळवेल,ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
अर्जदार क्र.३इ) व ३ई) तर्फे अर्जदार अ.पा.क. आई संगिता विजय खेलदार
४. **अजय नारायणराव खेलदार (मय्यत)**
**४अ) रंजना अजय खेलदार**, वय ४३ वर्षे, धंदा - घरकाम
**४ब) धनश्री अजय खेलदार**,वय १९ वर्षे, धंदा - शिक्षण
**४क) शिवानी अजय खेलदार**, वय १८ वर्षे, धंदा - शिक्षण
**४ड) क्रिष्णा अजय खेलदार**, वय ११ वर्षे, धंदा - शिक्षण
**अर्जदार क्र.४ड) तर्फे अ.पा.क. आई रंजना अजय खेलदार**

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मृतक नारायणराव बाळकृष्ण खेलदार** यांचा मृत्यू दिनांक **०१.०२.२०१३** रोजी **तसेच मृतक सूर्यकांतादेवी नारायणराव खेलदार हिचा मृत्यू दि.१३/०१/२०१४ रोजी रा. तळवेल, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती** येथे झालेला आहे. **तसेच मृतक मनकर्णा बाळकृष्ण खेलवार** हया अंदाजे ५० वर्षापूर्वी **रा.तळवेल, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती** येथे मृत्यू पावल्या.

यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदारांना मय्यताचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरीता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.११९/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.२४.०३.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय, चांदूर बाजार

जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ बुधवार, १७ जून २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

एक प्रतिष्ठित सवय

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

# अडोळी येथे शेतकऱ्यांचा संताप अनावर

## सरसकट कर्जमाफीच्या मागणीसाठी दुचाकी जाळून सरकारचा निषेध

■ प्रतिनिधी | वाशिम ■

**राज्यातील शेतकरी कर्जबाजारीपणामुळे आर्थिक संकटात सापडले असून, सरसकट कर्जमाफीच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनाला आता अधिक तीव्र स्वरूप प्राप्त होत आहे. क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे नेते रविकांत तुपकर यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या आंदोलनाला पाठिंबा दर्शवत अडोळी येथील शेतकऱ्यांनी सरकारच्या निषेधार्थ स्वतःची दुचाकी पेटवून तीव्र संताप व्यक्त केला.**



यावेळी शेतकऱ्यांनी सरकारविरोधी घोषणाबाजी करत, शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचा आरोप केला. शेतीमालाला हमीभाव नसणे, वाढते उत्पादन खर्च, नैसर्गिक आपत्ती आणि कर्जाचा वाढता बोजा यामुळे शेतकरी आर्थिकदृष्ट्या खचला असल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले.

आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे की, राज्यातील लाखो शेतकरी कर्जाच्या ओझ्याखाली दबले असून अनेक कुटुंबे संकटात सापडली आहेत. अशा परिस्थितीत सरकारने तात्काळ सरसकट कर्जमाफी जाहीर करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा. मात्र, सरकारकडून कोणतीही ठोस भूमिका जाहीर होत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी आहे. दुचाकी जाळण्याच्या या आंदोलनामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. घटनास्थळी मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट इशारा देत सांगितले की, सरकारने शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल.

क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, हे आंदोलन कोणत्याही राजकीय हेतूने नसून शेतकऱ्यांच्या अस्तित्वाच्या लढ्यासाठी सुरू आहे. सरकारने तातडीने संवाद साधून सरसकट कर्जमाफी, शेतीमालाला हमीभाव आणि शेतकऱ्यांच्या अन्य प्रलंबित मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. अडोळी येथील या आंदोलनामुळे जिल्ह्यातील शेतकरी प्रश्न पुन्हा ऐरणीवर आले असून, सरकार याबाबत कोणती भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# माणुसकी नगरात माणुसकीलाच काळीमा


## आईवर तलवारीचा वार; काही तासांत मुलाची झोपेत निर्घृण हत्या

■ प्रतिनिधी | रिसोड ■

रिसोड शहरातील माणुसकी नगर परिसरात सोमवारी घडलेल्या दुहेरी हिंसक घटनेने संपूर्ण शहर हादरून गेले आहे. क्षुल्लक कारणातून सुरू झालेल्या वादाने इतके भीषण रूप धारण केले की, एका वृद्ध महिलेवर तलवारीने प्राणघातक हल्ला करण्यात आला आणि त्यानंतर अवघ्या काही तासांत तिच्या मुलाची झोपेत असताना निर्घृण हत्या करण्यात आली. या घटनेमुळे माणुसकी नगरात माणुसकीलाच काळीमा फासला गेल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

माणुसकी नगर येथील भगवान सुभाष गायकवाड (३८) यांचा डोक्यावर दगड व लोखंडी रॉडने वार करून खून करण्यात आला. यापूर्वी त्यांच्या आई विमल सुभाष गायकवाड यांच्यावर तलवारीने हल्ला करून गंभीर जखमी करण्यात आले होते. सध्या त्यांच्यावर उपचार सुरू असून त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती मिळाली आहे.

### जुन्या वादातून रक्तरंजित थरार; आठ जणांविरुद्ध गुन्हा, तिघे पोलिसांच्या ताब्यात



घटनेची माहिती मिळताच पोलीस उपविभागीय अधिकारी नवदीप अग्रवाल, ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांनी पथकासह घटनास्थळी धाव घेतली. तपासासाठी न्यायवैद्यक शाखा, फॉरेन्सिक तज्ज्ञ तसेच श्वान पथकाची मदत घेण्यात आली. मृतदेह शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला. या प्रकरणाचा पुढील तपास सहायक पोलीस उपनिरीक्षक संतोष आघाव, पोलीस उपनिरीक्षक वसंत तहकीक व त्यांचे पथक करीत आहे.

### मोबाईलवर बोलण्यावरून वाद; रक्तरंजित संघर्षात रूपांतर

पोलीस सूत्रांच्या माहितीनुसार, सोमवारी सायंकाळी परिसरातील काही व्यक्तींमध्ये मोबाईलवर मोठ्याने बोलण्याच्या कारणावरून शाब्दिक वाद झाला. सुरुवातीला किरकोळ भासणारा हा वाद काही वेळातच उग्र बनला. दोन्ही बाजूंमध्ये धक्काबुक्की आणि हाणामारी सुरू झाली. परिस्थिती शांत करण्यासाठी आणि वाद मिटविण्यासाठी पुढे आलेल्या विमल गायकवाड यांच्यावर आरोपींनी तलवारीने हल्ला केल्याचा आरोप आहे. या हल्ल्यात त्या गंभीर जखमी झाल्या. त्यांना प्रथम रिसोड ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी त्यांना वाशीममार्गे अकोला येथे हलविण्यात आले.

### आई उपचारासाठी रुग्णालयात; मुलावर मध्यरात्री जीवघेणा हल्ला

आईच्या उपचारासाठी कुटुंबीय रुग्णालयात धावपळ करत असताना भगवान गायकवाड हे घरासमोरील नालीवरील सिमेंटच्या ढाप्यावर झोपले होते. दरम्यान, मध्यरात्री साडेबारा वाजताच्या सुमारास काही व्यक्तींनी त्यांच्यावर हल्ला केल्याची माहिती कुटुंबीयांना मिळाली. घटनास्थळी पोहोचल्यानंतर भगवान गायकवाड हे रक्ताच्या थारोळ्यात पडलेले आढळले. त्यांच्या डोक्यावर दगड व लोखंडी रॉडने वार करण्यात आल्याचे प्राथमिक तपासात समोर आले. गंभीर जखमांमुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला होता. एकाच कुटुंबावर काही तासांच्या अंतराने झालेल्या या दोन प्राणघातक हल्ल्यांमुळे परिसरात भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### आठ जणांविरुद्ध खुनाचा गुन्हा

या प्रकरणी फिर्यादी बाली बळीराम गायकवाड यांच्या तक्रारीवरून प्रमोद संजय अंभोरे, दीपक अंभोरे, गजानन बाजड, मनीषा अंभोरे, सीता अंभोरे, शितल मानवतकर, आदित्य मानवतकर आणि संजय अंभोरे यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत तिघा संशयितांना ताब्यात घेतले असून इतर आरोपींचा शोध सुरू आहे.

रिसोडमधील ही घटना केवळ एका खुनाची नाही, तर वाढत्या वैमनस्याची आणि कायद्याची भीती कमी होत चालल्याची धोक्याची घंटा मानली जात आहे. किरकोळ वादातून सुरू झालेला संघर्ष थेट खून आणि प्राणघातक हल्ल्यापर्यंत पोहोचल्याने समाजातील वाढती हिंसक प्रवृत्ती पुन्हा एकदा समोर आली आहे. एका आईच्या डोळ्यांसमोर तिच्या कुटुंबावर कोसळलेले हे दुर्दैव आणि काही तासांत मुलाचा झालेला खून यामुळे संपूर्ण रिसोड शहर सुन्न झाले आहे.

# सावरगांव कान्होबा धरण परिसरातील हद्द सुनिश्चित करण्याकडे प्रशासनाची वाटचाल सुरू



■ प्रतिनिधी | मानोरा ■

वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.) कार्यालयाच्या कार्यकक्षेतील गिरोली वन वर्तुळ परिसरातील सावरगाव कान्होबा वन बिटाची हद्द या गावातील धरण क्षेत्रात येत असल्याचे सांगून या धरणामध्ये वर्षानुवर्षे जमा होणारी गाळ उचलण्यास वन प्रशासनाकडून मज्जाव केल्या जात असल्याचे विरोधात स्थानिक सामाजिक कार्यकर्त्याने ही बाब गोरसेना या सामाजिक संघटनेच्या माध्यमाने प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिल्याने उपरोक्त समस्या गांभीर्याने सोडवण्याचे निवेदन गोर सेनेद्वारे तालुका प्रशासनाला दिले होते ज्याची दखल घेत तालुका आपदा नियंत्रण प्राधिकारी यांच्या समन्वयाने वन तथा मृदा व जलसंधारण प्रशासनाकडून हे विषय गांभीर्याने हाताळले जात असल्याचे संकेत प्राप्त होत आहेत.

### गोर सेनेकडून समस्या सोडवण्या संदर्भात देण्यात आले होते प्रशासनाला निवेदन

गोरसेना जिल्हा उपाध्यक्ष गोपाल कनीराम चव्हाण, तालुका अध्यक्ष सुनील राठोड आणि तालुका सहसंयोजक डॉ. सुधाकर राठोड यांच्या वतीने ७ जून रोजी तहसीलदार यांना निवेदन देऊन उपरोक्त समस्या निराकरणा संदर्भात निवेदन देऊन वन तथा मृदा व जलसंधारण विभागाची हद्द निश्चित करण्या संदर्भात तहसीलदारांना समन्वय साधण्याची मागणी करण्यात आली होती.

# गो आधारित नैसर्गिक शेतीमुळेच शेतकऱ्यांच्या जीवनात येईल समृद्धी - निवृत्ती पाटील

■ प्रतिनिधी | मंगरूळपीर ■

'शेतकऱ्यांच्या जीवनात सुख, समाधान आणि आर्थिक स्थैर्य आणायचे असेल तर गो-आधारित नैसर्गिक शेतीचा अवलंब करणे ही काळाची गरज आहे,' असे प्रतिपादन कृषी विज्ञान केंद्र वाशिम येथील फळबाग तज्ञ निवृत्ती पाटील यांनी केले.



दीनदयाल सेवा प्रतिष्ठानच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या वत्सगुल्म कृषी विकास प्रकल्पांतर्गत शेतकरी कार्यशाळेचे आयोजन रविवार, दि. १४ जून रोजी सकाळी १० वाजता नागी, ता. मंगरूळपीर, जि. वाशिम येथे करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालिकराम पाटील राऊत (नागी) होते. यावेळी इचा-नागी येथील सरपंच सदानंद राऊत, पोलीस पाटील योगेश राऊत, प्रकल्प समिती अध्यक्ष देविदासजी पाटील राऊत तसेच संजय डवरे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक क्लस्टर प्रमुख रामेश्वर मुखमाले यांनी केले, तर सूत्रसंचालन देवळे यांनी केले. समारोप प्रसंगी शेतकरी विकास प्रकल्पाचे प्रकल्प समन्वयक अनिलजी गावंडे (यवतमाळ) यांनी रासायनिक निविष्ठांच्या अतिरेकी वापरामुळे जमिनीचे आरोग्य, पर्यावरण आणि मानवी आरोग्यावर निर्माण झालेल्या समस्यांवर प्रकाश टाकत नैसर्गिक शेती हा प्रभावी पर्याय असल्याचे सांगितले.

तांत्रिक मार्गदर्शना मध्ये पाटील यांनी देशी गाईंचे कृषी व पर्यावरणीय महत्त्व स्पष्ट करताना गोकृपा अमृत निर्मितीची शास्त्रीय पद्धत, त्याचा जमिनीच्या सुपीकतेवर होणारा सकारात्मक परिणाम, सूक्ष्मजीवांची वाढ, मातीचे आरोग्य सुधारणा तसेच उत्पादन खर्च कमी करून उत्पादन व उत्पन्न वाढीच्या संधी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. गो आधारित निविष्ठांच्या वापरामुळे शेती अधिक शाश्वत व नैसर्गिक बनत असल्याचे त्यांनी विविध उदाहरणांद्वारे स्पष्ट केले. कार्यशाळेत सहभागी शेतकऱ्यांनी गोकृपा अमृतच्या वापरातून मिळालेले अनुभव व यशोगाथा मांडल्या. मनोज राऊत यांनी आभार प्रदर्शन केले.

# शेती अवजारे चोरी करणारा भुरटा चोर स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळ्यात; ३६ हजारांच्या दोन ब्रेकर मशिन जप्त



■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशिम जिल्ह्यात शेती अवजारे व बांधकाम साहित्य चोरी करणाऱ्या भुरट्या चोरांविरोधात स्थानिक गुन्हे शाखेने पुन्हा एकदा प्रभावी कारवाई करत एका आरोपीला अटक केली असून त्याच्याकडून ३६ हजार रुपये किमतीच्या दोन कॉन्क्रेट फोडण्याच्या ब्रेकर मशिन जप्त करण्यात आल्या आहेत.

वाशिम जिल्हा पोलिसांनी मागील काही वर्षांपासून गुन्हेगारीविरोधात धडक मोहिमा राबवत अनेक सराईत गुन्हेगारांना अटक करून त्यांच्यावर कारवाई केली आहे. याच पार्श्वभूमीवर शेती अवजारे व बांधकाम साहित्य चोरीच्या गुन्ह्यांचा तपास वेगाने सुरू असून आणखी एका चोरीचा उलगडा करण्यात पोलिसांना यश आले आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, अजय राजेश देशमुख (रा. टिटवा, ता. बार्शीटाकळी, जि. अकोला) यांनी १५ जून २०२६ रोजी वाशिम ग्रामीण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. जांभरून परांडे येथे पाइपलाइनचे काम सुरू असताना अज्ञात चोरट्याने दोन कॉन्क्रेट फोडण्याच्या ब्रेकर मशिन चोरी करून नेल्याची माहिती त्यांनी दिली. यावरून वाशिम ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३२४/२०२६, कलम ३०३(२) भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हा दाखल करण्यात आला.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रदीप परदेशी यांनी विशेष पथक तयार करून तपास सुरू केला. घटनास्थळावरील साक्षीदार, गोपनीय माहिती तसेच तांत्रिक तपासाच्या आधारे संशयित आरोपीची ओळख पटविण्यात आली. आरोपी अनिल किसन अढाव (वय ४५, रा. जांभरून परांडे, ता. जि. वाशिम) हा चोरीनंतर फरार झाल्याचे निष्पन्न झाले.

# मंगरूळपीर खरेदी-विक्री संघातील खतवाटपावरून शेतकऱ्यांचा संताप

■ प्रतिनिधी | मंगरूळपीर ■

वाशिम जिल्ह्यातील शेतकऱ्यांना डीएपी खताचा पुरेसा पुरवठा व्हावा यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्देशानुसार सर्व तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणात खत उपलब्ध करून देण्यात आले आहे. मात्र मंगरूळपीर येथील खरेदी-विक्री संघामध्ये खतवाटपाच्या प्रक्रियेत अनियमितता झाल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला असून, यावरून मंगळवारी तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. गेल्या काही दिवसांपासून मंगरूळपीर तालुक्यातील अनेक शेतकरी डीएपी खत मिळण्याच्या आशेने खरेदी-विक्री संघाच्या कार्यालयात येत होते. शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, गोडाऊनमध्ये खत उपलब्ध असतानाही अनेकांना 'खत उपलब्ध नाही' असे सांगून परत पाठविण्यात आले. काही शेतकरी सकाळी ८ वाजल्यापासून संध्याकाळी ५ वाजेपर्यंत कार्यालयाबाहेर थांबून होते. मात्र त्यांना खत देण्यात आले नाही किंवा त्यांची पावतीही फाडण्यात आली नाही. याउलट, हे शेतकरी घरी परतल्यानंतर संध्याकाळी उशिरा काही अन्य शेतकऱ्यांच्या पावत्या काढून त्यांना खत वाटप करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे दुसऱ्या दिवशी पुन्हा खतासाठी आलेल्या शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आणि संताप व्यक्त करण्यात आला. दरम्यान, शेतकऱ्यांच्या तक्रारीनंतर शिवसेना पदाधिकारी अर्जुन भीमराव सुर्वे यांनी शेतकऱ्यांसह खरेदी-विक्री संघ गाठून संबंधित कर्मचाऱ्यांकडे जाब विचारला. यावेळी कर्मचाऱ्यांकडून समाधानकारक उत्तरे न मिळाल्याने सुर्वे यांनी त्यांना चांगलेच धारेवर धरले. या प्रकारामुळे काही काळ खरेदी-विक्री संघाच्या आवारात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या घटनेमुळे खतवाटप प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणि नियोजनाची गरज असल्याची मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.





> आज शेतकऱ्यांचा प्रश्न मार्गी लागला असला तरी भविष्यात शेतकऱ्यांना अशा प्रकारचा त्रास सहन करावा लागणार नाही, याची प्रशासनाने दक्षता घ्यावी. शेतकऱ्यांच्या हक्काच्या खतासाठी त्यांना हेलपाटे मारावे लागणे अत्यंत दुर्दैवी आहे.
>
> **अर्जुन सुर्वे,**
> शिवसेना पदाधिकारी

# तहसीलदारांच्या आदेशाला केराची टोपली

## हट्टीचा पारंपरिक रस्ता अजूनही बंद

■ प्रतिनिधी | मानोरा ■

शेतजमीन वहीवाटीसाठी अडविलेला जुना पारंपरिक रस्ता खुला करण्याबत तहसीलदार मानोरा यांनी २० एप्रिल रोजी मंडळ अधिकारी कुपटा व ग्राम महसूल अधिकारी टेरका यांना सविस्तर संयुक्त चौकशी अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते.

दोन महिने उलटूनही अहवाल सादर न झाल्याने शेतकरी रमेश राठोड व इतरांचा ४०० संत्र्यांच्या बागेचा व १० लाखांच्या नुकसानीचा प्रश्न अजूनही प्रलंबित आहे. तहसीलदारांच्या आदेशाची मंडळ व ग्राम महसूल अधिकाऱ्यांनी अवहेलना केल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.

पावसाळा कधीही सुरू होऊ शकतो त्यामुळे अर्जदार शेतकऱ्यांना आपल्या शेत शिवारात जाण्यासाठी पर्याय नसल्याने शेतकरी महसूल प्रशासनामार्फत लोकशाही मार्गाने करीत असलेल्या प्रयत्नाची दखल घेणाऱ्या तहसीलदारांच्या लेखी आदेशाचीच अवहेलना महसूल कर्मचारी करीत असतील तर शेतकऱ्यांप्रती मंडळ व ग्राम महसूल अधिकारी यांचा व्यवहार कसा असेल याबाबत सुद्धा आता चर्चा व्हायला लागल्या आहेत.

# अकोल्यात शिवसेनेचे 'ऑपरेशन टायगर'

## बार्शीटाकळीतील १० नगरसेवकांचा शिंदे गटात प्रवेश

■ प्रतिनिधी | अकोला ■

*राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत बार्शीटाकळी नगरपालिकेतील विविध पक्षांतील आणि अपक्ष असे एकूण १० नगरसेवकांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. मुंबई येथील नंदनवन निवासस्थानी झालेल्या कार्यक्रमात हा पक्षप्रवेश पार पडला.*



अकोला जिल्हा शिवसेना विशेष प्रभारी ललित वानखडे आणि जिल्हाप्रमुख चंद्रशेखर पांडे (गुरुजी) यांच्या पुढाकारातून हा पक्षप्रवेश घडून आला. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) तसेच अपक्ष नगरसेवकांचा समावेश असल्याने बार्शीटाकळीच्या राजकीय वर्तुळात या घडामोडीची चर्चा रंगली आहे.

शिवसेनेत प्रवेश करणाऱ्यांमध्ये शुभम इंगळे, नवेद खान, इफ्तेखारुद्दीन काझी, शहाना अंजुम (अपक्ष), रफिया खान, मुमताज सिद्दिकी, सय्यद जहागीर, असगरी अंजुम (काँग्रेस), तसेच रुबिना परवीन आणि सफिया बेगम (राष्ट्रवादी काँग्रेस-अजित पवार गट) यांचा समावेश आहे.

या पक्षप्रवेशामुळे बार्शीटाकळी नगरपालिकेतील शिवसेनेची ताकद वाढणार असल्याचे मानले जात आहे. राज्यातील महायुती सरकारच्या विकासाभिमुख धोरणांमुळे आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वामुळे प्रभावित होऊन संबंधित नगरसेवकांनी शिवसेनेत प्रवेश केल्याचे पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. दरम्यान, अकोला जिल्ह्यात शिवसेना संघटन बळकट करण्यासाठी सुरू असलेल्या 'ऑपरेशन टायगर' मोहिमेला या पक्षप्रवेशामुळे अधिक बळ मिळाल्याची प्रतिक्रिया शिवसैनिकांमधून व्यक्त होत आहे. या पक्षप्रवेशाची माहिती शिवसेनेचे पदाधिकारी अनिल मालगे यांनी दिली. बार्शीटाकळीसह जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये शिवसेनेची ताकद वाढविण्यासाठी आगामी काळात आणखी काही महत्त्वाचे पक्षप्रवेश होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २०० ■ बुधवार, १७ जून २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## खासदार, पालकमंत्री या आर्त हाकेकडे लक्ष देणार का

# वादळाने छत उडवले... आता जगण्याचाच आधार हरपला

## तीन लेकरं, वृद्ध सासू आणि उघड्यावर आलेला संसार; विधवेवर आत्महत्येची वेळ





**जामणी जनमाध्यम :** निसर्गाच्या एका तडाख्याने एका विधवा महिलेचा संपूर्ण संसार अक्षरशः उघड्यावर आला आहे. नुकत्याच झालेल्या वादळी पावसात घरावरील संपूर्ण छत उडून गेल्याने जामणी येथील माया रामाजी श्रीनाथ या विधवा महिलेवर आता जगण्याचा प्रश्न उभा ठाकला आहे. घरात कमावणारा पुरुष नाही, डोक्यावर छप्पर नाही, तीन लेकरांचे शिक्षण आणि वृद्ध सासूची जबाबदारी... या संकटांच्या डोंगराखाली दबलेल्या मायाबाईंच्या डोळ्यांत आता फक्त अश्रू आणि असहाय्यता दिसत आहे. परिस्थिती इतकी बिकट झाली आहे की, या गरीब विधवेवर आत्महत्येची वेळ आल्याची हृदयद्रावक स्थिती निर्माण झाली आहे.

वर्धा जिल्ह्यातील सेलू तालुक्यातील जामणी येथील माया रामाजी श्रीनाथ (वय ३८) या कोळी समाजातील महिला आपल्या तीन मुली आणि विधवा सासूसोबत अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत जीवन जगत आहेत. पतीच्या निधनानंतर संसाराचा गाडा ओढण्याची जबाबदारी मायाबाईंच्या खांद्यावर आली. मुरमुरे, फुटाणे आणि चिवड्याचे छोटेसे दुकान चालवत त्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत होत्या. कष्टाने, अश्रूंनी आणि लेकरांच्या भवितव्याच्या आशेने त्या दिवस ढकलत होत्या.

मोठी मुलगी स्मृती (१६) नुकतीच दहावी उत्तीर्ण होऊन अकरावीत गेली आहे. नेत्रा (१३) शिक्षण घेत आहे तर धाकटी पूर्वी (१०) पाचवीत शिकत आहे. लेकरांच्या शिक्षणासाठी, त्यांच्या भविष्याकरिता मायाबाई जीवाचे रान करत होत्या. मात्र, अचानक आलेल्या वादळाने त्यांच्या आयुष्यावरच घाला घातला. वादळी पावसाच्या तडाख्यात त्यांच्या घरावरील संपूर्ण छत उडून गेले. घरातील संसारोपयोगी साहित्य भिजले, भिंतींचे नुकसान झाले आणि संपूर्ण कुटुंब उघड्यावर आले. पावसाळा तोंडावर असताना घरावर छत नसल्याने रात्रीचा प्रत्येक क्षण भीतीत जात आहे. एका बाजूला लहान मुलींचे भविष्य, दुसऱ्या बाजूला वृद्ध सासूची जबाबदारी आणि हातात पैशांचा पूर्ण अभाव या संकटाने मायाबाई पूर्णपणे खचून गेल्या आहेत.

आता जगायचं कसं हा प्रश्न त्यांच्या डोळ्यांतून सतत उमटताना दिसत आहे. शासनाकडून किंवा समाजातील दानशूर व्यक्तींनी मदतीचा हात पुढे करावा, अशी भावनिक आर्त हाक कुटुंबीयांकडून देण्यात येत आहे. गावातील नागरिकांनीही या विधवा महिलेच्या मदतीसाठी पुढे येण्याचे आवाहन केले आहे.

वादळाने केवळ घराचे छत उडवले नाही, तर एका गरीब कुटुंबाच्या जगण्याची उमेदच हिरावून घेतली आहे. आता प्रशासन आणि समाजाने संवेदनशीलता दाखवून या कुटुंबाला आधार देण्याची गरज व्यक्त होत आहे.

# एका क्लिकने खाते साफ ... तरीही नागरिक बेफिकीर

## आरटीओ चलानाच्या नावाखाली ३.४३ लाखांचा ऑनलाईन डल्ला



**वर्धा जनमाध्यम :** सायबर गुन्हेगारांचे जाळे दिवसेंदिवस अधिक घातक होत असताना दुसरीकडे नागरिकांची बेफिकिरी मात्र कमी होताना दिसत नाही. पोलीस विभाग, बँका आणि सायबर गुन्हे अन्वेषण विभागाकडून वारंवार अनोळखी लिंक उघडू नका, एपीके फाईल डाउनलोड करू नका, ओटीपी कोणालाही सांगू नका असे इशारे दिले जात असतानाही अनेक नागरिक सहजपणे या सापळ्यात अडकत आहेत. आणि घटना घडल्यानंतर शेवटी धाव घ्यावी लागते ती पोलिसांच्या दारातच! हिंगणघाटमध्ये घडलेली ३ लाख ४३ हजार रुपयांची ऑनलाईन फसवणूक ही त्याच बेफिकीरीची आणखी एक धक्कादायक उदाहरण ठरली आहे.

हिंगणघाट येथील सिंधी कॉलनी, गुरुनानक वॉर्ड परिसरातील शुभम मोतीलाल पंच (वय २६) याला त्याच्या मित्राच्या व्हॉट्सॲपवरून आरटीओ चलानासंदर्भातील एपीके फाईल प्राप्त झाली होती. कोणतीही खातरजमा न करता शुभमने ती फाईल डाउनलोड केली आणि काही वेळातच त्याच्या बँक खात्यातून तब्बल ३ लाख ४३ हजार रुपये अज्ञात खात्यात ऑनलाइन वळते करण्यात आले. मोबाईलवर व्यवहाराचे संदेश येताच त्याच्या पायाखालची जमीन सरकली. त्यानंतर त्याने बँक आणि पोलिसांकडे धाव घेत तक्रार दाखल केली.सायबर पोलिसांच्या माहितीनुसार, अशा एपीके फाईल्सद्वारे मोबाईलमधील वैयक्तिक माहिती, बँकिंग ॲप्स, ओटीपी, पासवर्ड आणि अन्य डेटा चोरला जातो. अनेकदा नागरिक चलान भरायचे आहे, केवायसी अपडेट करा, वीज बिल थकले आहे, पार्सल अडले आहे, अशा संदेशांना भुलून नकळत स्वतःच गुन्हेगारांना मोबाईलचा ताबा देतात.

विशेष म्हणजे, बँका सातत्याने ग्राहकांना ओटीपी किंवा बँकिंग माहिती कुणालाही देऊ नका, असे आवाहन करतात. पोलीस विभागाकडूनही वेळोवेळी जनजागृती मोहिमा राबविल्या जातात. सोशल मीडियावर, वर्तमानपत्रांत आणि सार्वजनिक कार्यक्रमांमधून सायबर फसवणुकीबाबत सतर्कतेचे संदेश दिले जातात. मात्र, तरीही काही नागरिक निष्काळजीपणे अनोळखी फाईल्स डाउनलोड करतात आणि लाखोंचा फटका बसल्यानंतर पोलिसांकडे मदतीसाठी धाव घेतात. ही परिस्थितीच आता शोकांतिकेची बनली असल्याची खंत पोलीस विभागातून व्यक्त केली जात आहे.

सायबर गुन्हे रोखण्यासाठी पोलिसांचे एकटे प्रयत्न पुरेसे नाहीत. नागरिकांनीही सतर्क राहून सहकार्य करणे अत्यावश्यक आहे, अशी याचना आता पोलीस विभागाला वारंवार करावी लागत आहे. एका चुकीच्या क्लिकमुळे आयुष्यभराची कमाई क्षणात नाहीशी होऊ शकते, त्यामुळे प्रत्येक नागरिकाने डिजिटल व्यवहार करताना अधिक जागरूक राहण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

या प्रकरणी वर्धा सायबर पोलिस ठाण्यात अज्ञात सायबर भामट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# आष्टी पोलिसांची तत्परता; तीन अल्पवयीन मुली सुरक्षित

## अमरावतीतून शोध घेऊन गणेशपेठ पोलिसांच्या स्वाधीन



**वर्धा जनमाध्यम:** नागपूरमधून बेपत्ता झालेल्या तीन अल्पवयीन मुलींचा वेळीच शोध घेण्यात आष्टी पोलिसांना यश आले असून अमरावती येथून त्यांना सुरक्षित ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी मुलींना नागपूर जिल्ह्यातील गणेशपेठ पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले. या कारवाईमुळे कुटुंबीयांनी सुटकेचा निश्वास सोडला असून पोलिसांच्या तत्परतेचे कौतुक होत आहे.

नागपूर येथील रहिवासी असलेल्या तीन अल्पवयीन मुलींना कुणीतरी फूस लावून पळवून नेल्याची माहिती कुटुंबीयांनी गणेशपेठ पोलिस ठाण्यात दिली होती. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेत पोलिस आयुक्त रविंद्र सिंगल यांच्या मार्गदर्शनाखाली तातडीने शोधमोहीम सुरू करण्यात आली. अल्पवयीन मुलींचा प्रश्न असल्याने संपूर्ण पोलिस यंत्रणा ॲक्शन मोडवर आली होती.

दरम्यान, वर्धा जिल्ह्यातील आष्टी पोलिस स्टेशनचे ठाणेदार राजेश जोशी यांनी आपल्या सहकाऱ्यांसह तपासाची सूत्रे हाती घेतली. मोबाईल लोकेशन, तांत्रिक माहिती आणि गोपनीय सूत्रांच्या आधारे तपासाचे चक्र वेगाने फिरवण्यात आले. तपासादरम्यान काही धागेदोरे मिळाल्यानंतर पोलिसांचे पथक अमरावती येथे दाखल झाले.

अमरावतीतून तिन्ही मुलींना सुरक्षित ताब्यात घेऊन त्यांना आष्टी येथे आणण्यात आले. त्यानंतर गणेशपेठ पोलिसांना माहिती देण्यात आली व आवश्यक कार्यवाही पूर्ण करून मुलींना त्यांच्या स्वाधीन करण्यात आले.

या प्रकरणात आष्टी पोलिसांनी दाखविलेली तत्परता आणि समन्वय विशेष महत्त्वाचा ठरला. वेळेत शोधमोहीम राबविल्यामुळे संभाव्य अनर्थ टळल्याची भावना व्यक्त होत आहे. पोलिसांनी मनावर घेतले तर कोणतेही गुंतागुंतीचे प्रकरण वेळीच उघडकीस आणता येते, हे या कारवाईतून पुन्हा एकदा स्पष्ट झाल्याचे नागरिकांकडून सांगितले जात आहे.

# पाच वर्षांपासून रस्ता रखडला; नागरिकांचा संताप उफाळला

## बोरगाव-साहूर मार्गासाठी आमदारांना धडक निवेदन; विद्यार्थ्यांपासून रुग्णांपर्यंत हाल



**आष्टी शहीद जनमाध्यम :** बोरगाव ते साहूर या महत्त्वाच्या रस्त्याचे बांधकाम तब्बल पाच वर्षांपासून अपूर्ण अवस्थेत असल्याने परिसरातील नागरिकांचा संताप तीव्र झाला आहे. वर्धपूर, वडाळा, सत्तरपूर व बोरगाव परिसरातील ग्रामस्थांनी आर्वीचे आमदार सुमित वानखडे यांना निवेदन देत तातडीने रस्त्याचे काम पूर्ण करण्याची मागणी केली आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, रस्त्याचे काम अनेक वर्षांपूर्वी सुरू झाले; मात्र आजही ते पूर्णत्वास गेले नाही. त्यामुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. खराब रस्त्यामुळे शेतकऱ्यांना शेतीमालाची वाहतूक करताना अडचणी येत असून विद्यार्थ्यांना वेळेवर शाळा व महाविद्यालयात पोहोचणे कठीण झाले आहे. याचा त्यांच्या शिक्षणावर विपरीत परिणाम होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.

तसेच गर्भवती महिला, वृद्ध नागरिक आणि आपत्कालीन रुग्णांसाठी हा मार्ग धोकादायक बनला आहे. गंभीर रुग्णांना वरुड किंवा इतर शहरात तातडीने नेणे अवघड होत असल्याने जीवितास धोका निर्माण होत असल्याची खंत ग्रामस्थांनी व्यक्त केली.

पावसाळ्यात परिस्थिती आणखी बिकट होत असून अनेक वाहनचालक घसरून पडल्याच्या घटना घडल्या आहेत. वारंवार पाठपुरावा करूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे.

देश विकसित होत असल्याच्या घोषणा केल्या जातात मात्र ग्रामीण भागातील रस्त्यांची दुरवस्था पाहता विकास फक्त कागदावरच दिसतो, अशा शब्दांत ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला. बोरगाव-साहूर रस्त्याचे अपूर्ण काम तातडीने पूर्ण करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

# कर्जमाफीच्या नावाखाली शेतकऱ्यांची फसवणूक

## अन्यायकारक निकषांविरोधात वर्ध्यात शेतकरी संघटनांचा संताप; राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा



**वर्धा जनमाध्यम :** राज्य सरकारने जाहीर केलेली 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' ही प्रत्यक्षात शेतकऱ्यांसाठी दिलासा नसून फसवणुकीचा डाव असल्याचा आरोप करत वर्धा जिल्हा शेतकरी-कामगार आंदोलन समन्वय समितीने सरकारविरोधात जोरदार एल्गार पुकारला आहे. कर्जमाफीच्या नावाखाली कठोर आणि अन्यायकारक अटी लादून लाखो शेतकऱ्यांना लाभापासून वंचित ठेवण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा संताप आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्री, महसूल मंत्री आणि कृषी मंत्र्यांना सादर करण्यात आलेल्या निवेदनात समितीने स्पष्ट शब्दांत इशारा दिला की, सरकारने तातडीने हे निकष मागे घेतले नाहीत तर राज्यभर तीव्र लोकशाही आंदोलन छेडले जाईल. शेतकरी आधीच कर्जाच्या खाईत असताना त्यांच्याकडून अतिरिक्त रक्कम भरण्याची अट घालणे म्हणजे जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया यावेळी व्यक्त करण्यात आली.

दोन लाखांपेक्षा अधिक थकीत कर्ज असलेल्या शेतकऱ्यांनी आधी अतिरिक्त रक्कम भरावी, ही अट तात्काळ रद्द करावी, अशी मागणी करण्यात आली. आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांकडे पैसेच नसताना शासनाने अशा अटी लादणे म्हणजे कर्जमाफी नव्हे तर थट्टा असल्याचे आंदोलनकर्त्यांनी म्हटले. एकरकमी समजोता (ओटीएस) योजना देखील शेतकऱ्यांच्या आवाक्याबाहेर असल्याने ती अन्यायकारक असल्याचा आरोप करण्यात आला.

सन २०१९ पूर्वी कर्जमाफी घेतलेल्या शेतकऱ्यांना नव्या योजनेतून वगळणे हा मोठा अन्याय असल्याचे सांगत, सात वर्षांत पुन्हा संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना सरकारने वाऱ्यावर सोडले, असा आरोप करण्यात आला. ग्रामपंचायत सदस्य, नगरसेवक, चतुर्थ श्रेणी कर्मचारी आणि निवृत्तीवेतनधारक शेतकरी यांनाही लाभ नाकारण्यात येत असल्याने सरकारच्या धोरणावर तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी जाहीर करण्यात आलेली मदत अत्यल्प असून प्रामाणिक शेतकऱ्यांचा सरकारकडून अपमान होत असल्याची भावना आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली. सर्व पात्र शेतकऱ्यांना कोणतीही पूर्वअट न ठेवता सरसकट दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्यात यावी, अशी ठाम मागणी यावेळी करण्यात आली.

या आंदोलनात विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटना आणि शेतकरी संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. ॲड. अविनाश काकडे, कॉम्रेड यशवंत झाडे, सुधीर पांगुळ, डॉ. अभ्युदय मेघे, सुनील कोल्हे, सुदाम पवार, प्रफुल कुकडे, गोपाल दुधाने, विठ्ठल झाडे, द्वारका इमडवार, महेंद्र मुनेश्वर, मंगेश शेंडे, प्रा. नूतन माळवी, संदीप किटे, राजीव वानखेडे, संजय काकडे, प्रा. प्रवीण भोयर यांच्यासह अनेक कार्यकर्ते व शेतकरी उपस्थित होते.

# मागण्या प्रलंबितच; आरटीओ कर्मचाऱ्यांचा बेमुदत संप



**वर्धा जनमाध्यम :** उप-प्रादेशिक परिवहन विभागातील (आरटीओ) कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या दीर्घकाळापासून प्रलंबितच राहिल्याने अखेर कर्मचारी संघटनांनी १६ जूनपासून बेमुदत कामबंद आंदोलन सुरू केले आहे. सरकारकडून कोणताही ठोस निर्णय घेतला जात नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली असून या आंदोलनाचा परिणाम विभागाच्या दैनंदिन कामकाजावर होत आहे.

यापूर्वी २ जून रोजी दोन तासांचे आंदोलन करून प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले होते. त्यानंतर ९ जूनला एक दिवसाचे आंदोलन करण्यात आले. तरीही मागण्या पूर्ण न झाल्याने कर्मचाऱ्यांनी बेमुदत संपाचा इशारा दिला होता. अखेर सोमवारी आंदोलनाला सुरुवात करण्यात आली. कर्मचाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, यापूर्वी सप्टेंबर २०२५ मध्येही आंदोलन करण्यात आले होते. त्यावेळी परिवहन आयुक्त कार्यालयाने प्रवेश नियम व पदोन्नती प्रक्रियेबाबत कारवाईचे आश्वासन दिले होते. काही पदांसाठी तात्पुरती पदोन्नती देण्यात आली; मात्र कालावधी संपल्यानंतर कर्मचाऱ्यांना पुन्हा जुन्याच पदावर ठेवण्यात आले. वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांना पदोन्नती, कार्यालय अधीक्षक पदासाठी प्रवेश नियम, वर्ग-३ पदांसाठी नियमावली, तसेच आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यासह विविध मागण्यांसाठी हे आंदोलन सुरू करण्यात आले आहे. मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन सुरूच राहणार असल्याचा इशारा कर्मचाऱ्यांनी दिला आहे.

# विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी स्कुल बसवर कडक नियम



**वर्धा जनमाध्यम :** विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीच्या दृष्टीने जिल्हा पोलीस प्रशासनाने स्कुल बस चालक व शाळा व्यवस्थापनाला कडक नियमांचे पालन करण्याचे निर्देश दिले आहेत. पोलीस अधीक्षक यांच्या अध्यक्षतेखाली पोलीस अधीक्षक कार्यालयात झालेल्या स्कुल बस वाहतूक सुरक्षा समितीच्या बैठकीत विविध महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.

बैठकीला उपप्रादेशिक परिवहन अधिकारी मेंढे मॅडम, शिक्षणाधिकारी, वाहतूक असोसिएशनचे अध्यक्ष देवाभाऊ निखाडे तसेच विविध शाळांचे मुख्याध्यापक उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या वाहतुकीसाठी वापरण्यात येणाऱ्या सर्व बसेस सुरक्षित व नियमांनुसार असाव्यात, असे निर्देश देताना प्रत्येक बसमध्ये प्रथमोपचार पेटी, अग्निशामक यंत्र तसेच चालक व क्लिनरला आग विझविण्याचे प्रशिक्षण देणे बंधनकारक असल्याचे सांगण्यात आले.

स्कुल बसमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे व जीपीएस प्रणाली बसविणे आवश्यक असून, बसच्या प्रवेशद्वारांवर देखरेख राहील अशा पद्धतीने कॅमेरे लावण्याच्या सूचना देण्यात आल्या. चालक व क्लिनर हे निर्व्यसनी व शिस्तप्रिय असावेत तसेच वाहन चालविताना मोबाईलचा वापर करू नये, असेही स्पष्ट करण्यात आले.

ऑटो रिक्षा व ई-रिक्षाद्वारे विद्यार्थ्यांची वाहतूक करण्यास मनाई असल्याचे बैठकीत सांगण्यात आले. बसमध्ये तक्रार पेटी तसेच पोलीस हेल्पलाईन क्रमांक ११२ लिहिण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. मद्यप्राशन करून वाहन चालविणाऱ्या चालकांवर कठोर कारवाई करून वाहन परमिट निलंबित केले जाईल, असा इशाराही पोलीस प्रशासनाने दिला.

विद्यार्थ्यांची सुरक्षा ही सर्वोच्च प्राधान्याची बाब असून, शाळा प्रशासनाने वाहतुकीबाबत आवश्यक दक्षता घ्यावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# मुंबई मेट्रोमुळे दुग्धजन्य पदार्थांना मोठी बाजारपेठ मिळणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**मुंबई जनमाध्यम :** ग्रामीण भागातील दुग्धजन्य पदार्थ आणि अन्य कृषी उत्पादने मोठ्या बाजारपेठेपर्यंत पोहोचविण्यासाठी मुंबई मेट्रो हे मोठे आणि प्रभावी माध्यम आहे. यामुळे निश्चितच ग्रामीण भागातील उत्पादनांना मुंबईमध्ये हक्काची बाजारपेठ उपलब्ध होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मेट्रो स्टेशन स्थानकावर वारणा सहकारी दूध उत्पादक संघाच्या दुग्धजन्य पदार्थ विक्री स्टॉलच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. दुग्धविकास मंत्री अतुल सावे, विधानसभा अध्यक्ष ?ड. राहुल नार्वेकर, वारणा समूहाचे अध्यक्ष आमदार डॉ. विनय कोरे (सावकर), मुंबई महापालिका आयुक्त तथा मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे,तसेच वारणा सहकारी दूध उत्पादक संघाचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

# बोर जलाशय मासेमारी कंत्राटावरून संताप

## स्थानिक मच्छीमारांचे झाशी राणी चौकात धरणे आंदोलन



**वर्धा जनमाध्यम :** सेलू तालुक्यातील बोर जलाशयातील मासेमारीचे कंत्राट मुंबईतील एका खासगी एजन्सीला देण्यात आल्याच्या निषेधार्थ स्थानिक मच्छीमारांनी मंगळवारी शहरातील झाशी राणी पुतळा चौकात धरणे आंदोलन केले. स्थानिकांना डावलून हा कंत्राट व्यवहार करण्यात आल्याचा आरोप करीत संपूर्ण प्रक्रियेची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

बोर जलाशय परिसरातील शेकडो मच्छीमार, मत्स्यकामगार व मजूर कुटुंबांचा उदरनिर्वाह या जलाशयावर अवलंबून आहे. अनेक वर्षांपासून स्थानिक सहकारी संस्था व मच्छीमार येथे मासेमारीचे काम करीत आहेत. मात्र अलीकडेच मासेमारीचा कंत्राट स्थानिकांना डावलून मुंबईतील एजन्सीला तब्बल दहा वर्षांसाठी देण्यात आल्याने संतापाची लाट उसळली आहे.

या निर्णयामुळे स्थानिकांचा रोजगार धोक्यात आल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. कंत्राट देताना स्थानिक मच्छीमार सहकारी संस्था व स्थानिक हिताचा विचार करण्यात आला होता का, याची चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली. तसेच नव्या कंत्राटदाराने स्थानिक मच्छीमार व कामगारांना किमान ७५ टक्के रोजगार द्यावा, कमी मजुरीबाबत चौकशी करावी व दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी रेटून धरली.

या आंदोलनाचे नेतृत्व बसपाचे महाराष्ट्र महासचिव , जिल्हाध्यक्ष , गणेश बावणे व निखील भगत यांनी केले. आंदोलनात मोठ्या संख्येने स्थानिक मच्छीमार सहभागी झाले होते.

# जय महालक्ष्मी महिला नागरी सहकारी पतसंस्थेत आर्थिक घोटाळा

## संस्थेच्या कारभाराची चौकशी करण्याची मागणी

**धामणगाव रेल्वे/वार्ताहर**
शास्त्री चौक येथील जय महालक्ष्मी महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित या पतसंस्थेत गोरगरिबांनी कष्टाने जमविलेली आयुष्यभराची पुंजी अडकल्याने खातेदारांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून संस्थेचे आर्थिक व्यवहार ठप्प असल्याचा आरोप करत ठेवीदारांनी संस्थेच्या कारभाराची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे.




नागरिकांच्या म्हणण्यानुसार, मुलांच्या शिक्षणासाठी, मुलींच्या विवाहासाठी, शेतीच्या कामांसाठी तसेच वृद्धापकाळाच्या आधारासाठी अनेकांनी या संस्थेत लाखो रुपयांच्या ठेवी ठेवल्या होत्या. मात्र,गरजेच्या वेळी स्वतःचेच पैसे मिळत नसल्याने ठेवीदारांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेक खातेदारांनी वारंवार संस्थेच्या कार्यालयात फेऱ्या मारूनही समाधानकारक उत्तर मिळत नसल्याची खंत व्यक्त केली आहे.ठेवीदारांचा आरोप आहे की गावातील प्रतिष्ठित पत्रकार सामाजिक संस्था यांनी आता आम्हाला न्याय द्यावा व संस्थेच्या संचालक मंडळाने व संबंधित अधिकाऱ्यांनी वेळेत योग्य निर्णय घेतले नसल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची सहकार विभागामार्फत निष्पक्ष व सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

यासंदर्भात ठेवीदारांनी जिल्हाधिकारी, सहकार विभागाचे अधिकारी तसेच शासनाकडे निवेदने देण्याची तयारी सुरू केली असून, लवकरच मोठ्या आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे. 'आमचे हक्काचे पैसे आम्हाला परत मिळालेच पाहिजेत,' अशी ठाम भूमिका ठेवीदारांनी घेतली आहे. नागरिकांनी शासनाला आवाहन करत म्हटले आहे की, गोरगरिबांच्या कष्टाच्या पैशांचे संरक्षण करणे ही प्रशासनाची जबाबदारी असून, या प्रकरणात तातडीने हस्तक्षेप करून अडकलेल्या ठेवी परत मिळण्यासाठी आम्ही सर्व तालुक्यातील ग्राहकांनी आंदोलन केल्याशिवाय संस्थेला जाग येणार नाही एवढे मात्र निश्चित.



जय महालक्ष्मी बँके मध्ये गोरगरिबांचे व शेतकऱ्यांचे करोडो रुपये आज अडकले आहे या विरोधात तालुक्यातील सर्व शेतकरी बांधव व व्यापारी तसेच राजकीय पुढाऱ्यांचे सुद्धा यामध्ये पैसे अडकलेले आहे आमचे पैसे आम्हाला मिळाल्याशिवाय आंदोलन थांबणार नाही.ठेवीदारांचे हक्काचे पैसे तातडीने परत करण्यात यावेत,संपूर्ण घोटाळ्यामागे जे कोणी जबाबदार आहेत, त्यांच्यावर कडक कायदेशीर कारवाई झालीच पाहिजे अश्या मागण्या केल्या आहेत. 'हे फक्त एका बँकेला लागलेले टाळे नाही, तर हजारो कुटुंबांच्या स्वप्नांना आणि भविष्याला ठोकलेले टाळे आहे. आता प्रशासन यावर कधी जागी होणार आणि या गरीब जनतेला त्यांचा कष्टाचा पैसा कधी परत मिळणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**विनोद तलवारे**
माजी नगरसेवक, राष्ट्रवादी कॉंग्रेस अध्यक्ष

# बिअर शॉपीचा 'बार' म्हणून वापर; राजापेठ पोलिसांचा छापा

## ग्राहकांसाठी बसण्याची व्यवस्था अन् मद्यपानाची मोकळीक; संचालकाविरुद्ध गुन्हा

**अमरावती/का.प्र.**
केवळ दारू विक्रीचा परवाना असताना प्रत्यक्षात 'मिनी बार'प्रमाणे व्यवहार सुरू असलेल्या शंकरनगर येथील एका बिअर ॲण्ड वाईन शॉपीवर राजापेठ पोलिसांनी धडक कारवाई केली. ग्राहकांना दुकानातच बसवून मद्यपान करण्यासाठी जागा आणि साहित्य उपलब्ध करून दिल्याचा प्रकार उघडकीस आला असून दुकान चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.





राजापेठ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली परिसरातील अवैध धंदे, हॉटेल, धाबे आणि सार्वजनिक ठिकाणी सुरू असलेल्या बेकायदेशीर प्रकारांविरोधात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.

त्याच मोहिमेअंतर्गत सोमवारी सायंकाळी पोलीस उपनिरीक्षक मिलिंद हिवरे आणि डीबी पथक गस्त घालत असताना शंकरनगर रोडवरील 'लिकरीया बिअर ॲण्ड वाईन शॉप' येथे संशयास्पद हालचाली सुरू असल्याची माहिती मिळाली. माहितीच्या आधारे पोलिसांनी तत्काळ दुकानावर छापा टाकला. तपासणीदरम्यान दुकानात ग्राहकांना बसून दारू पिण्याची व्यवस्था करण्यात आल्याचे तसेच त्यासाठी आवश्यक साहित्य पुरविले जात असल्याचे आढळून आले. परवान्याच्या अटींचे उल्लंघन करत दुकानाचा वापर मद्यपानासाठी केला जात असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर पोलिसांनी कारवाई केली. या प्रकरणी विनोद केशवप्रसाद मालवीया (४९, रा. शंकरनगर) याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याविरुद्ध राजापेठ पोलीस ठाण्यात अपराध क्रमांक ५०१/२०२६ अन्वये महाराष्ट्र दारुबंदी कायद्यातील कलम ६८ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. कारवाईत अर्धवट भरलेल्या विदेशी बिअर व वाईनच्या बाटल्या असा ३३५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त श्याम घुगे आणि सहाय्यक पोलीस आयुक्त संजय खताळे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक मिलिंद हिवरे, पोहेकॉ मनीष करपे, रवि लिखितकर आणि पोलीस कॉन्स्टेबल अर्जुन कदम यांनी पार पाडली. दारू विक्रीचा परवाना असलेल्या दुकानांना केवळ मद्यविक्रीची परवानगी असते. ग्राहकांना दुकानात बसवून मद्यपानाची सुविधा उपलब्ध करून देणे हे नियमबाह्य असून कायद्याने दंडनीय आहे. अशा प्रकारांवर पोलिसांची विशेष नजर असून भविष्यातही अशाच धडक कारवाया सुरू राहणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

## संक्षिप्त

### आर्किटेक्चर व इंटिरियर डिझाईन क्षेत्रात करिअर घडविण्याची दहावी पास विद्यार्थ्यांना संधी

**अमरावती-**पी.आर.पोटे पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, अमरावती येथे कौन्सिल ऑफ आर्किटेक्चर व महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने तीन वर्षीय डिप्लोमा इन आर्किटेक्चर आणि डिप्लोमा इन इंटिरियर डिझाईन हे व्यावसायिक अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. हे अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना आर्किटेक्चर व इंटिरियर डिझाईन क्षेत्रातील विविध रोजगार व व्यवसाय संधी उपलब्ध होणार आहेत. विशेष बाब म्हणजे या अभ्यासक्रमासाठी फक्त दहावी उत्तीर्ण हीच पात्रता असून कोणत्याही प्रकारची प्रवेश पात्रता परीक्षा आवश्यक नाही.विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र शासनामार्फत मुलांसाठी ५० टक्के शिष्यवृत्ती तसेच मुलींसाठी १०० टक्के शिष्यवृत्ती उपलब्ध करून देण्यात आली आहे.सदर अभ्यासक्रमासाठी शासनामार्फत नोंदणी प्रक्रिया सुरू झाली असून अर्ज करण्याची अंतिम तारीख २२ जून २०२६ आहे.हा अभ्यासक्रम दहावी उत्तीर्ण विद्यार्थी, स्थापत्य पदविका/पदवीधारक, शिक्षण खंडित विद्यार्थी, गृहिणी तसेच इतर इच्छुकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.इच्छुकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेण्यासाठी तातडीने पी. आर पोटे पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, अमरावती येथे संपर्क साधावा, असे आवाहन प्राचार्य संजय देशमुख यांनी केले आहे. याकरिता दिलेल्या क्रमांकाशी संपर्क साधावा ८४४६००२३२४, ८८३०५१८४३१ असे आवाहन करण्यात आले आहे.



### बी.एस्सी. भाग-३ च्या विद्यार्थ्यांचे निकाल दुरुस्त करून घोषित करावेत

**अमरावती-** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने नुकताच जाहीर केलेल्या बी.एस्सी. भाग-३, सेमेस्टर-६ च्या निकालामध्ये एन्सिलेरी क्रेडिट्सच्या गणनेबाबत निर्माण झालेल्या गंभीर प्रश्नाकडे अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघाने विद्यापीठ प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. सोबतच शेकडो महाविद्यालयांचे प्रलंबित शुल्क न भरल्यामुळे रोखून ठेवण्यात आलेल्या निकालांच्या प्रश्नावरही महासंघाने तीव्र चिंता व्यक्त केली. या संदर्भात महासंघाच्या शिष्टमंडळाने परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली.
अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघाच्या विभागीय अध्यक्षा प्राचार्य डॉ. मीनल भोंडे यांच्या मार्गदर्शनात तसेच विभागीय महामंत्री प्रा. डॉ. मंगेश अडगोकर यांच्या नेतृत्वात शिष्टमंडळाने सदर विषय मांडले. बी.एस्सी. सीबीसीएस अभ्यासक्रमातील अनेक विद्यार्थ्यांना एन्सिलेरी क्रेडिट्स अपूर्ण असल्याचे दर्शवून अनुत्तीर्ण घोषित करण्यात आल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले. यावेळी शिष्टमंडळाने विद्यापीठाद्वारे वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या बी.एस्सी. सीबीसीएस संबंधीच्या दिशानिर्देशांचा संदर्भ देत विद्यार्थ्यांनी प्रथम वर्षातील इंडक्शन प्रोग्राम, द्वितीय वर्षातील पर्यावरण अभ्यास, इंटर्नशिप, ओपन इलेक्ट्रिव्ह, एम.ओ.ओ.सी., कौशल्य अभ्यासक्रम तसेच विविध सहशैक्षणिक व अवांतर उपक्रमांमधून प्राप्त केलेले एन्सिलेरी क्रेडिट्स अंतिम गुणपत्रिकेत योग्य प्रकारे प्रतिबिंबित झाले आहेत किंवा नाहीत, याची सखोल पडताळणी करण्याची मागणी केली. याप्रसंगी विद्यापीठाचे उपकुलसचिव राहुल नरवाडे यांच्यासह प्रा. डॉ. दिनेश खेडकर, प्रा. डॉ. धनंजय बिजवे, प्रा. डॉ. उमेश कनेरकर व प्रा. डॉ. प्रवीण परिमल आदी उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांना औद्योगिक प्रशिक्षण संस्थाबद्दल माहिती

**शिराळा-**संत गाडगेबाबा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था अमरावती येथे प्रवेश प्रक्रिया चालू झालेली असून संस्थेमध्ये रोजगाराभिमुख एक व दोन वर्ष कालावधीचे विविध व्यवसाय उपलब्ध आहेत.औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची चमु शिराळा येथे आली असता त्यांनी संस्थेतील उपलब्ध व्यवसायांची माहिती व प्रवेश प्रक्रिया बद्दल संपूर्ण माहिती दिली. तसेच दवंडी द्वारे गावातील विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली शिराळा येथील प्रवेश इच्छुक उमेदवारांनी प्रवेशा करिता संपर्क साधण्याचे आवाहन योगेश कदम, निलेश रोंघे यांनी केले आहे.विद्यार्थ्यांच्या समुपदेशनाकरिता औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे कदम, रोंघे, आगर, कावरे, चौधरी उपस्थित होते.



# श्रीक्षेत्र कौंडण्यपूर येथे कन्या कौशल्य साधना शिबीर व चौविस (२४) कुंडीय गायत्री महायज्ञ

**कुऱ्हा-**अखिल विश्व गायत्री परिवार शांति कुंज हरिव्दार तसेच श्री अंबिका देवी संस्थान श्री क्षेत्र कौंडण्यपूर आणि गायकी परिवार अमरावती यांचे वतीने अखंड दिपक व मातृशक्ती शताब्दी अनयाज कार्यक्रम कन्या कौशल्य साधना शिबीर १८ ले २१ जून पर्यंत आणि गायत्री महायज्ञ दि. २१ जून ला आयोजित केला आहे. विदर्भाची पंढरी माता रूख्मीणी प्रभू राम चंद्राची आजी माता इंदूमती अगस्त्य ऋषींची पत्नी माता लोपामुद्रा भागीरथ माता सुकेशनी यांचे माहेर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि सुप्रसिध्द श्रीसंत अच्युत महाराज यांची तपस्थली असलेले पतीत पावन तिर्थक्षेत्र वर्धा नदीच्या तीरावर वसलेले आहे.या शिबीरामध्ये विद्यार्थी जिवनात जगण्याची कला, मी कोण आहे, जिवनामध्ये अनमोल मी आहे. जशी संगती तसीच कृती, आमचे खरे मित्र कोण ह्या विषयावर उदबोधन करतील तरी या विभागातील सर्व जनतेनी वरील कार्यक्रमाचा अवश्य लाभ घ्यावा असे आयोजन श्री अंबिका देवी संस्थान श्री क्षेत्र कौंडण्यपूर व गायत्री परिवार अमरावती यांनी केले आहे.



## अविस्कार फाऊंडेशनतर्फे वसंतबाबा विद्यालय, देवरा येथे

# दोन दिवसीय रोबोटिक्स कार्यशाळेचे आयोजन

**शिराळा/वार्ताहर**
नजिकच्या देवरा,ता जि. अमरावती, येथे अविस्कार फाऊंडेशनच्या वतीने वसंतबाबा विद्यालय, देवरा येथे इयत्ता ७ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी दोन दिवसीय रोबोटिक्स कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात दिपप्रज्वलनाने करण्यात आली. महाराष्ट्र शिक्षण समिती, शिराळाच्या उपाध्यक्ष प्रतिभ मनोज देशमुख, वसंत बाबा विद्यालयाच्या मुख्याध्यापिका वैशाली देशमुख आणि अविस्कार फाऊंडेशनचे अध्यक्ष अक्षय कावळे यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करण्यात आले.या कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांना रोबोटिक्स, ऑटोमेशन, सेन्सर्स तसेच प्रोग्रामिंग यांची मूलभूत माहिती प्रत्यक्ष प्रात्यक्षिके आणि कृतीद्वारे देण्यात आली. विद्यार्थ्यांनी विविध रोबोटिक मॉडेल्स तयार करून त्यांचे संचालन केले. प्रतिभा मनोज देशमुख (उपाध्यक्ष, महाराष्ट्र शिक्षण समिती, शिराळा), वसंत बाबा विद्यालयाच्या मुख्याध्यापिका वैशाली देशमुख, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी गजानन दत्तात्रय देशमुख (उपसरपंच), तसेच अविस्कार फाऊंडेशनचे अध्यक्ष अक्षय कावळे, कार्यक्रम संचालक प्राणित मोडक, सर्किटोक्लारोचे संचालक वेदांत भेंडकर, सर्किटोक्लारोचे संचालक अभिषेक मोडक आणि त्यांच्या टीम सदस्यांची कार्यक्रमाला विशेष उपस्थिती लाभली.



कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी सहभागी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी अविस्कार फाऊंडेशनतर्फे आकर्षक ड्रोन प्रात्यक्षिक (एअर शो) सादर करण्यात आले. कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून भविष्यातही अशा नाविन्यपूर्ण व कौशल्यविकासात्मक कार्यशाळांचे आयोजन विद्यालयात करण्यात यावे, अशी अपेक्षा विद्यालय प्रशासनाने व्यक्त केली.

# आ.संजय खोडके यांनी केला नेमबाजांचा सत्कार

**अमरावती-**मुंबई येथे ३ ते ९ जूनदरम्यान आयोजित २९ व्या कॅप्टन एस. जे. इझेकियल स्मृती महाराष्ट्र राज्य नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धा (नवोदित) २०२६ मध्ये अमरावतीच्या अभय शूटिंग अकॅडमीच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत दोन सुवर्ण आणि एक रौप्य पदकाची कमाई केली आहे.स्पर्धेत मधुरा राऊत हिने महिला ज्युनियर गटातील ५० मीटर पिस्टल प्रकारात २५३ पैकी ३०० गुण मिळवत सुवर्णपदक पटकावले. या कामगिरीमुळे ती महाराष्ट्रात प्रथम क्रमांकाची नेमबाज ठरली. तसेच साहिल गवई याने सीनियर गटातील ५० मीटर पिस्टल प्रकारात २४९ पैकी ३०० गुणांची नोंद करत सुवर्णपदकावर आपले नाव कोरले आणि महाराष्ट्रात प्रथम स्थान मिळविले.याशिवाय समर्थ मारोटकर याने १० मीटर एअर पिस्टल युथ गटात ३६३ पैकी ४०० गुण मिळवत अत्यंत चुरशीच्या लढतीत रौप्यपदक जिंकले. त्याने राज्यात द्वितीय स्थान प्राप्त करून अमरावतीच्या क्रीडा क्षेत्राचा गौरव वाढविला.या यशस्वी खेळाडूंचा गौरव करण्यासाठी आ. संजय खोडके यांनी आपल्या निवासस्थानी त्यांचा सत्कार केला. यावेळी नगरसेवक प्रमोद महल्ले, योगेश सवई तसेच नगरसेवक गुड्डु धर्माळे यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांनी खेळाडूंच्या कामगिरीचे कौतुक करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.





# महाविद्यालयात निरोप समारंभ उत्साहात

**अमरावती-** रामकृष्ण शिक्षण शास्त्र महाविद्यालय,उत्तम नगर येथे 'निरोप समारंभ कार्यक्रम' उत्साहात झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कृष्णा माकोडे, प्रमुख अतिथी म्हणून डॉ.नागदेवते उपस्थित होते. प्राचार्य डॉ. कृष्णा माकोडे यांनी उद्घाटन करून मार्गदर्शक केले. तसेच शिक्षक हा नव्या पिढीचा मार्गदर्शक असतो त्यामुळे शिक्षकांचे विचार हे नेहमी प्रगल्भ असावे आणि एक शिक्षक विद्यार्थ्यांच्या अनेक पिढ्या घडवत असतो म्हणून त्यांनी स्वतःचे व्यक्तिमत्व प्रभावी,सकारात्मक व प्रेरणादायी ठेवणे आवश्यक असल्याचे त्यांनी आपल्या भाषणातून सांगितले. तसेच कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी डॉ.नागदेवते यांनी विद्यार्थ्यांना आपल्या जीवनात आलेल्या अडचणींना सतत सामोरे जा व हार न मानता सतत प्रयत्न करत राहा असा मोलाचा सल्ला दिला. B.ed द्वितीय वर्षाच्या प्रशिक्षणार्थींनी आपआपले मनोगत व्यक्त करून प्राध्यापकांबद्दल आभार व्यक्त केले. संस्मरणीय क्षणाचीआठवण म्हणून प्रथम वर्षाच्या प्रशिक्षणार्थ्यांनी द्वितीय वर्षाच्या प्रशिक्षणार्थ्यांना (Tokan of love) स्मृतिचिन्ह दिले. महाविद्यालयाचे प्रा.पुनम पाटील, प्रा.अमृता पांडव, प्रा.कीर्ती डहाने, प्रा.रुपेश गोंडाने, वानखडे उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन बीएड प्रथम वर्षाचे प्रशिक्षणार्थी आरती वर्मा व निखिल पुंडकर यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन पायल शेंद्रे या प्रशिक्षणार्थीने केले व शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# कुरळ पूर्णा येथे स्तन कॅन्सर जागरूकता शिबीर

**आसेगाव पूर्णा/वार्ताहर**
कुरळ पूर्णा येथे आनंदीता फाउंडेशन व असोसिएशन ऑफ सर्जन्स ऑफ इंडिया (ASI) यांच्या संयुक्त विद्यमाने स्तन कॅन्सर जागरूकता अभियानाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सत्यशोधक बहुउद्देशीय शिक्षण संस्था व आनंदीता फाउंडेशनच्या अध्यक्षा आ. डॉ. नयना कडू होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. राजेंद्र गनेरवाल (एक्झिक्युटिव्ह मेंबर, ASI), डॉ. जयश्री इंगोले (महाराष्ट्र राज्य समन्वयक, ब्रेस्ट कॅन्सर अवेअरनेस प्रोग्राम, ASI), डॉ. रजनी गिरी (स्त्रीरोगतज्ज्ञ), सुवर्णा जवंजाळ (प्राचार्य, शिवाजी कला महाविद्यालय, आसेगाव पूर्णा तथा सचिव, आनंदीता फाउंडेशन) व डॉ. अरुणा काकडे उपस्थित होत्या. राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रास्ताविक सुवर्णा जवंजाळ यांनी केले. यावेळी उपस्थित आशा सेविकांना डॉ. राजेंद्र गनेरवाल यांनी मार्गदर्शन केले. डॉ. जयश्री इंगोले यांनी स्तन कॅन्सरची लक्षणे, तपासणी व प्रतिबंधात्मक उपाय याबाबत दृकश्राव्य माध्यमांच्या साहाय्याने प्रशिक्षण दिले तसेच प्रात्यक्षिके सादर केली. डॉ. रजनी गिरी यांनी गर्भाशयाच्या कॅन्सरची कारणे, लक्षणे व प्रतिबंधात्मक उपाय याविषयी सविस्तर माहिती देऊन आशा सेविकांना प्रशिक्षण दिले. महिलांमध्ये वाढत्या कॅन्सरच्या आजारांबाबत जागरूकता निर्माण करून वेळेत निदान व उपचार झाल्यास अनेकांचे जीवन वाचू शकते, असे वक्त्यांनी सांगितले. अध्यक्षीय समारोपात डॉ. नयना कडू यांनी महिलांच्या आरोग्याबाबत जनजागृतीची आवश्यकता अधोरेखित केली. आभार प्रदर्शनानंतर कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.




# अजय देशमुख यांचा अभिष्टचिंतन व गौरव सोहळा १८ जून रोजी

**अमरावती-**श्री अजय देशमुख सत्कार समिती, शिक्षकेतर कर्मचारी संघटना, मागासवर्गीय कर्मचारी संघटना आणि ऑफिसर्स फोरम यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठ कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष अजय देशमुख यांचा वाढदिवस व सेवानिवृत्ती निमित्ताने अभिष्टचिंतन व गौरव सोहळ्याचे येत्या १८ जून रोजी सायं. ६ वा. विद्यापीठ परिसरातील डॉ. के.जी. देशमुख सभागृह येथे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्ताने त्यांच्या कार्यप्रवासाचा प्रेरणादायी आढावा घेणा-या गौरव स्मरणिकेचे प्रकाशन होणार असून अजय देशमुख यांचा यावेळी सपत्नीक सत्कार करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्रमुख अतिथी म्हणून प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, उच्च शिक्षण संचालक डॉ. शलेंद्र देवळाणकर, उमरगा-लोहाराचे माजी आ. ज्ञानराज चौगुले, नुटा संघटनेचे अध्यक्ष डॉ. प्रवीण रघुवंशी, प्राचार्य फोरमचे अध्यक्ष डॉ. राधेशाम सिकची, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, प्रकाश म्हसे, डॉ. कैलास सांडू पार्थीकर, दिनेश दखणे, रावसाहेब त्रिभूवन, मिलींद भोसले, विद्यापीठ अधिकारी फोरमचे अध्यक्ष शशीकांत रोडे, मागासवर्गीय कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष डॉ. नितीन कोळी, ज्ञानेश्वर बारस्कर यांची उपस्थिती राहणार आहे.



# १८ जूनला भक्तीधामचा, पंढरपूर पालखी दिंडी प्रस्थान सोहळा

**चांदूरबाजार/वार्ताहर**
मागिल ३४ वर्षा पासून स्थानिक भक्तीधाम येथून संत श्री गुलाबराव महाराज यांची, पायदळ दिंडी पालखी पंढरपूरला जात आहे. सालाबादप्रमाणे यावर्षी ही १८ जून ला श्री महाराजांच्या पालखीचे, पंढरपूर कडे प्रस्थान होत आहे. या निमित्ताने संत श्री गुलाबराव महाराज सेवा संस्था बोराळा व्दारे, १८ जून ला दुपारी ४ वाजता पालखी प्रस्थान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा भक्तीमय सोहळा स्थानिक भक्तीधामच्या , ज्ञानेश्वर माऊली सभागृहात होणार आहे. यावर्षी संत श्री गुलाबराव महाराज यांच्या पालखीचे पूजन आश्विनी व आ. प्रवीण तायडे,मनिषा व भास्कर टोम्पे व मंजुषा व विवेक राऊत या मान्यवरांच्या हस्ते सपत्नीक करण्यात येणार आहे. संत श्री.गुलाबराव महाराज यांचे ग्रंथ रूपाने असलेली अथांग ज्ञान संपदा, वारकरी संप्रदायाला विशेष संजीवनी देणारी आहे.त्यामुळे श्री.महाराजांच्या या पालखी प्रस्थान व पालखी पूजन सोहळ्याला, वारकरी परिवारात अनन्यसाधारण महत्त्व आहे.



३२ दिवसांचा पायी प्रवास करून,श्री महाराजांची पालखी २० जुलै ला पंढरपूर येथे पोहोचेल.त्यानंतर २९ जुलै ला पंढरपूर येथून पालखीचा परतीचा प्रवास सुरू होईल. हा पालखी पूजन सोहळा, संस्थेचे अध्यक्ष रवींद्र इंगोले यांचे अध्यक्षतेखाली होणार आहे.या प्रसंगी प्रा.केशव ठाकरे, दिनकर काळे, पंडितराव मोहोड, प्रा.डॉ.अरविंद देशमुख, सतिश मोहोड, ह.भ.प. श्रीधर महाराज आवारे,ह.भ.प.रामदास महाराज राजगुरू, ह.भ.प.संतोष महाराज निंबाळकर तथा पालखी व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष समाधान दुर्वे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.तरी परिसरातील भाविक भक्तांनी या पालखी पूजन सोहळ्याचा, भक्तीप्रद आनंद अनुभवण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे. असे आवाहन सोहळा आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## अस्तित्वाची लढाई

**भा**रताला कृषिप्रधान देश म्हटले जात असले, तरी प्रत्यक्षात येथील शेतकरी आज अत्यंत हवालदिल आणि निराश झाला आहे. महाराष्ट्रात दुष्काळ हा शेतकऱ्याच्या पाचवीलाच पूजला आहे, हे जळजळीत सत्य त्याने आता स्वीकारले असून निसर्ग आणि सरकार या दोन्हीकडून फारशी अपेक्षा न ठेवता, केवळ पोटापुरते अन्न कसे पिकवता येईल, एवढाच मर्यादित विचार आजचा शेतकरी करत आहे. बंगालच्या ऐतिहासिक दुष्काळात दहा लाख लोकांचे बळी गेले होते, आज तीच भयावह परिस्थिती शेतकरी आत्महत्येच्या वाढत चाललेल्या आलेखाच्या रूपाने महाराष्ट्रात पहायला मिळत आहे. बंगालमधील अमर्त्य सेन यांनी या जागतिक समस्येवर संशोधन करून पुस्तके लिहिली. त्यासाठी त्यांना नोबेल पुरस्कार मिळाला; त्यानंतर जगातील अनेक देशांनी आपल्या अन्नदात्याची काळजी घेण्यास सुरुवात केली. भारतात मात्र अजूनही शेतकऱ्यांच्या मूलभूत प्रश्नांना बगल दिली जात आहे. यंदाच्या हंगामात कमी पावसाची शक्यता असल्याने शेतकऱ्यांवर मोठे संकट येण्याची चिन्हे आहेत. या आपत्तीची कल्पना असल्याने राज्य सरकारने कर्जमाफी आणि पीक विमा योजना जाहीर केल्या आहेत, परंतु या योजना वरवरच्या असून अमेरिका किंवा इस्त्रायलसारख्या देशांच्या तुलनेत त्या अजिबात आकर्षक नाहीत. आजपर्यंत कोणत्याही सरकारने शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य हमीभाव आणि संपूर्ण खरेदीची खात्री दिलेली नाही तसेच बँकांकडे फेऱ्या मारूनही शेतकऱ्यांना सहजासहजी कर्ज मिळत नाही, कारण बँकांच्या लेखी शेतकऱ्याची पत खिजगणतीलाही नसते. शेतमाल विकून चार पैसे नफा मिळावा अशी कोणतीही सक्षम व्यवस्था आज भारतात अस्तित्वात नाही, हीच या व्यवस्थेची सर्वात मोठी शोकांतिका आहे. भारतात किमान आधारभूत किंमत (एमएसपी) कागदावर असली, तरी प्रत्यक्षात शेतकऱ्याला आपला माल अत्यंत कमी दराने व्यापाऱ्यांच्या दावणीला विकावा लागतो आणि मालाच्या खरेदीची कोणतीही कायदेशीर हमी नसल्यामुळे भारतीय शेतकरी कायम तोट्यात राहतो.परदेशात शेतकऱ्याला उद्योगपतींइतकाच सन्मान मिळतो आणि बँका त्यांना अत्यंत सुलभतेने, कमी व्याजात कर्ज पुरवतात; भारतात मात्र परिस्थिती उलटी असून, बँका बड्या उद्योगपतींचे कोट्यवधींचे कर्ज सहज माफ करतात, पण अल्पभूधारक शेतकऱ्याला काही हजारांच्या कर्जासाठीही अपमानास्पद वागणूक दिली जाते, त्याची आर्थिक पत आणि जमिनीचे मूल्य बँकांच्या व्यवस्थेत कवडीमोल मानले जाते, ज्यामुळे शेतकरी खाजगी सावकारांच्या पाशात अडकतो. आज जगभरात सेंद्रिय पद्धतीने उत्पादित केलेल्या शेतमालाला प्रचंड मागणी आहे आणि ग्राहक त्यासाठी मोठी किंमत मोजायला तयार आहेत तसेच भारतातील बहुतांश पारंपरिक शेती ही सेंद्रिय स्वरूपाचीच आहे,तरीही भारताच्या शेतकऱ्याला परदेशातील बाजारपेठेत आपले उत्पादन विकण्याची संधी किंवा पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जात नाहीत; आम्ही वारंवार ही बाब सरकारच्या निदर्शनास आणून दिली, पण त्याकडे गांभीर्याने पाहिले गेले नाही. इतर प्रगत देशांमध्ये कृषी संशोधनावर दरवर्षी अब्जावधी डॉलर्सचा निधी खर्च केला जातो; तिथे हवामानबदल, पिकांवर पडणारे नवीन रोग, पाण्याचे सूक्ष्म नियोजन आणि कमी जागेत जास्त उत्पादन वाढवणे यांवर सातत्याने सरकारी प्रयोगशाळांमध्ये अहोरात्र संशोधन चालते आणि त्याचे निष्कर्ष थेट शेतकऱ्याच्या बांधापर्यंत पोहोचवले जातात, आपल्याकडील कृषी विद्यापीठे संशोधनापेक्षा प्रशासकीय कामातच जास्त व्यस्त दिसतात,परिणामी जागतिक दर्जाच नवीन तंत्रज्ञान, बदलत्या हवामानाला तोंड देणारी उत्तम दर्जाची बियाणे आणि ठिबक सिंचनाचे योग्य नियोजन सामान्यातल्या सामान्य आणि गरीब शेतकऱ्यापर्यंत वेळेत पोहोचतच नाही. त्यामुळे जागतिक स्पर्धेत आणि उत्पादकतेच्या शर्यतीत आपला शेतकरी खूप मागे पडल आहे. देशात सामान्य नागरिक, नोकरदार आणि संघटित कामगारांसाठी अनेक आंदोलने झाली. त्यातून त्यांच्या हक्कांचे विविध कायदे अस्तित्वात आले, परंतु संपूर्ण देशाचा आर्थिक कणा असलेल्या आणि जनतेला अन्न पुरवणाऱ्या शेतकऱ्यांच्या हक्कासाठी असे ठोस, कायदेशीर संरक्षण देणारे कायदे बनवण्याचे प्रामाणिक प्रयत्न कोणत्याही राजकीय पक्षाने केले नाहीत. मी स्वतः जगातील तब्बल १०२ देश फिरून, तिथल्या सरकारांनी शेतक-यांच्या कल्याणासाठी केलेले कायदे, दिलेली अनुदाने आणि सवलती यांचा अभ्यास करून पाचशे पानांचे एक विस्तृत निवेदन तयार केले तसेच नीती आयोगाच्या विशेष मागणीनुसार त्याचे ४५ पानांचे संकलित रूप सादर केले होते, पण आजही ते सरकारदरबारी धूळखात पडून आहे. केवळ पावसाच्या लहरी पाण्यावर आणि संपूर्णपणे निसर्गाच्या मेहेरबानीवर अवलंबून असलेल्या महाराष्ट्रातील जवळपास ८५ टक्के कोरडवाहू शेतकऱ्यांची व्यथा,वेदना आणि हलाखीची परिस्थिती पाहिल्यावर खरोखरच मन सून्न होते आणि ही व्यवस्था विचार करायला लावते. शेतकरी आज बिकट लढाई लढत असून कृषिप्रधान देशात अन्नदात्याला आपल्या मूलभूत मानवी हक्कांसाठी एवढा संघर्ष करावा लागतो, ही या शतकातील सर्वात मोठी शोकांतिका आणि लोकशाहीचा पराभव आहे. एकंदरीत पाहता, निसर्गाचा लहरीपणा आणि सरकारी अनास्थेमुळे महाराष्ट्रातील शेतकरी मरणाच्या दारात आहे: त्याला केवळ कर्जमाफी नको, तर। जागतिक स्तराप्रमाणे कायद्याचे कवच, हमीभाव आणि सन्मानाचा पतपुरवठा मिळणे हीच काळाची गरज आहे. महाराष्ट्रातील शेती आणि शेतकरी आज अत्यंत कठीण कालखंडातून जात असून येणारा हंगाम आणि त्यापुढील काळ केवळ परीक्षा नसून, अस्तित्वाची थेट लढाई आणि कठोर अग्निपरीक्षा पाहणारा ठरणार आहे. तात्पुरती कर्जमाफी, तुकड्या-तुकड्याने दिली जाणारी मदत किंवा निवडणुकांपुरती मर्यादित असणारी घोषणाबाजी या चक्रव्यूहातून शेतकऱ्याला बाहेर काढू शकत नाही. प्रगत जागतिक स्तराप्रमाणे भारतीय शेतकऱ्याच्या शेतमालाला कायदेशीर हमीभावाचे भक्कम कवच मिळत नाही, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेची दारे थेट खुली केली जात नाहीत आणि बँकांकडून सन्मानाने सुलभ पतपुरवठा केला जात नाही, तोपर्यंत शेतकरी सुखी आणि चिंतामुक्त होणार नाही; आता सरकारने राजकीय इच्छाशक्ती दाखवावी आणि शेतीधोरणात क्रांतिकारी, पायाभूत बदल करण्याचे धाडस दाखवायला हवे. ही ऐतिहासिक संधी गमावल्यास अन्नदात्याच्या आत्महत्येची जीवघेणी मालिका या देशाच्या प्रगतीला कायम काळिमा फासत राहील.

# शेतीची पद्धतशीर लूट, अंतर्गत वसाहतवाद आणि भारतीय अर्थकारणाची शोकांतिका

## शरद जोशी यांच्या सिद्धांताचे महा-विश्लेषण



**शेतकऱ्याला कोणत्याही सवलतीची किंवा मेहेरबानीची गरज नाही त्याला गरज आहे ती फक्त स्वातंत्र्याची-व्यापार स्वातंत्र्याची आणि घामाच्या रास्त दामाची! जोपर्यंत 'भारत' स्वतंत्र आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम होत नाही, तोपर्यंत 'इंडिया'चा विकास हा वाळूवर उभारलेल्या इमारतीसारखा पोकळच राहील.**

**स्वा**तंत्र्योत्तर भारताच्या आर्थिक आणि सामाजिक इतिहासाचे मूल्यमापन करताना, ग्रामीण भारताच्या शोषणाची मांडणी इतक्या प्रखरतेने, शास्त्रशुद्धपणे आणि सांख्यिकीय तर्कावर आधारित करणारा दुसरा नेता झाला नाही. शेतकरी संघटनेचे प्रणेते, जागतिक दर्जाचे अर्थतज्ज्ञ आणि विचारवंत आदरणीय शरद जोशी यांनी भारतीय व्यवस्थेला जो आरसा दाखवला, त्याचा पाया एका अत्यंत क्रांतीकारी सिद्धांतात आहे.

या लेखा मध्ये उद्धृत केलेले त्यांचे वाक्य केवळ एक राजकीय घोषणा नाही, तर तो जागतिक आणि भारतीय अर्थव्यवस्थेच्या रचनेवर केलेला एक ऐतिहासिक प्रहार आहे.'शेतीला लुटून भांडवल निर्मिती करायची व त्या आधारे कारखानदारी उभारायची हे सर्व दुःखाचे व समस्येचे मूळ आहे.'

आज आपण २०२६ च्या प्रगत डिजिटल आणि औद्योगिक युगात जगत असतानाही, शेतीचे संकट, शेतकऱ्यांचे संप, वाढता कर्जबाजारीपणा आणि आत्महत्यांचे दुर्दैवी सत्र थांबलेले नाही. जर आपल्याला या संकटाचा कायमचा शेवट करायचा असेल, तर शरद जोशींनी मांडलेल्या या 'दुःखाच्या मूळा'चा, म्हणजेच शेतीच्या पद्धतशीर लुटीच्या अर्थकारणाचा सखोल अभ्यास करावा लागेल.

### भांडवल निर्मितीचा इतिहास आणि देशांतर्गत शोषणाचा पाया

जगातील कोणत्याही देशाचा प्रवास जेव्हा शेतीप्रधान व्यवस्थेकडून आधुनिक औद्योगिक आणि सेवाप्रधान व्यवस्थेकडे होतो, तेव्हा तिथे 'भांडवल निर्मिती' (Capital Formation) होणे अपरिहार्य असते. कारखाने, पोलाद उद्योग, पायाभूत सुविधा, बंदरे, रेल्वेचे जाळे आणि मोठी धरणे उभारण्यासाठी अब्जावधी रुपयांच्या भांडवलाची गरज असते. हे भांडवल गोळा करण्यासाठी इतिहासाने जगाला दोन मुख्य मार्ग दाखवले

**बाह्य वसाहतवाद (External Colonialism)**

युरोपियन देशांनी, विशेषत ब्रिटन, फ्रान्स आणि स्पेनने, आशिया आणि आफ्रिकेतील देशांना गुलाम बनवले. त्यांनी या वसाहतींमधून कच्चा माल, हिरे-मोती, आणि अन्नधान्य अत्यंत स्वस्त दरात किंवा बळजबरीने लुटून नेले. या लुटीतून त्यांनी स्वतःच्या देशात प्रचंड भांडवल उभे केले, ज्याच्या जोरावर तिथली 'औद्योगिक क्रांती' (Industrial Revolution) यशस्वी झाली. म्हणजेच, पाश्चात्त्य देशांच्या कारखानदारीचा पाया परकीय देशांच्या शोषणावर होता.

**अंतर्गत वसाहतवाद (Internal Colonialism):**

१९४७ मध्ये जेव्हा भारत स्वतंत्र झाला, तेव्हा देशासमोर कारखानदारी उभी करण्याचे मोठे आव्हान होते. पण भारताकडे शोषण करण्यासाठी कोणतीही परकीय वसाहत नव्हती. अशा वेळी तत्कालीन धोरणकर्त्यांनी (ज्याला शरद जोशी 'नेहरूवादी समाजवादाचे मॉडेल' म्हणायचे) अत्यंत सोपा पण क्रूर मार्ग निवडला. त्यांनी देशाच्या आतच एक हक्काची वसाहत शोधली-ती वसाहत म्हणजे 'ग्रामीण भारत' म्हणजेच 'शेती क्षेत्र'. स्वतःच्याच देशातील शेतीची पद्धतशीर लूट करून, तिथला नफा शहरांमधील अवजड उद्योगांकडे वळवायचा, हाच भारताच्या औद्योगिक विकासाचा पाया ठरला.

### 'इंडिया' विरुद्ध 'भारत' - एक आर्थिक युद्ध

शरद जोशी यांनी भारतीय समाजाची ढोबळमानाने दोन भागांत विभागणी केली, जी केवळ भौगोलिक नव्हती तर ती पूर्णपणे आर्थिक आणि सांस्कृतिक होती.इंडिया हा तो वर्ग आहे जो शहरांमध्ये राहतो, इंग्रजी भाषिक आहे, ज्याच्या हातात धोरणे ठरवण्याची सत्ता आहे. यात मोठे उद्योगपती, नोकरशहा (Bureaucrats), राजकारणी आणि संघटित क्षेत्रातील कामगार येतात.

भारत हा तो वर्ग आहे जो खेड्यापाड्यात राहतो, शेती करतो, शेतमजुरी करतो किंवा शेतीवर आधारित छोटे व्यवसाय करतो. हा वर्ग अंगावर घाम गाळून संपूर्ण देशाचे पोट भरतो, पण सत्तेच्या आणि धोरणांच्या निर्णयप्रक्रियेपासून मैलोनमैल दूर आहे.

बाजारपेठेचा एक मूलभूत नियम आहे-'जो उत्पादक असतो, तो आपल्या वस्तूची किंमत ठरवतो.' कापडाचा कारखानदार कापडाची किंमत ठरवतो, बिस्किट बनवणारी कंपनी बिस्किटाची किंमत ठरवतो. या किंमतीमध्ये त्यांचा कच्चा माल, मजुरी, वीज, वाहतूक खर्च आणि स्वतःचा नफा (Profit Margin) समाविष्ट असतो.

परंतु,'भारतात' राहणाऱ्या शेतकऱ्याला त्याच्या मालाची किंमत ठरवण्याचा कोणताही अधिकार दिला गेला नाही. तो कापूस पिकवतो पण कापसाचा भाव कापड गिरणीचे मालक आणि सरकार ठरवते तो ऊस पिकवतो पण उसाचा भाव साखर कारखानदार आणि सरकार ठरवते. जेव्हा उत्पादकाला स्वतःच्या मालाची किंमत ठरवण्याचे स्वातंत्र्य नसते, तेव्हा तिथे खुल्या बाजारपेठेचा नियम संपतो आणि शोषणाची प्रक्रिया सुरू होते.

### 'स्वस्त अन्नधान्य धोरण' (Cheap Food Policy) हेच शोषणाचे शस्त्र

शहरांमधील कारखानदारी वेगाने वाढवण्यासाठी कारखानदारांना स्वस्त मजूर हवे होते. मजुरांचे पगार कमी ठेवायचे असतील, तर त्यांच्या रोजच्या जगण्याचा खर्च (Cost of Living) कमी असणे आवश्यक होते. जर अन्नधान्य, भाजीपाला, दूध आणि कापड महाग झाले, तर शहरी कामगार जास्त पगाराची मागणी करतील, ज्यामुळे कारखानदारांचा नफा कमी होईल. कारखानदारांचा नफा सुरक्षित ठेवण्यासाठी सरकारने 'पद्धतशीरपणे शेतीमाल स्वस्त ठेवण्याचे धोरण' राबवले.यासाठी खालील धोरणात्मक हत्यारांचा वापर करण्यात आला

**कृत्रिम आयात-**(Artificial Imports) देशात शेतकऱ्यांनी भरपूर उत्पादन घेऊनही, जेव्हा बाजारात भाव वाढण्याची शक्यता असायची, तेव्हा सरकार तातडीने परदेशातून धान्य किंवा खाद्यतेल आयात करायचे, जेणेकरून देशांतर्गत बाजारपेठेतील भाव पाडले जावेत.

**निर्यातबंदी-**(Export Restrictions) आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत जेव्हा कापूस, कांदा, तांदूळ किंवा साखरेला सोन्यासारखा भाव मिळायचा आणि शेतकऱ्याला चार पैसे कमावण्याची संधी असायची, तेव्हा शहरी ग्राहकांना आणि कारखानदारांना खुश करण्यासाठी सरकार एका रात्रीत निर्यातबंदी लादायचे.

**झोनिंग आणि साठा मर्यादा-**(Zoning and Stock Limits) शेतकऱ्याचा माल एका राज्यातून दुसऱ्या राज्यात नेण्यावर बंदी घातली गेली, जेणेकरून स्थानिक व्यापाऱ्यांना स्वस्तात माल लुटता यावा.

शरद जोशी या संपूर्ण चक्राला 'उणे अनुदान' (Negative Subsidy) म्हणायचे. जागतिक बँकेच्या नियमांनुसार मोजले असता, भारताने शेतकऱ्यांना खते किंवा विजेवर जेवढे अनुदान दिले, त्यापेक्षा कित्येक पटीने जास्त पैसा या चुकीच्या धोरणांमुळे शेतकऱ्यांच्या खिशातून काढून घेतला गेला. जगाला वाटले की सरकार शेतकऱ्याला सांभाळत आहे, पण प्रत्यक्षात शेती क्षेत्राकडून शहरांकडे अब्जावधी रुपयांचे छुपे हस्तांतरण (Hidden Transfer of Wealth) होत होते.

दुःखाचे मूळ-कर्जबाजारीपणा आणि आत्मसन्मानाची लढाई

आज प्रसारमाध्यमांमध्ये किंवा राजकीय व्यासपीठांवर शेतीच्या संकटाची जी कारणे सांगितली जातात (उदा. दुष्काळ, अतिवृष्टी, शेतकऱ्यांचे अज्ञान), ती वरवरची आहेत. दुष्काळ हा निसर्गाचा नियम आहे, तो तात्कालिक असतो. पण आर्थिक शोषण हे मानवनिर्मित आणि बारमाही असते.

कर्जबाजारीपणा का वाढतो? शेतकरी कर्जात जन्माला येतो आणि कर्जातच मरतो, कारण तो प्रत्येक हंगामात तोट्याचा व्यापार करतो. त्याचा उत्पादन खर्च दरवर्षी वाढतो (खते, बियाणे, मजुरी महाग होते), पण त्याच्या शेतीमालाचे भाव मात्र सरकारच्या नियंत्रणामुळे जागच्या जागीच राहतात. सातत्याने होणारा हा तोटा भरून काढण्यासाठी तो बँकांचे आणि सावकारांचे उंबरठे झिजवतो.

अनुदानाच्या कुबड्या विरुद्ध घामाचे दाम शरद जोशींनी शेतकऱ्यांना एक नवा विचार दिला. त्यांनी सांगितले की,'शेतकऱ्यांनो, सरकारकडे कर्जमाफी किंवा अनुदानाची भीक मागू नका. उलट सरकारला सांगा की, तुम्ही आजपर्यंत आमच्या मालाचे भाव पाडून जी आमची अब्जावधी रुपयांची लूट केली आहे, ती व्याजसकट आधी परत करा.' त्यांनी शेतकऱ्याला 'याचक' नव्हे तर 'नियोक्ता' बनवण्याचे स्वप्न पाहिले.

### समकालीन संदर्भ (२०२६ मधील वास्तव)

आज आपण २०२६ मध्ये जगत आहोत. भारत पाच ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनण्याच्या गोष्टी करत आहे, कॉर्पोरेट क्षेत्रातील कंपन्यांचे अब्जावधी रुपयांचे कर (Corporate Tax) माफ केले जात आहेत, बँकांचे मोठे थकीत कर्ज 'राईट ऑफ' केले जात आहे. मात्र, दुसरीकडे जेव्हा शेतकऱ्याला त्याच्या मालाला कायदेशीर हमीभाव (Legal MSP) देण्याची मागणी होते, तेव्हा देशाचे बजेट कोलमडेल, अशी भीती अर्थतज्ज्ञांकडून घातली जाते.

**हवामान बदलामुळे-**(Climate Change) आज शेती आधीच अत्यंत बेभरवशाची झाली आहे. त्यातच जेव्हा आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत तेजी येते, तेव्हा देशांतर्गत शहरी मतदारांना खुश करण्यासाठी किंवा कारखानदारांचा कच्चा माल स्वस्त ठेवण्यासाठी लगेचच व्यापार स्वातंत्र्य रोखले जाते.

शरद जोशी साहेबांनी १९८० ला मांडलेला विचार आज २०२६ मध्येही तितकाच जिवंत आणि बोचणारा आहे, कारण आजही कारखानदारी आणि सेवा क्षेत्राच्या वाढीसाठी शेतीचा बळी दिला जात आहे.

### मुक्तीचा मार्ग-नवीन आर्थिक जाहीरनामा

जोपर्यंत हे 'दुःखाचे मूळ' उपटून टाकले जात नाही,तोपर्यंत भारतातील कोणतीही शेतीविषयक योजना, मग ती कितीही मोठी असली तरी, यशस्वी होऊ शकत नाही. जर भारताला खऱ्या अर्थाने एक आर्थिक महासत्ता बनायचे असेल, तर 'भारताच्या' शोषणावर 'इंडिया'ची इमारत उभी करणे बंद करावे लागेल.यासाठी खालील क्रांतीकारी बदलांची आवश्यकता आहे

बाजारपेठेचे संपूर्ण स्वातंत्र्य शेतकऱ्याला त्याचा माल देशात किंवा परदेशात, जिथे जास्त भाव मिळेल तिथे विकण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असावे. शेतीमालावरील निर्यातबंदी, साठवणुकीचे निर्बंध (Essential Commodities Act) हे कायदे कायमचे मोडीत काढले पाहिजेत.

तंत्रज्ञानाचे स्वातंत्र्य जागतिक पातळीवर स्पर्धा करण्यासाठी भारतीय शेतकऱ्याला आधुनिक जीएम (GM) बियाणे, प्रगत तंत्रज्ञान, ड्रोन आणि आधुनिक सिंचन सुविधांचा वापर करण्याचे स्वातंत्र्य असावे, त्यावर सरकारी नोकरशाहीचे कोणतेही नियंत्रण नसावे.

शेतीवर आधारित प्रक्रिया उद्योग कच्चा माल विकण्याऐवजी ग्रामीण भागातच शेतीमालावर प्रक्रिया करणारे कारखाने (Agro-processing units) उभारले पाहिजेत, जेणेकरून शेतीमधील नफा ग्रामीण भागातच राहील.

शेतीला उद्योगाचा दर्जा शेतीकडे एक 'कल्याणकारी' किंवा 'गरीब' क्षेत्र म्हणून न पाहता, त्याला एक व्यावसायिक उद्योग मानून तिथे कॉर्पोरेट धर्तीवर भांडवली गुंतवणूक वाढवली पाहिजे.

'शेतीला लुटून उभारलेली कारखानदारी ही कधीही शाश्वत असू शकत नाही.' शरद जोशींचा हा विचार केवळ शेतकऱ्यांच्या हक्काची लढाई नव्हती, तर ती भारताला आर्थिक गुलामगिरीतून मुक्त करणारी एक वैचारिक चळवळ होती. जोपर्यंत हा विचार देशाच्या आर्थिक धोरणांचा गाभा बनत नाही, तोपर्यंत ग्रामीण भारताच्या चेहऱ्यावर हसू येणार नाही.

शेतकऱ्याला कोणत्याही सवलतीची किंवा मेहेरबानीची गरज नाही त्याला गरज आहे ती फक्त स्वातंत्र्याची-व्यापार स्वातंत्र्याची आणि घामाच्या रास्त दामाची! जोपर्यंत 'भारत' स्वतंत्र आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम होत नाही, तोपर्यंत 'इंडिया'चा विकास हा वाळूवर उभारलेल्या इमारतीसारखा पोकळच राहील.

**विलास तुळशीराम ताथोड**
राज्य कार्यकारणी सदस्य
शरद जोशी द्वारा स्थापित
शेतकरी संघटना,अकोला
७०२०५८५२६१

# विकसित भारताचे मनोहर चित्र?

**अ**लीकडे एका आरएसएसमधल्या मित्राशी बोलत होतो. अमेरिकन नेव्हीच्या हल्ल्यात तीन भारतीय मर्चंट शिप्सवरचे तीनजण ठार झाले; पण मोदींनी अद्याप दोन ओळीदेखील लिहून निषेध केलेला नाही. सर्वाधिक काळ सत्तेवर राहिलेले पंतप्रधान म्हणून ट्रम्पने केलेल्या अभिनंदनाच्या पोस्टला मात्र उत्तर दिले. हे कसे काय असे विचारल्यावर तो म्हणाला यामागे काही आंतरराष्ट्रीय, भूराजकीय कारणे असू शकतात. आपल्याला कदाचित अजून ती माहीत नसतील. यावर मी काही बोललो नाही. नेहरूंचे यच्चयावत सर्व निर्णय चुकीचे होते हे अत्यंत आत्मविश्वासाने सांगताना त्या निर्णयांमागे आंतरराष्ट्रीय, भूराजकीय वगैरे तर सोडाच, नगरपालिका पातळीवरचीदेखील कारणे नसणार कारण नेहरू इज इक्वल टू चुकीचे निर्णय हे डिफॉल्ट सेटिंग आहे असे म्हणणार होतो; पण म्हणालो नाही. चर्चेदरम्यान 'सगळे सारखेच असतात' हे मात्र त्याचे ठाम मत असल्याचे लक्षात आले. साक्षात दैवी अवतार असलेले नरेंद्र मोदी आणि भारताला नवसंजीवनी देण्यासाठी जन्माला आलेला भाजप हे एकेकाळचे समीकरण आता 'सगळे सारखेच असतात' इथवर आले आहे हेही नसे थोडके असे मी मनात म्हटले. (पुलंच्या भाषेत बोलायचे तर आम्ही मनातच म्हणत मरणार! अर्थात आता फेसबुक आहे म्हणा. पण ते असो.)

भाजपचे कुणी सोशल मीडिया अधिकारी प्रकाश गाडे यांनी आज वाढदिवसानिमित्त देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतल्याची पोस्ट पाहिली. काही दिवसांपूर्वी त्यांच्या एका पोस्टवर एका बाईंनी सिलेंडर महाग झाल्याबद्दल कमेंट केली होती त्यावर 'तुम्हाला परवडत नसेल तर वापरू नका सिलेंडर' असे त्यांनी म्हटल्याचे वाचले होते. नागरिकांशी इतक्या आपुलकीने बोलणारा आयटी सेल कार्यकर्ता शोधून तरी सापडेल का? ही कमेंट वाचली त्याच्या काही दिवस आधीच अभिजीत दिपके, कॉक्रोच जनता पार्टी वगैरे लोकांचा उद्देशच अराजक माजवणे हा आहे अशी एका भाजप समर्थक मित्राची कमेंट वाचल्यावर मात्र न राहवून मी म्हटले की याला अराजक कसे म्हणता येईल? परीक्षा रद्द होणे वरचेवर घडते आहे. चार मुलांनी आत्महत्या केल्या. त्यावर संतापून कुणी आंदोलन केले तर त्याला अराजक म्हणायचे का? केंद्रात जर भाजपेतर पक्षांचे सरकार असते आणि कुणी असे आंदोलन केले असते तर तेव्हाही ते अराजक ठरले असते का? त्यावर काही रिप्लाय आला नाही.




देवेंद्र फडणवीस यांनीदेखील कॉक्रोच जनता पार्टीला अराजक माजवणारे म्हटले होतच. अर्थात ते बरोबरच आहे. ज्यांना वास्तविक शांततेचे नोबेल मिळायला हवे असे शांतिदूत नीलेश राणे त्यांच्या मंत्रीमंडळात असताना कॉक्रोच पार्टीवाले अराजकवादीच असणार हे उघड आहे. स्टॅंडर्डच एवढे उच्च आहे की अन्य कुणीही अराजकवादीच वाटणार. आज केवळ नीलेश राणे आहेत म्हणून महाराष्ट्रात हिंदू-मुस्लिम स्नेहभाव टिकून आहे. अन्यथा काय झाले असते आपल्या महाराष्ट्राचे? कल्पनाही करवत नाही!

कॉक्रोच पार्टीच्या जंतरमंतरवरील आंदोलनात 'जय श्रीराम' म्हणत घुसलेल्या कुण्या हिंदुत्ववादी संघटनेच्या लोकांचे बाइट्स बघणे फार उद्बोधक होते. तो इतक्या आत्मविश्वासाने बोलत होता की मला 'पिस्तुल वापरले असते तरी हरकत नव्हती' म्हणणारे दुसरे शांतिदूत तुषार दामगुडे यांचीच आठवण झाली आणि अंगावर शहारे आले. त्या आंदोलनात सामील झालेल्या ट्रान्सजेंडर्सबद्दल अवमानकारक, अत्यंत अश्लाघ्य भाषेत बोलणारे लोकही होते. तेही एकूण परंपरेला साजेसच होते. ऊर भरून आला!

आणि आज अभिजीत दिपकेला मारहाण झाल्याची बातमी वाचली. हल्लेखोर हिंदुत्ववादी विचारांचे आहेत असे उघडकीस आल्याचे दिसले. त्यातला एकजण 'पेपर लीक झालाच नाही' असे म्हणाला. मला त्याला कडकडून मिठी मारावीशी वाटली. हाच अश्राप जीव काय ते खरे बोलतोय. पण त्याचे ऐकणार कोण? दुसऱ्या एकाची फेसबुक प्रोफाइल पाहण्याचे भाग्य लाभले. 'हिंद के लिये अर्पण अपना, सब कुछ कर जाऊँगा, एक दिन मैं भी माँ भारती के आंचल में सो जाऊँगा' असे त्या प्रोफाइलवर लिहिलेले होते. ते वाचून माझे डोळे भरून आले. (गुलजारचे 'मेरा कुछ सामान' आठवले. मैं भी वहीं सो जाऊँगी...वा!) हिंद के लिये सर्व काही अर्पण करण्याची तयारी असलेल्या योद्ध्यावर मामुली हल्लेखोर म्हणवून घ्यायची वेळ यावी? नसेल त्याचा मेंदू विकसित झालेला; पण म्हणून त्याने एवढी किंमत द्यायची? अरेरे!

आता हे हल्लेखोर अर्थातच अराजक वगैरे माजवत नाहीयेत हे उघड आहे. ते नव्याने सांगत नाही. तसही देवेंद्र फडणवीस ते योग्य वेळी स्पष्ट करतीलच. तीन चार महिन्यांपूर्वी पुण्यात धीरज घाटेने पोलिसांची परवानगी नसताना कॉंग्रेस भवनवर मोर्चा नेला आणि दगडफेक केली होती. तेही अर्थातच अराजक नव्हते हे वेगळे सांगायची गरज नाहीच. त्यांनी अतिशय प्रेमाने मोर्चा नेला होता आणि प्रेमाने दगडफेक केली होती.

तर सांप्रत काळी अशा बऱ्याच गोष्टी घडत असतात. त्यातून काही मूर्ख लोक अस्वस्थ वगैरे होऊन काहीबाही निषेधात्मक खरडत असतात. पण आम्ही त्यातले नाही. 'सगळे सारखेच असतात' हे आपल्याला एकदम मान्य आहे.आणि आम्ही हे कायम लक्षात ठेवून गप्प बसायचे ठरवले आहे. माणसाला आरएसएसमधले मित्र असणे फार आवश्यक आहे. त्याशिवाय ज्ञानप्राप्ती होणे केवळ अशक्य! तुम्हालाही इथून पुढे कसला निषेध वगैरे करावासा वाटला तर 'सगळे सारखे असतात' हा मंत्र चार वेळा म्हणा. एकदम बरे वाटू लागेल. सगळे कसे मस्त चालले आहे हा साक्षात्कार होईल आणि मनावरील नकारात्मक विचारांची जळमटे निघून २०४७ च्या विकसित भारताचे मनोहर चित्र दिसू लागेल!

**-उत्पल व्हिबी**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# नवीन शैक्षणिक सत्र सुरू, पण १३ लाख विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके मिळालेली नाहीत

**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्रातील शाळा १५ जूनपासून सुरू झाल्या असल्या तरी सुमारे १३ लाख राज्य मंडळाच्या विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात पाठ्यपुस्तकांशिवाय करावी लागली आहे.इयत्ता ३री, ४थी आणि ६वीचे विद्यार्थी सर्वाधिक प्रभावित झाले आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रमासाठी तयार करण्यात आलेली अनेक नवीन पुस्तके अद्याप शाळा आणि पुस्तक विक्रेत्यांकडे पोहोचलेली नाहीत. राज्याच्या विद्यार्थी नोंदणी पोर्टलनुसार या वर्गांमध्ये शिकणारे सुमारे १३ लाख विद्यार्थी या परिस्थितीमुळे प्रभावित झाले आहेत.

सोमवार १५जून पासुन शाळा सुरू झाल्या असताना अनेक विद्यार्थी नेहमीप्रमाणे नवीन पुस्तकांसह नव्हे तर पुस्तकांशिवायच शाळेत आले आहेत. राज्याच्या विद्यार्थी नोंदणी पोर्टलनुसार या वर्गांमध्ये शिकणारे सुमारे १३ लाख विद्यार्थी या परिस्थितीमुळे प्रभावित झाले आहेत. सरकारच्या मोफत पाठ्यपुस्तक वितरण कार्यक्रमालाही या विलंबाचा फटका बसला आहे. उपलब्ध माहितीनुसार प्रत्येक जिल्ह्यातील सुमारे १५% विद्यार्थ्यांना अजूनही सरकारी व अनुदानित शाळांसाठीची पुस्तके मिळालेली नाहीत.

इयत्ता ६वीच्या विद्यार्थ्यांसाठी मोठे आव्हान यंदा राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीचा भाग म्हणून इयत्ता ६वीसाठी पूर्णपणे नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. त्यामुळे या अभ्यासक्रमानुसार शिकणारी ही पहिलीच विद्यार्थ्यांची तुकडी असल्याने परिस्थिती अधिक आव्हानात्मक बनली आहे.

पाठ्यपुस्तके उपलब्ध होईपर्यंत अध्यापन कसे करायचे याबाबत शिक्षकांमध्येही संभ्रम आहे. हा तुटवडा भरून काढण्यासाठी शाळांना 'सेतू पुस्तिका' वापरण्याचा सल्ला देण्यात आला आहे. या पुस्तिका राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद यांनी तयार केल्या असून विद्यार्थ्यांना नवीन अभ्यासक्रमाशी जुळवून घेण्यास मदत करण्यासाठी तयार करण्यात आल्या आहेत.

**सेतू पुस्तिकांची अडचण**

सध्या सेतू पुस्तिका फक्त SCERT च्या संकेतस्थळावर ऑनलाइन उपलब्ध आहेत. वर्गात वापरण्यासाठी त्यांची छपाई करावी लागते. याशिवाय हे साहित्य सध्या फक्त मराठी माध्यमात उपलब्ध असल्याने इतर माध्यमांच्या शिक्षकांना योग्य अध्यापन साहित्य मिळवण्यात अडचणी येत आहेत.

**अधिकाऱ्यांचे म्हणणे**

महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक समितीचे अध्यक्ष विजय कोम्बे यांनी सांगितले की, अभ्यासक्रमातील बदल आधीपासूनच निश्चित होते. त्यामुळे प्रशासनाने या बदलासाठी अधिक प्रभावी नियोजन करायला हवे होते.दुसरीकडे, बालभारतीच्या संचालक डॉ. अनुराधा ओक यांनी सांगितले की इयत्ता २री, ३री आणि ४थीची सर्व माध्यमांतील पाठ्यपुस्तके गोदामांतून पाठवण्यात आली आहेत. तसेच २१ दिवसांच्या सेतू अभ्यासक्रमानंतर नियमित पाठ्यपुस्तकांवर आधारित अध्यापन सुरू केले जाईल.

शिक्षक आणि पालकांच्या म्हणण्यानुसार, राज्यातील अनेक भागांत इयत्ता ३री आणि ४थीच्या इंग्रजी व गणिताची पुस्तके उपलब्ध नाहीत, तर इयत्ता ६वीची हिंदी वगळता बहुतेक पुस्तके अद्याप वितरित झालेली नाहीत.नियमित पुस्तकांवर आधारित अध्यापन काही दिवसांनी सुरू होणार.

## कागदपत्र नसलेल्या कचरा वाहनांवर आरटीओचे कारवाईचे आदेश

### ३ इंटरसेप्टर पथकांना सूचना

**अमरावती/का.प्र.**

महानगरपालिकेच्या कचरा वाहतूक करणाऱ्या कंत्राटी वाहनांवर प्रादेशिक परिवहन अधिकारी, अमरावती यांनी तातडीने कारवाईचे आदेश दिले आहेत.

शिवसेना शहर प्रमुख प्रवीण हरमकर यांच्या तक्रारीनुसार, कोणार्क कंपनीची अनेक कचरा वाहतूक वाहने वैध परवाना, योग्यता प्रमाणपत्र, विमा व प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्राशिवाय धावत आहेत.मोटार वाहन कायद्याचा भंग होत असल्याने आरटीओ अमरावती यांनी कार्यालयीन आदेश क्र. ३७५/२०२६ नुसार आदेश दिले आहेत की, सोबत जोडलेल्या ९८ वाहनांच्या यादीतील वाहनांची सकाळी ६ ते दुपारी १२ या वेळेत अमरावती शहरातील सर्व झोनमध्ये तपासणी करावी. कागदपत्र नसल्यास मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करून अहवाल त्वरित सादर करावा.

या कारवाईसाठी आरटीओ अमरावती यांनी पथक क्र. १:संजय पाटील, मोटार वाहन निरीक्षक व के. पी. जाधव, वरिष्ठ मोटार वाहन निरीक्षक,पथक क्र. ३: पी. ए. मालोकार व आर. एस. सरकटे, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक,पथक क्र. ४:व्ही. आर. यादव व शोएब शेख, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक नागरिकांच्या सुरक्षेसाठी आरटीओ प्रशासनाने ही कारवाई हाती घेतली आहे.

## रुख्मीणी नगर परिसरातील समस्यांबाबत युवक कॉंग्रेसने साधला स्थानिकांशी संवाद

### राष्ट्रीय सचिव नवज्योतसिंग संधू यांची विशेष उपस्थिती



**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्रातील प्रमुख महानगरांच्या स्थानिक समस्यांना वाचा फोडण्यासाठी महाराष्ट्र प्रदेश युवक कॉंग्रेसतर्फे विशेष मोहीम राबविण्यात येत असून त्याचाच भाग म्हणून 'आवाज महाराष्ट्राचा, अमरावतीच्या परिवर्तनाचा' ही मोहीम अमरावती शहरात राबविण्यात येत आहे.या मोहीमेअंतर्गत शहरातील रुक्मिणी नगर परिसरातील विविध समस्यांवर चर्चा करण्यासाठी स्थानिक नागरिकांशी संवाद साधण्यात आला.

यावेळी भारतीय युवक कॉंग्रेसचे सचिव व महाराष्ट्र प्रदेश युवक कॉंग्रेसचे सहप्रभारी नवज्योतसिंग संधू, अमरावती विधानसभा युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष वैभव देशमुख, जिल्हा युवक कॉंग्रेसचे कार्याध्यक्ष अनिकेत ढेंगळे, शहर युवक कॉंग्रेस उपाध्यक्ष नितीन काळे, माजी प्रदेश सचिव समीर जवंजाळ, प्रदेश महासचिव उत्कर्ष देशमुख, प्रदेश महासचिव अक्षय हेटे, प्रदेश सचिव अफजल बेरा, अंकुश डहाके, मोहीत भेंडे, शुभम बांबल, केदार भेंडे, आनंद बरडे, शंतनु देशमुख, आकाश गेडाम, प्रियल मोहोड, संकेत भेंडे, आकाश गेडाम, आनंद पाचघरे, नितीन तिडके, शाहू बोंडे, योगेश घोडेस्वार या युवक कॉंग्रेस पदाधिकाऱ्यांसह, माजी नगरसेविका जयश्रीताई डहाके, प्रदीप वानखडे, मंगेश उगले, धर्मेंद्र चंदेले, मनीष देशमुख, नितीन वाघमारे, गणेंद्र बोंडे, राजाभाऊ तिडके, नितीन वाघमारे, प्रशांत सोनारे, विजय डहाके, अतुल काळे, संदीप ठाकरे, पंकज गुल्हाने, आकाश घुईखेडकर, सुनील जुनघरे, अनंत देशमुख, शशिकांत बोंडे, रवी इंगळे, सचिन भनग, अश्विन भेंडे, छोटू देवळे यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निधनवार्ता

### मेळघाटचे माजी आमदार पटल्या ( गुरुजी ) मावस्कर यांचे निधन

**धारणी/वार्ताहर**



मेळघाट विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार, ज्येष्ठ समाजसेवक तथा शिक्षण क्षेत्रातील मान्यवर व्यक्तिमत्त्व पटल्या (गुरुजी) लंगडा मावस्कर यांचे सोमवार १५ जून २०२६ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने मेळघाट परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्राची मोठी हानी झाल्याची भावना व्यक्त होत आहे.पटल्या (गुरुजी) मावस्कर हे मेळघाट विधानसभा मतदारसंघातून भारतीय जनता पक्षाचे पहिले आमदार म्हणून निवडून आले होते.राजकारणाबरोबरच त्यांनी सामाजिक क्षेत्रातही उल्लेखनीय कार्य केले. शिक्षक म्हणून आपल्या कारकिर्दीची सुरुवात करणाऱ्या मावस्कर गुरुजींनी आयुष्यभर शिक्षण, समाजसेवा आणि जनसंपर्क यांना प्राधान्य दिले.

### मधुकर इंगळे



**अमरावती**-केवल कॉलनी येथील सेवानिवृत पोलीस कर्मचारी व पोलीस उपनिरीक्षक नंदकिशोर इंगळे यांचे वडील मधुकरराव इंगळे यांचे अल्पशा आजाराने आज सकाळी खाजगी रुग्णालयात वयाच्या ८० व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, सून, असा बराच मोठा आप्तपरिवार आहे.

### संपतकुमार सारडा



**अमरावती**- क्लबचे सदस्य अजय सारडा यांचे वडील संपतकुमार रामप्रसाद सारडा यांचे १५ जून रोजी निधन झाले. मृत्यू समयी ते ८० वर्षाचे होते. त्यांची अंतिमयात्रा बुटीप्लाट येथील त्यांच्या निवासस्थानावरुन काढण्यात आली व हिंदू स्मशान भूमित अंतिम संस्कार करण्यात आले. यावेळी जनसमूदाय मोठ्या संख्येने उपस्थित होता. त्यांच्या निधना बद्दल सर्वत्र हळहळ व्यक्त केल्या जात आहे.

### रखमाबाई गावंडे



**अंजनगाव बारी**-बसपा पक्षाचे मिशनरी कार्यकर्ते, माजी उपसरपंच अंजनगाव बारी तथा युवा समाजसेवक ॲड. विलास गावंडे यांच्या मातोश्री रखमाबाई देविदास गावंडे (वय ८७ वर्षे), रा. अंजनगाव बारी यांचे १६ जून रोजी सकाळी ६.३० वाजता निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, सुना, नातवंडे व मोठा परिवार असा आप्तपरिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा बुधवार १७ जून २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता त्यांच्या राहत्या घरून बौद्ध पुरा येथून निघणार आहे.

## प्रलंबित मागण्यांकडे दुर्लक्ष; आरटीओ कर्मचारी बेमुदत संपावर




**अमरावती/का.प्र.**

मोटार वाहन विभाग कर्मचारी संघटनेच्या वतीने सेवा प्रवेश नियमांसह विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आज राज्यभरातील प्रादेशिक परिवहन (आरटीओ) कार्यालयांतील कर्मचाऱ्यांनी बेमुदत संप पुकारला आहे.

संघटनेने यापूर्वी २ जून रोजी राज्यातील सर्व आरटीओ कार्यालयांमध्ये दोन तासांचे धरणे व निदर्शने आंदोलन करून शासन आणि ९ ला एक दिवसीय लाक्षणिक संप पुकारलेला होता.या माध्यमातून प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, या आंदोलनानंतरही मागण्यांबाबत कोणतीही ठोस कार्यवाही अथवा सकारात्मक प्रतिसाद मिळाला नसल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

त्यामुळे पूर्वनियोजित आंदोलनाच्या पुढील टप्प्यानुसार आज १६ जून रोजी राज्यभरातील कर्मचाऱ्यांनी बेमुदत संपात सहभाग नोंदविला.शासनाने अद्यापही या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष न दिल्याने राज्यातील सर्व आरटीओ कार्यालयांतील कर्मचारी बेमुदत संपावर गेले आहे.मोटार वाहन विभाग कर्मचारी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष अनिल मानकर, राज्य संघटक संदीप खवले तसेच अभिजीत गावंडे, अक्षय राठोड, अमोल माठोडे, उज्वल ठाकरे, संजय चौधरी, देवानंद खंडारे आणि अन्य पदाधिकारी व कर्मचाऱ्यांनी ही माहिती दिली.

संघटनेच्या म्हणण्यानुसार, कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या अनेक वर्षांपासून शासन स्तरावर रखडलेल्या असून त्या तातडीने मार्गी लावाव्यात, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल. राज्यातील सर्व कर्मचाऱ्यांनी आंदोलनाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याचा दावाही संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे.

## मान्सूनच्या विलंबाने शेतकऱ्याची नजरा लागल्या आभाळाकडे

**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**



मृग नक्षत्र अर्धे अधिक संपले तरी सुद्धा मान्सून दाखल झाला नसल्यामुळे खरीप हंगामात पेरणीच्या उंबरठ्यावर सज्ज असलेल्या शेतकऱ्याची काळजी वाढली जून महिना अर्धा संपून सुद्धा तालुक्यात समाधानकारक पावसाची नोंद नाही. खरीप हंगाम करता शेतीच्या मशागतीची कामे पूर्ण झाली असून शेतकरी आतुरतेने पावसाच्या प्रतीक्षेत आहे. तालुक्यात पावसाचा किरकोळ शिडकावा होत असला तरी अद्यापही दमदार पावसाची प्रतीक्षा लागून आहे.

पेरणीयोग्य पाऊस कधी येणार शेतकऱ्यांमध्ये ही चर्चा असून शेतीच्या मशागती पूर्ण झाल्या खते बियाणांची जुळवाजुळव शेतकऱ्यांनी केली. आभाळ येऊनही दमदार पाऊस बरसत नसल्याने शेतकरी वर्गात काळजीचे वातावरण आहे. जून चा दुसरा आठवडा संपला आणि मृग नक्षत्र संपण्यासाठी काही दिवसाचाच अवधी राहिला तेव्हा पेरणी योग्य पाऊस झाला नाही तर मूग,उडीद पिकाच्या पेरणी क्षेत्रात घट येऊन शेतकऱ्याचे पेरणीचे गणितच बिघडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. काही शेतकऱ्यांनी सिंचनाच्या सुविधेवर कपाशीची लागवड केली परंतु पाऊस नसल्याने तापमानात झालेल्या वाढीमुळे बियाण्याची उगवण क्षमता समाधानकारक नसल्याचे शेतकरी बोलत आहे. मृग नक्षत्रामध्ये पेरणी झाली तर खरीपातील पीक समाधानकारक येऊन उत्पादनात वाढ होते असा शेतकऱ्यांचा समज आहे. त्यामुळे मृग नक्षत्रामध्येच पेरणी व्हावी याकरता शेतकरी नेहमी प्रयत्नशील राहतो. तरी तालुक्यात पावसाचा कुठेच पत्ता नसल्याने शेतकरी चिंताग्रस्त असून नजरा आभाळाकडे लागून आहे. यावर्षी उन्हाचा पारा वाढल्याने तालुक्यातील संत्रा फळबागांना उष्णतेच्या तीव्र झळा असह्य होत असल्याने संत्रा झाडे सुकण्याच्या मार्गावर असल्याने शेतकऱ्यांना पावसाची प्रतीक्षा लागून आहे.

## दहावी-बारावीतील २८ विद्यार्थ्यांसह अग्निवीर जवानांच्या पालकांचा सन्मान



**अंजनगाव सुर्जी /वार्ताहर**

ओतारी समाज संघ, अमरावती जिल्हा कार्यकारिणीच्या वतीने अंजनगाव सुर्जी येथे गुणवंत विद्यार्थी गुणगौरव सोहळा व पालक सत्कार समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची प्रेरणा निर्माण करणारा हा उपक्रम समाजातील एकोपा, शैक्षणिक प्रगती आणि सामाजिक बांधिलकीचे प्रेरणादायी उदाहरण ठरला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मोहन तराळे प्रमुख पाहुणे म्हणून जळगावचे माजी अध्यक्ष दीपक कंडारे व महाराष्ट्र प्रदेशचे राजेश तायवाडे उपस्थित होते. विशेष अतिथी म्हणून नगराध्यक्ष अविनाश गायगोले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ओंकार राऊत, विनोद डोंगरे,ज्ञानेश्वर डोंगरकर, ज्योत्स्ना करवाडे, आशा सायगन, श्रीरामजी वऱ्हाडे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.जिल्हा कार्यकारिणी सदस्य दिनेश अढागळे,सुभाष पटवी,मनोज तराळे,रवीभाऊ तायडे,जया तायडे, कार्तिका तायडे,सोनाली वऱ्हाडे व सारिका तराळे यांच्यासह समाजबांधव, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.आयोजन परिश्रम गणेश थोराईत,अमोल वऱ्हाडे,विजय तायडे, अक्षय तराळे,रुपेश तायडे व अनिल तराळे संचालन निलेश तायवाडे प्रास्ताविक व आभार अध्यक्ष शिवकुमार पटवे आर्थिक सहकार्य मुकेश वांद्रे, अल्केश बरगट,अतुल राऊत,गौरव सातघोडे,हरीश राऊत, जान्हवी सातघोडे, मंगेश राऊत,पियुष ओतोकार,प्रमोद तायडे,सतीश काकडे, शुभम सायगण, तुषार खंडारे,सचिन अढागळे आदी उपस्थीत होते.

## हव्याप्र मंडळात रंगणार योग महा संगम २०२६

**अमरावती**-आतरराष्ट्रीय योग दिन २०२६ निमित्त श्री हव्याप्र मंडळ, अमरावती अंतर्गत डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावती यांच्या वतीने २१ जून रोजी योग महा संगम २०२६ या भव्य योग संगम उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम सकाळी ठीक ७.०० वाजता डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती येथे आयोजित करण्यात येणार असून सर्व सहभागींनी सकाळी ६.३० वाजेपर्यंत उपस्थित राहावे. इच्छकांनी सोबत पाण्याची बाटली,चादर/योगा मॅट आणावी अधिक माहितीसाठी मो.९०२८१२७९३४, ८०८७१४२२७०, ८२७५७५३६४८ यावर संपर्क साधावा.

## संक्षिप्त

### अमरावतीकर एकत्र येऊन साजरा करणार योग दिन

**अमरावती**- केंद्र व महाराष्ट्र शासनाच्या वतीने रविवार,२१ जून रोजी 'आंतरराष्ट्रीय योग दिन' साजरा केला जाणार आहे. यंदाच्या योग दिनासाठी 'निरोगी वृद्धत्वासाठी योग' ही थीम आणि 'योग करा निरोगी रहा आणि आनंदी आयुष्य जगा' हे घोषवाक्य निश्चित करण्यात आले आहे. या वर्षीचा मुख्य जिल्हास्तरीय कार्यक्रम २१ जून रोजी सकाळी ६.१५ ते ७.१५ या वेळेत विभागीय क्रीडा संकुल, मोर्शी रोड, अमरावती येथे आयोजित करण्यात आला असून, या कार्यक्रमाला प्रमुख लोकप्रतिनिधी, वरिष्ठ सनदी अधिकारी आणि ज्येष्ठ योग प्रसारक उपस्थित राहणार आहेत. हा कार्यक्रम जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन, एस.आर.पी.एफ., महानगरपालिका, शिक्षण विभाग, वनविभाग, जिल्हा होमगार्ड, राष्ट्रीय छात्र सेना , संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, पतंजली योग समिती, आर्ट ऑफ लिव्हिंग आणि क्रीडा भारती यांसह जिल्ह्यातील विविध योग व क्रीडा संघटनांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केला आहे.

### 'स्वाधार' योजनेच्या लाभासाठी अर्ज करा

**अमरावती**-शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये अनुसूचित जाती आणि नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ मिळवण्यासाठी प्रथम शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज करणे बंधनकारक करण्यात आले आहे. जे विद्यार्थी शासकीय वसतिगृहासाठी अर्ज करणार नाहीत त्यांना स्वाधार योजनेचा तसेच वसतिगृह योजनेचा लाभ मिळणार नाही, अशी माहिती समाज कल्याण सहाय्यक आयुक्त आर. व्ही. जाधवर यांनी दिली आहे.बदललेल्या नियमांनुसार इयत्ता ११ वी, १२ वी तसेच १२ वी नंतरच्या व्यावसायिक व अव्यावसायिक अभ्यासक्रमाच्या सर्व पात्र विद्यार्थ्यांनी प्रथम शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी https://hmas.mahait.org या संकेतस्थळावर १५ ते ३१ जुलै २०२६ या मुदतीत ऑनलाईन अर्ज भरणे बंधनकारक आहे.सहाय्यक आयुक्त समाज कल्याण यांनी सर्व पात्र विद्यार्थ्यांना चालू शैक्षणिक वर्षात शासकीय वसतिगृहासाठी वेळेत अर्ज नोंदविण्याचे आवाहन केले असून अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी सामाजिक न्याय भवन, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, अमरावती (चांदूर रेल्वे रोड, सी.पी. ऑफिसच्या मागे, अमरावती) येथे किंवा speldswo_amt@rediffmail.com या ई-मेल आयडीवर तसेच ०७२१-२६६१२६१ या दूरध्वनी क्रमांकावर कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आहे.

### एकल महिला धोरणासाठी आज जिल्हास्तरीय बैठक

**अमरावती**-महाराष्ट्र शासनामार्फत राज्यातील विधवा, घटस्फोटित, परित्यक्ता, अविवाहित तसेच इतर एकल महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी एक स्वतंत्र आणि व्यापक 'एकल महिला धोरण' तयार करण्यात येत असून, हे धोरण अधिक परिणामकारक आणि लोकाभिमुख करण्यासाठी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाच्या वतीने बुधवार, दिनांक १७ जून २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता जिल्हा परिषद अमरावतीच्या पंजाबराव देशमुख सभागृहात जिल्हास्तरीय बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या बैठकीमध्ये एकल महिलांचे प्रश्न केवळ मांडण्याऐवजी त्यावर ठोस मार्ग काढण्याच्या उद्देशाने चर्चा केली जाणार असून, जिल्ह्यातील एकल महिला, नागरिक, स्वयंसेवी संस्था, महिला संघटना, सामाजिक कार्यकर्ते, अभ्यासक आणि विषयतज्ज्ञांना या धोरण निर्मिती प्रक्रियेत सक्रिय सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी संजय गट यांनी केले आहे.ज्या नागरिकांना किंवा संस्थांना बैठकीव्यतिरिक्त आपले अभिप्राय थेट प्रशासनापर्यंत पोहोचवायचे आहेत, त्यांच्यासाठी प्रशासनाने ८२०८५८१९१५ हा अधिकृत व्हॉट्सॲप क्रमांक जाहीर केला असून, प्राप्त होणाऱ्या सर्व नाविन्यपूर्ण सूचना व अभिप्रायांचा 'एकल महिला धोरणाचा' मसुदा तयार करताना योग्य तो विचार केला जाईल, तरी अमरावती जिल्ह्यातील सर्व संबंधित घटकांनी या महत्त्वपूर्ण उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी होऊन शासनास सहकार्य करावे.

### प्लास्टिक जप्ती व डस्टबिन तपासणी विशेष मोहीम



**अमरावती**-महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा व अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांच्या आदेशानुसार तसेच वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव व सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तिखिले झोन क्र.१ यांच्या मार्गदर्शनाखाली गाडगेनगर परिसरात प्लास्टिक जप्ती व डस्टबिन तपासणीची विशेष मोहीम राबविण्यात आली.या मोहिमेदरम्यान एकूण १८ आस्थापनांची तपासणी करण्यात आली. तपासणीमध्ये काही ठिकाणी कापडी व कागदी पिशव्यांचा वापर तसेच ५१ मायक्रॉनपेक्षा अधिक जाडीच्या प्लास्टिक पिशव्यांचा वापर आढळून आला. मात्र दोन आस्थापनांमध्ये प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर आढळून आल्याने महानगरपालिका प्रशासनाने कारवाई करत दंड आकारला यामध्ये कन्हैया दूध डेअरी यांच्याकडून ५,००० तर गाडगेबाबा दूध डेअरी यांच्याकडून ५,००० असा एकूण १०,००० दंड वसूल करण्यात आला. नागरिकांनी पर्यावरणपूरक पर्यायांचा वापर करावा तसेच प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर टाळावा, असे आवाहन महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.या विशेष मोहिमेत प्लास्टिक नोडल अधिकारी ए. के. गोहर, ज्येष्ठ स्वास्थ्य निरीक्षक राजू डीक्याव तसेच स्वास्थ्य निरीक्षक सचिन सैनी, निखिल खंगाळे, मनीष नकवाल, अनिकेत महल्ले, आशिष सहारे, एम. सैय्यद, इमरान खान, परिक्षीत गोरले, शाहू जवंजाळ आणि मेघराज ढेंनवाल यांनी सहभाग घेतला.

बुधवार, दि. १७ जून २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सत्य

# ‘रस्ते आहेत, पण एसटी नाही’ 40 गावांचा प्रशासनाला सवाल..!

## शिक्षण, रोजगार आणि शासकीय सेवांपासून ग्रामीण नागरिक वंचित..

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**वणी, दि. १६ :** वणी तालुक्यातील तब्बल ४० गावांमध्ये रस्ते असूनही एसटी बससेवा नसल्याने हजारो नागरिकांना शिक्षण, रोजगार, आरोग्य आणि शासकीय सेवा पासून वंचित राहण्याची वेळ आली आहे. यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली असून, या गावांना तातडीने बससेवा उपलब्ध करून देण्याची मागणी जोर धरत आहे.

यासंदर्भात माजी जिल्हा परिषद सदस्य विजय पिदुरकर यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र राज्य मार्ग





परिवहन महामंडळाच्या वणी आगार व्यवस्थापकांना निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, खनिज संपन्न वणी तालुक्यात आजही अनेक गावांमध्ये सार्वजनिक वाहतुकीची सोय नाही. शासनाच्या विविध प्रवासी कल्याणकारी योजना कागदावर असल्या तरी बस सेवेअभावी विद्यार्थी, महिला, दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक, शेतकरी आणि कामगारांना खाजगी वाहनांवर अवलंबून राहावे लागत आहे. त्यामुळे त्यांच्यावर अतिरिक्त आर्थिक भार पडत असून अनेक होतकरू विद्यार्थ्यांचे शिक्षणही धोक्यात आले आहे. वणी ची बाजारपेठ, शासकीय कार्यालये, आरोग्य सेवा आणि शैक्षणिक संस्थां पर्यंत पोहोचण्यासाठी ग्रामीण नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याने ग्रामीण विकास आणि सामाजिक प्रगतीला मोठा अडथळा निर्माण झाला आहे, असेही निवेदनात नमूद करण्यात आले.

**प्रस्तावित एसटी मार्ग :**
१ ) वणी – तरोडा – बेलोरा मार्गे घुगुस (जि. चंद्रपूर)
२) वणी – शिंदोला – कळमणा मार्गे गडचांदूर (जि. चंद्रपूर)
३) वणी – शिरपूर – वेळाबाई मार्गे मोहदा – कृष्णाणपूर

या तीन मार्गांवर सुमारे ४० गावांचा समावेश असून हजारो विद्यार्थी, महिला, शेतकरी, शेतमजूर, कामगार आणि छोटे व्यावसायिक यांना त्याचा थेट लाभ होणार आहे. त्यामुळे जुलै २०२६ च्या शैक्षणिक सत्रा पूर्वी या मार्गांचे तातडीने सर्वेक्षण करून एसटी बससेवा सुरू करण्यात यावी, अशी ठाम मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. ग्रामीण भागाला रस्ते मिळाले, पण वाहतूक नाही; त्यामुळे विकासाच्या मुख्य प्रवाहापासून ४० गावे दूर लोटली गेली आहेत. आता तरी प्रशासनाने जागे होऊन एसटी सेवा सुरू करावी," अशी भावना यावेळी नागरिकांनी व्यक्त केली.

# विदर्भ बुरुड समाजाची नवी कार्यकारिणी बिनविरोध..!

## ॲड. ईश्वर चरलेवार यांच्याकडे अध्यक्षपदाची धुरा



✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. १६ :** यवतमाळ जिल्हा बुरुड समाज संघटनेच्या वतीने रविवारी (ता. १४) भावे मंगल कार्यालय, सिव्हिल लाईन येथे विदर्भस्तरीय कार्यकारिणी निवडणूक उत्साहात पार पडली. समाजाच्या विविध जिल्ह्यांतील प्रतिनिधींच्या उपस्थितीत गुप्त मतदान पद्धतीने नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली.

निवडणुकीपूर्वी मागील तीन वर्षांचा अहवाल व जमा-खर्चाचा तपशील सभेसमोर सादर करण्यात आला. त्यानंतर नव्या पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. अध्यक्षपदी नागपूरचे ॲड. ईश्वर चरलेवार यांची निवड झाली. उपाध्यक्षपदी रमाकांत सुलभेवार (यवतमाळ) व सुरेश पुट्टेवार (नागपूर), महासचिवपदी विवेक चिलविरवार, संघटन सचिवपदी दिपांजली मंथनवार व निलेश कनकेवार, सचिवपदी राहुल मोहितवार, महिला सचिवपदी अनुराधा पल्लडवार, कार्यालयीन सचिवपदी राजेश शगपवार, युवा सचिवपदी मोहित मादेवार, कोषाध्यक्षपदी राजेश सुलभेवार आणि अंकेक्षकपदी संजय मांजरे यांची निवड करण्यात आली. या निवडणुकीसाठी यवतमाळ, नागपूर, अमरावती, बुलढाणा, अकोला, वाशिम, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा आणि वर्धा जिल्ह्यांतील समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवडणूक अधिकारी म्हणून निलेश सुलभेवार आणि डॉ. सुरेश पुट्टेवार यांनी जबाबदारी पार पाडली. यावेळी नुकत्याच झालेल्या नगरपरिषद निवडणुकीत विजयी झालेल्या समाजातील लोकप्रतिनिधींचा सत्कारही करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी यवतमाळ जिल्ह्यातील बुरुड समाजाच्या पदाधिकारी, युवक-युवती आणि समाजबांधवांनी मोलाचे सहकार्य केले.

# मोफत आरोग्य शिबिर, २,५६० रुग्णांना दिलासा

## पालकमंत्री संजय राठोड यांच्या वाढदिवसानिमित्त ‘आरोग्य संकल्प अभियान’ला उत्स्फूर्त प्रतिसाद

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**दिग्रस, दि. १६ :** राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री संजयभाऊ राठोड यांच्या वाढदिवसानिमित्त दिग्रस येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य मोफत आरोग्य शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. ‘रुग्णसेवा हिच ईश्वरसेवा’ या संकल्पनेतून आयोजित ‘आरोग्य संकल्प अभियान’ अंतर्गत तब्बल २ हजार ५६० रुग्णांनी विविध वैद्यकीय सेवांचा लाभ घेतला, त्यामुळे हा उपक्रम परिसरातील नागरिकांसाठी आरोग्याचा महोत्सव ठरला. आरोग्य सेवा समिती, यवतमाळ, दत्ता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्था, सावंगी (मेघे) आणि आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने दिनबाई विद्यालय, दिग्रस येथे हे शिबिर पार पडले. शिबिराचे उद्घाटन शिवसेना पश्चिम विदर्भ सहसंपर्कप्रमुख पराग पिंगळे यांच्या हस्ते झाले. यावेळी



जिल्हाप्रमुख यशवंत पवार व जीवन पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. शिबिरात हृदयरोग, कर्करोग, स्त्रीरोग, बालरोग, त्वचारोग, अस्थिरोग, नेत्ररोग, कान-नाक-घसा विकार, श्वसनरोग, मानसिक आजार, न्यूरो विकार, दंत व मूत्ररोग आदी विविध आजारांवर मोफत तपासणी व उपचार सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. महिलांसाठी मेमोग्राफी, पॅप स्मिअर, कर्करोग तपासणी, बंध्यत्व तपासणी, व्हेरिकोज वेन्स, किडनी तपासणी तसेच ईसीजीसह विविध अत्याधुनिक चाचण्या करण्यात आल्या. तपासणीनंतर गरजूंना पुढील उपचार, शस्त्रक्रिया व विशेष वैद्यकीय सेवांसाठी मार्गदर्शन करण्यात आले. अनेक रुग्णांना आयुष्मान भारत योजनेअंतर्गत उपचार मिळण्यासाठी आवश्यक माहिती व नोंदणी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी पालकमंत्री संजय राठोड यांच्या गेल्या तीन दशकांपासूनच्या समाजसेवा व रुग्णसेवेच्या कार्याचा गौरवपूर्ण आढावा घेतला. दिग्रस, दरव्हा आणि नेर मतदारसंघातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांसाठी हे शिबिर मोठा आधार ठरल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

# ‘आधी जादा थकबाकी भरा, मगच कर्जमाफी’..!

## जीआरच्या अटींनी शेतकऱ्यांची वाढवली धास्ती!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

### ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदत तरीही प्रश्न कायम

**शासनाने जादा रक्कम भरण्यासाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदत दिली असली, तरी आधीच कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या शेतकऱ्यांना ही रक्कम उभी करायची कशी, असा प्रश्न उपस्थित होत आहे. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस इंजि. अजय आत्राम यांनी या अटींवर तीव्र आक्षेप घेत, “शेतकरी आर्थिक संकटात असताना आधी जादा थकबाकी भरा आणि मगच कर्जमाफी मिळवा, ही अट अन्यायकारक आहे. शासनाने तातडीने सुधारित जीआर काढून जाचक अटी रद्द कराव्यात अशी मागणी केली आहे.**




**पांढरकवडा, दि. १६ :** राज्य शासनाने जाहीर केलेल्या ‘पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती २०२६’ योजनेतील जाचक अटींमुळे आर्णी-घाटंजी-केळापूर विधानसभा मतदारसंघातील हजारो शेतकरी संभ्रमात सापडले आहेत. विशेषतः यापूर्वी महात्मा ज्योतिबा फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०१९ चा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांसाठी ठेवण्यात आलेल्या अटींमुळे नाराजी व्यक्त होत आहे. शासन निर्णयानुसार, १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत घेतलेल्या अल्प मुदतीच्या पीककर्जाच्या पुनर्गठित थकीत हप्त्यांची ३० मार्च २०२५ आणि ३० मार्च २०२६ अखेरपर्यंत परतफेड न झाल्यास, संबंधित शेतकऱ्यांच्या सर्व बँक खात्यांतील एकत्रित थकबाकीची रक्कम ५० हजार रुपयांपेक्षा जास्त असल्यास त्यांना थेट कर्जमाफीचा लाभ मिळणार नाही. योजनेनुसार, थकबाकी ५० हजार रुपयांपेक्षा अधिक असल्यास, अतिरिक्त संपूर्ण रक्कम शेतकऱ्यांनी स्वतः बँकेत जमा केल्यानंतरच त्यांना कमाल ५० हजार रुपयांच्या कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांसमोर मोठा पेच निर्माण झाला आहे.

# थोडक्यात

## मोकाट श्वानांचा हैदोस,निराधार महिलेचा उदरनिर्वाहच उद्ध्वस्त!

**पुसद :** शहरातील महाराणा प्रताप नगर प्रभाग क्रमांक १ येथे मोकाट



व पिसाळलेल्या श्वानांच्या हल्ल्यात एका निराधार महिलेचा उदरनिर्वाहाचा आधारच हिरावला गेला आहे. भटक्या कुत्र्यांच्या कळपाने तिच्या ७ शेळ्या, ६ करडी आणि २० लहान-मोठ्या कोंबड्यांचा फडशा पाडल्याने संबंधित महिलेचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून ती शासकीय मदतीच्या प्रतीक्षेत आहे.

महाराणा प्रताप नगर येथील रहिवासी पूजा बाबुराव धुळे या एकट्याच वास्तव्यास असून शेळीपालन आणि कुक्कुटपालनाच्या माध्यमातून आपला उदरनिर्वाह करतात. मात्र, दि. १३ जून २०२६ रोजी काही पिसाळलेल्या मोकाट श्वानांनी त्यांच्या पशुधनावर हल्ला चढवत अक्षरशः लचके तोडून त्यांना ठार केले. या घटनेमुळे त्यांच्यासमोर उपजीविकेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. शनिवार असल्याने शासकीय सुट्टीमुळे तातडीने अर्ज सादर करता आला नसल्याचे त्यांनी निवेदनात नमूद केले आहे. घटनेचा त्वरित पंचनामा करून झालेल्या नुकसानीची अधिकृत नोंद घ्यावी आणि शासन नियमांनुसार योग्य ती आर्थिक भरपाई मंजूर करावी, अशी मागणी त्यांनी तहसीलदार, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी आणि वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. दरम्यान, शहरात वाढत्या मोकाट श्वानांच्या उपद्रवामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

## थेंबभर पाणी येते आणि रात्रभर लाईन जाते’..!

**महावितरणच्या कारभारावर प्रश्नचिन्ह**

**फुलसावंगी :** फुलसावंगी येथे पाणीपुरवठ्याच्या समस्येने नागरिक आधीच हैराण असताना, त्यातच रात्री सुमारे ११ वाजताच्या सुमारास अचानक वीज पुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांचा संताप अनावर झाला. ‘थेंबभर पाणी येते आणि रात्रभर लाईन जाते’ अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

उन्हाळ्याच्या उकाड्यात रात्रीच्या वेळी अचानक झालेल्या वीज खंडितीमुळे संपूर्ण परिसर अंधारात बुडाला. प्रचंड उष्णता, बंद पडलेले पंखे आणि घुसमटणारे वातावरण यामुळे नागरिकांना अक्षरशः रात्र जागून काढावी लागली. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, लहान मुले आणि आजारी व्यक्तींना याचा मोठा फटका बसला. सदर वीज खंडितीबाबत महावितरणकडून कोणतीही पूर्वसूचना देण्यात आली नव्हती. त्यामुळे नेमका बिघाड कोणता, दुरुस्तीचे काम किती वेळ चालणार आणि वीज कधी सुरू होणार, याबाबत नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले. वारंवार होणारे पॉवर कट, देखभाल आणि तांत्रिक बिघाडांच्या नावाखाली तासनतास वीजपुरवठा खंडित होण्याच्या घटनांमुळे नागरिकांचा संयम आता संपत चालल्याची भावना व्यक्त होत आहे. दरम्यान, पाणीपुरवठ्याची अनियमितता आणि त्यात भर म्हणून वारंवार होणारे वीज खंडितीचे प्रकार यामुळे फुलसावंगीतील जनजीवन विस्कळीत होत आहे. रात्रीच्या वेळी अचानक वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रकार थांबवावेत, वीज व्यवस्थापनात सुधारणा करावी आणि खंडितीची पूर्वसूचना देण्याची प्रभावी यंत्रणा उभारावी, अशी जोरदार मागणी संतप्त नागरिकांनी महावितरण प्रशासनाकडे केली आहे.फुलसावंगीकरांच्या मते, मूलभूत सुविधांबाबत प्रशासनाने तातडीने ठोस उपाययोजना न केल्यास तीव्र लोकआंदोलन उभारण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

# मोदींच्या १२ वर्षांच्या कार्यकाळानिमित्त दर्ग्यावर चादर..! राष्ट्राच्या प्रगतीसाठी विशेष दुवा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**उमराखेड, दि. १६ :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळाची १२ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने भारतीय जनता पार्टी अल्पसंख्याक मोर्चा, उमराखेडच्या वतीने हजरत धोंगडे पीर बाबा (राहे) दर्ग्यावर चादर अर्पण करून देशाच्या प्रगती, ऐक्य आणि शांततेसाठी विशेष दुवा (प्रार्थना) करण्यात आली. हा कार्यक्रम भाजप पुसद-यवतमाळ जिल्हा समन्वयक नितीन भुताडा यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष हाजी जमाल सिद्दीकी यांच्या संकल्पनेतून देशभरातील सुफी संतांच्या दर्ग्यांवर चादर अर्पण व फातिहा पठणाचे आयोजन करण्यात येत आहे.

त्याच अनुषंगाने महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष इंद्रिस मुलतानी व



सचिव रमजान अन्सारी यांच्या मार्गदर्शनाखाली उमराखेड येथे हा कार्यक्रम झाला. दर्ग्याचे खादीम सय्यद नूर सय्यद नबी, सय्यद साबीर सय्यद नबी आणि मौलानांनी फातिहा व सलाम पठण केले. यावेळी भाजप पुसद-यवतमाळ जिल्हा उपाध्यक्ष रहेमत जागीरदार यांनी देशाच्या उज्ज्वल भवितव्यासाठी प्रार्थना केली. कार्यक्रमास भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. इरफान कुंदन, जिल्हाध्यक्ष मोहम्मद अतीक मौलाना, इस्त्राएल बाबा, सय्यद सादिक ठेकेदार, ॲड. जावेद खान, ॲड. अताउल्लाह पटेल, सय्यद तेहेजार, सय्यद रझीक, शेख हमीद यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ‘मकोका’च्या इशाऱ्याने भेसळ माफियांची झोप उडाली..!

## तुकाराम मुंडेंच्या कडक भूमिकेमुळे अवैध गुटखा विक्रेत्यांमध्ये भीतीचे वातावरण

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**ढाणकी, दि. १६ :** अन्न व औषध प्रशासन (एफडीए) आयुक्त तुकाराम मुंडे यांनी भेसळयुक्त अन्नपदार्थांची विक्री आणि प्रतिबंधित गुटखा व्यवसाय करणाऱ्यांविरोधात थेट महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मकोका) अंतर्गत कारवाई करण्याचा इशारा दिल्यानंतर ढाणकी शहरात एकच खळबळ उडाली आहे.

या कठोर भूमिकेमुळे अवैध व्यवसाय करणाऱ्यांची अक्षरशः झोप उडाली असून, कारवाईच्या धास्तीने अनेक पानटपऱ्या आणि किरकोळ दुकाने दिवसभर बंद ठेवण्यात आली. यवतमाळ जिल्ह्यात एफडीएने भेसळ आणि गुटखा माफियांविरोधात आक्रमक



मोहीम सुरू केली आहे. आयुक्त तुकाराम मुंडे यांनी पदभार स्वीकारताच आरोग्याशी खेळणाऱ्या भेसळखोरांना आणि प्रतिबंधित पदार्थांची विक्री करणाऱ्यांना कोणतीही दया दाखविण्यात येणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. ‘मकोका’सारख्या कठोर कायद्याचा वापर करण्याच्या इशाऱ्यामुळे ढाणकीसह परिसरातील अवैध गुटखा विक्रेत्यांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे, कारवाईच्या अफवा आणि संभाव्य धाडींच्या चर्चेमुळे काही कायदेशीर व्यवसाय करणारे व्यापारीही संभ्रमात पडले. खबरदारीचा उपाय म्हणून अनेकांनी स्वयंस्फूर्तीने दुकाने बंद ठेवण्याचा निर्णय घेतला. गुप्तपणे प्रतिबंधित सुगंधित सुपारी आणि गुटखा विक्री करणाऱ्यांचे मात्र या कारवाईने धाबे दणाणले आहेत. प्रशासनाच्या या कठोर आणि आक्रमक पवित्र्यामुळे ढाणकीसह संपूर्ण यवतमाळ जिल्ह्यातील अवैध गुटखा व भेसळ व्यवसायाला खरोखरच लगाम बसणार का, याकडे आता सर्वसामान्य नागरिकांचे लक्ष लागले आहे. भेसळमाफियांवर ‘मकोका’चा बडगा उगारल्याने जिल्ह्यात कायद्याची भीती निर्माण झाल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.

# ‘कर्जमाफी की कर्जवसुली?’ जाचक अटी रद्द करा..!

## सरसकट २ लाखांची कर्जमाफी द्या – राष्ट्रवादी शरद पवार गटाची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**बाभुळगाव, दि. १६ :** राज्य शासनाने जाहीर केलेल्या ‘पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजने’तील जाचक अटी तातडीने रद्द करून सर्व पात्र शेतकऱ्यांना कोणत्याही अटी-शर्तीशिवाय सरसकट २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी द्यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाने केली आहे. यासंदर्भात पक्षाच्या वतीने बाभुळगाव तहसीलदारांना निवेदन सादर करण्यात आले.

तालुकाध्यक्ष पवन हजारे यांनी, “३३ लाख शेतकरी वंचित राहणार असतील तर ही कर्जमाफी



नसून कर्जवसुली योजना आहे,” असा आरोप करत शासनाच्या निर्णयावर तीव्र टीका केली. निवेदनात नमूद करण्यात आले की, २०१९ च्या महात्मा ज्योतिराव फुले कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेतलेल्या सुमारे ३३ लाख शेतकऱ्यांना यावेळी केवळ ५० हजार रुपयांची कर्जमाफी देण्याची अट घालण्यात आली आहे. त्यामुळे लाखो शेतकरी संपूर्ण लाभापासून वंचित राहण्याची शक्यता आहे. तसेच, २ लाखांहून अधिक थकीत कर्ज असलेल्या शेतकऱ्यांना ‘वन टाइम सेटलमेंट’ (ओटीएस) अंतर्गत अतिरिक्त रक्कम भरल्यानंतरच कर्जमाफी देण्याची अट अन्यायकारक असल्याचे निवेदनात म्हटले आहे. प्रोत्साहनपर अनुदानासाठी सलग चार वर्षे नियमित कर्जफेड करण्याची अटही शेतकऱ्यांच्या आवाक्याबाहेर असल्याचा आरोप करण्यात आला. राष्ट्रवादी काँग्रेसने सात प्रमुख मागण्या शासनासमोर मांडल्या असून, ५० हजारांची मर्यादा रद्द करून सर्वांना २ लाखांपर्यंत कर्जमाफी, ओटीएसची अट रद्द करणे, २०१७ मधील ६.५६ लाख वंचित शेतकऱ्यांना लाभ देणे, १ रुपयांत पीकविमा योजना पुन्हा सुरू करणे आणि पेरणीपूर्वी कर्ज खात्यांचे पुनर्गठन करण्याची मागणी केली आहे. गेल्या तीन वर्षांतील नापिकी, नैसर्गिक आपत्ती आणि शेतमालाच्या घसरलेल्या दरामुळे शेतकरी गंभीर आर्थिक संकटात सापडला असल्याने सरकारने तातडीने निर्णय घ्यावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला. यावेळी तालुकाध्यक्ष पवन हजारे, संकेत टोणे, गजानन खराटकर, विनोद खडसे, जहीर भाई, सुधाकर दातार, दीपक तातेड, मधुकर निवल, हरिहर ढाकुलकर, सूर्यभान कावलकर, प्रवीण पांडे, सुभाष राऊत आणि वसीम बेग मिर्झा यांच्यासह पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या निवेदनावर आहेत.

# विवाहितेच्या छळप्रकरणी सात जणांवर गुन्हा

**महागाव, दि. १६ :** महागाव तालुक्यातील वाकान येथील सौ. मोहिनी रमेश पवार (वय २२) यांचा शारीरिक व मानसिक छळ केल्याप्रकरणी पती विशाल प्रकाश राठोडसह सात जणांविरुद्ध महागाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. मोहिनी यांचा विवाह १३ मे २०२५ रोजी झाला होता. ठेकेदारीसाठी वडिलांकडून एक लाख रुपये घेऊनही पुन्हा पैशांची मागणी करून सासरच्या मंडळींनी मारहाण व मानसिक त्रास दिल्याची तक्रार त्यांनी दिली. पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा नोंदवला असून, पुढील तपास प्रभारी ठाणेदार अंबोरे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले मुलींच्या शासकिय वसतीगृहात प्रवेश प्रक्रीया सुरु

**दिग्रसः-** सामाजिक न्याय विभाग व सहाय्यक आयुक्त समाजकल्याण यांच्या अंतर्गत संचालीत क्रांतिज्योती सावि बाई फुले मुलींचे शासकिय वसतीगृह, गुरुदेव नगर दिग्रस येथे सन २०२६-२७ या शैक्षणिक सत्रासाठी मोफत प्रवेश प्रक्रीया सुरु करण्यात आली आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थीनींचा शैक्षणिक स्तर उंचाविण्यासाठी हा महत्त्वपुर्ण उपक्रम राबविण्यात येत आहे. वसतीगृहात विद्यार्थीनींना मोफत निवारा, भोजन, शैक्षणिक साहित्य, निर्वाह भत्ता तसेच इतर आवश्यक सुविधा विनामुल्य उपलब्ध करुन दिल्या जातात.त्यामुळे ग्रामिण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील मुलींना उच्च शिक्षणासाठी मोठा आधार मिळणार आहे. प्रवेश प्रक्रीयेत अनुसुचित जाती प्रवर्गासाठी ८० टक्के, अनुसुचित जमातीसाठी ३ टक्के, विमुक्त जाती व भटक्या जमातीसाठी ५ टक्के, इतर मागास प्रवर्गासाठी ५ टक्के,विशेष मागास प्रवर्गासाठी ३ टक्के अनाथ विद्यार्थीनींसाठी २टक्के, तसेच दिव्यांग विद्यार्थीनीसाठी ३ टक्के आरक्षण देण्यात आले आहे.

इच्छुक विद्यार्थीनींनी **https://hmas.mahait.org** या संबंधित संकेतस्थळावर विहित मुदतीत ऑनलाईन अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

# ४८ कोटींच्या वसुलीत महसूल प्रशासनाचा 'हायव्होल्टेज ड्रामा'?

## चांडकांना अभय, महसूल प्रशासनाला घाई नाही!

### -कंत्राटी देयके अबाधित, उद्योग सुरूच; मग सातबाऱ्यावरील बोजाच कशासाठी?

### आधी तहसीलदार, एसडीओ यांचीच चौकशी करा, नागरिकांची मागणी

**ॲड. समीर ठाकूर**

**अकोला :** गाजीपूर येथील कथित अवैध गौण खनिज उत्खनन प्रकरणात आकारण्यात आलेल्या तब्बल ४८ कोटी रुपयांच्या दंडवसुलीचे प्रकरण दिवसेंदिवस अधिकच संशयास्पद बनत चालले आहे. महसूल प्रशासनाने काही मालमत्तांवर शासनाचा बोजा चढवून आपले कर्तव्य पार पाडल्याचा हायव्होल्टेज ड्रामा रचला असला, तरी प्रत्यक्षात दंड वसुली करण्याची इच्छाशक्तीच दिसत नसल्याची चर्चा आता अकोट तालुक्यात उघडपणे सुरू झाली आहे.




झाल्याचे चित्र दिसत आहे. यामुळे 'ही वसुली आहे की चांडकांना दिलेली लाईफलाईन?' असा थेट प्रश्न नागरिक ना विचारू लागले आहेत.

#### आधी दंडाची नाही, तहसीलदारांची चौकशी करा!

दोन-तीन महिन्यांपासून दंडवसुलीचा गाजावाजा सुरू असताना महसूल विभागाला संबंधितांची मालमत्ता सापडत नव्हती आणि जनमाध्यम ने संपत्ती प्रकाशित करताच अचानक कारवाई सुरू झाली, याबद्दल आश्चर्य व्यक्त केले जात आहे. डिजिटल सातबारा, ई-नोंदणी, उद्योग नोंदी, बँक गहाण माहिती, जीएसटी अभिलेख आणि विविध शासकीय डेटाबेस उपलब्ध असताना मालमत्तांचा शोध लागला नाही, हे सामान्य नागरिकांच्या आकलनापलीकडचे असल्याची प्रतिक्रिया उमटत आहे. म्हणूनच आता '४८ कोटींच्या दंडापेक्षा आधी तहसीलदारांच्या भूमिकेची चौकशी करा' अशी मागणी जोर धरू लागली आहे.

#### ■ 'क्रीम प्रॉपर्टी'वर बोजा नाही; नेमके कोणाचे संरक्षण?

या संपूर्ण प्रकरणातील सर्वात गूढ बाब म्हणजे संबंधितांच्या कथित 'क्रीम प्रॉपर्टी' आजही सुरक्षित असल्याची चर्चा. महसूल विभागाला त्या मालमत्ता दिसल्या नाहीत का? की जाणीवपूर्वक त्यांना हात लावण्यात आला नाही? मालमत्ता निवडताना संबंधितांची संमती घेतली गेली का? असा संतप्त सवाल आता नागरिक विचारत आहेत. 'चांडकांनी दाखविलेल्याच मालमत्तांवर बोजा चढविण्यात आला का?' असा उपरोधिक सवाल आता जनतेतून विचारल्या जात

कारण जर खरोखरच शासनाला ४८ कोटी रुपये वसूल करायचे असतील, तर संबंधितांच्या उद्योगांवर कारवाई, बँक खाती गोठविणे, शासकीय कंत्राटांची देयके जप्त करणे, नवीन कंत्राटांवर बंदी आणणे अशा कठोर उपाययोजना अपेक्षित होत्या. मात्र त्याऐवजी केवळ काही निवडक मालमत्तांवर बोजा चढवून महसूल प्रशासन मोकळे

#### कोट्यवधींची देयके सोडून सातबाऱ्याचा दिखावा?

महसूल वर्तुळात चर्चेनुसार संबंधितांकडे विविध शासकीय विभागांची कोट्यवधी रुपयांची कंत्राटी देयके प्रलंबित असल्याचे बोलले जाते. जर हे सत्य असेल तर महसूल विभागाने सर्वप्रथम ती देयके गोठवून दंड वसुलीकडे वळविणे अपेक्षित होते. याहून महत्त्वाचे म्हणजे दंडाची पूर्ण वसुली होईपर्यंत संबंधितांचे कंत्राटदार म्हणून असलेले नोंदणी परवाने निलंबित करण्याचा पर्यायही प्रशासनाकडे उपलब्ध आहे. मात्र अशा कोणत्याही कारवाईचा मागमूस नाही. उलट एका बाजूला ४८ कोटींचा दंड कायम ठेवायचा आणि दुसऱ्या बाजूला नवीन शासकीय कामांचे दरवाजे खुले ठेवायचे, हा नेमका कोणता न्याय, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत.

#### ■ ४८ कोटी वसूल होतील इतकी मालमत्ता तरी आहे का?

तहसीलदारांनी ज्या मालमत्तांवर बोजा चढविला, त्या मालमत्तांचे बाजारमूल्य किती आहे? त्या मालमत्तांची किंमत ४८ कोटींच्या जवळपास तरी पोहोचते का? याचे उत्तर महसूल विभागाने जनतेसमोर ठेवावे, अशी मागणी होत आहे. कारण जर मालमत्तांचे मूल्यच अपुरे असेल, तर ही कारवाई केवळ कागदोपत्री ठरणार आहे. मग हा बोजा वसुलीसाठी आहे की जनतेची दिशाभूल करण्यासाठी, असा प्रश्न निर्माण होत आहे.

#### एसडीओंची भूमिकाही संशयाच्या भोवऱ्यात-

गाजीपूर येथील आदिवासी जमिनींवर शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय कथित भाडेपट्टे झाल्याचे आरोप अनेक महिन्यांपासून होत आहेत. त्याबाबत तत्कालीन अधिकाऱ्यांनी विधिमंडळातील लक्षवेधीला उत्तर देताना स्पष्ट नमूद केले आहे. तरी मात्र अद्याप जमीन ताब्यात घेण्याचा प्रस्ताव नाही, उद्योग सील नाहीत, अटीभंगाची निर्णायक कारवाई नाही आणि वरिष्ठांकडे ठोस शिफारसही नाही. तर दुसरीकडे उच्च न्यायालयाने दिलेल्या मुदतीनंतर अपील स्वीकारण्यात आल्याची चर्चा असताना आणखी एक गंभीर प्रश्न पुढे आला आहे. जर अपील स्वीकारायचेच होते, तर दंडाच्या रकमेतील काही हिस्सा जमा करण्याची अट का घालण्यात आली नाही? यामुळे अपील प्रक्रिया ही न्यायिक निकषांवर आधारित होती की कोणाला तरी दिलासा देण्यासाठी वापरली गेली, अशी चर्चा महसूल वर्तुळात रंगत आहे. यामुळे एसडीओ कार्यालयाच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

#### जनता विचारतेय : ४८ कोटींची वसुली अडली कुठे?

गेल्या अनेक महिन्यांपासून ४८ कोटींच्या दंडवसुलीचा गाजावाजा सुरू आहे. मात्र उद्योग सुरू आहेत, आर्थिक व्यवहार सुरू आहेत, कंत्राटी कामे सुरू आहेत आणि महसूल प्रशासनाकडून केवळ कागदी कारवाया सुरू आहेत. त्यामुळे '४८ कोटींची वसुली थांबवणारी कायदेशीर अडचण आहे की कोणाचे तरी अदृश्य राजकीय-प्रशासकीय संरक्षण?' असा यक्ष प्रश्न नागरिक विचारत आहेत.

# पाण्याच्या टाकीत सापडलेल्या मृतदेहाचा उलगडा

## अनैतिक संबंधातून हत्या, पत्नीसह प्रियकर जेरबंद

### -डीएनए चाचणी, सीसीटीव्ही आणि तांत्रिक तपासाच्या आधारे तपास







**अमरावती/प्रतिनिधीः-** सुमारे दीड महिन्यांपासून गूढ बनलेल्या खून प्रकरणाचा अखेर अमरावती शहर गुन्हे शाखेने छडा लावत मृत व्यक्तीची ओळख पटवून पत्नी व तिच्या साथीदाराला अटक केली आहे. बंद दवाखान्याच्या छतावरील पाण्याच्या टाकीत सडलेल्या अवस्थेत आढळलेल्या मृतदेहामागे अनैतिक संबंधातून घडलेला खून असल्याचे तपासात समोर आले आहे.

१३ मे २०२६ रोजी नागपुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वजीर पटेल यांच्या बंद दवाखान्याच्या छतावरील पाण्याच्या टाकीत एका अनोळखी पुरुषाचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आला होता. मृतदेहाची अवस्था अत्यंत खराब असल्याने ओळख पटविणे पोलिसांसमोर मोठे आव्हान ठरले होते. याप्रकरणी नागपुरी गेट पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल करून☞(पान २ वर)

# गुपचूप विक्रेत्यावर चाकूहल्ला करणारे आरोपी २४ तासांत जेरबंद

## दोन विधीसंघर्षित बालकांसह तिघांविरुद्ध गुन्हा

**अमरावती/प्रतिनिधीः-** खर्चासाठी पैसे देण्यास नकार दिल्याच्या कारणावरून गुपचूप विक्रेत्यावर जीवघेणा चाकूहल्ला करणाऱ्या आरोपींना फ्रेजरपुरा पोलिसांनी अवघ्या २४ तासांत जेरबंद केले. या प्रकरणात एका आरोपीला अटक करण्यात आली असून दोन विधीसंघर्षित बालकांना ताब्यात घेऊन बाल न्याय मंडळासमोर हजर करण्यात आले आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, व्यंकैयापुरा येथील मुकेश गंगादीप कुशवाह (वय ३५) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार १२ जून रोजी रात्री सुमारे १०.४५ वाजता त्यांचा मुलगा चपराशीपुरा रोडवरील जेल क्वार्टरसमोर गुपचूपच्या गाडीवर उभा होता. त्यावेळी मोटारसायकलवरून आलेल्या रिजवान खान उर्फ छोटू शमी ☞(पान २ वर)

# महिलांसाठी भव्य सायकलिंग डिस्ट्रिक लीग

## सायकलिंग असोसिएशनचे आयोजन

**अमरावती/प्रतिनिधीः-**

अमरावती सायकलींग असोसिएशन, स्पोर्ट अथॉरिटी ऑफ इंडिया, सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया व अस्मिता खेलो इंडिया च्या संयुक्त विद्यमानाने महिलांसाठी शहरात पहिल्यांदा डिस्ट्रिक्ट लीग स्पर्धेचे आयोजन शुक्रवार १९ जून रोजी करण्यात आले असल्याची माहिती आज मंगळवार १६ जून रोजी पत्रकार परिषदेमध्ये आयोजकांनी दिली. त्यांनी सांगितले



की १९ जून रोजी सकाळी ६ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातून स्पर्धा सुरू होणार आहे. १४ वर्ष पेक्षा कमी वयाच्या मुलींसाठी पाच किलोमीटर , १७ वर्ष पेक्षा कमी मुलींसाठी सात किलोमीटर आणि १९ वर्षापेक्षा कमी वयाच्या तरुणींसाठी २० किलोमीटर स्पर्धा ठेवण्यात आलेली आहे. तीन प्रकारांमध्ये स्पर्धा होणार आहे. विजयी स्पर्धकांना प्रमाणपत्र आणि स्मृतिचिन्ह दिले जाणार आहे. हेल्मेट स्पर्धेसाठी☞(पान २ वर)

# तडीपार गुन्हेगाराकडून देशी कट्टा जप्त

## -गुन्हे शाखेची धडक कारवाई, -शस्त्र पुरवठादार फरार




**अमरावती/प्रतिनिधीः-**

शहरात दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने अवैधरित्या देशी कट्टा बाळगून फिरणाऱ्या एका तडीपार सराईत गुन्हेगाराला अमरावती शहर गुन्हे शाखेने अटक केली आहे. आरोपीकडून एक देशी बनावटीचे पिस्तूल आणि दोन जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली असून याप्रकरणी आणखी एका आरोपीचा शोध सुरू आहे.

पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी अवैध शस्त्रे बाळगणाऱ्या आणि गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींविरुद्ध कठोर कारवाईचे आदेश दिल्यानंतर गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल वर आणि दिनेश दहातोंडे यांच्या नेतृत्वाखाली विशेष मोहीम राबविण्यात☞(पान २ वर)

# निलेश विश्वकर्मा यांना निवडणूक विभागाची नोटीस

## गुन्हेगारी माहिती जाहीर न करणे भोवले

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती विधान परिषद निवडणुकीसाठी गुरुवार १८ जून रोजी मतदान होणार आहे. त्यापूर्वी वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार निलेश विश्वकर्मा यांनी स्वतः विरुद्ध दाखल असलेल्या गुन्ह्याची माहिती निवडणूक नियमानुसार प्रसिद्ध न केल्यामुळे निवडणूक विभागाने त्यांना नोटीस बजावली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार उमेदवारांनी आपल्या गुन्हेगारी पार्श्वभूमीची माहिती वृत्तपत्रे व इतर माध्यमातून जाहीर करणे बंधनकारक आहे.



मात्र संबंधित माहिती प्रसिद्ध न केल्याचे निदर्शनास आल्याने निलेश विश्वकर्मा यांना नोटीस देण्यात आली आहे. मतदारांना उमेदवाराविषयी संपूर्ण माहिती मिळणे हा त्यांचा मूलभूत अधिकार असून गुन्हेगारी पार्श्वभूमी लपवणे म्हणजे☞(पान २ वर)

# स्कुटीवरून विदेशी दारूची वाहतूक

## -४४ हजारांचा मुद्देमाल जप्त

**अमरावती/प्रतिनिधीः-**

शहरात अवैधरित्या विदेशी मद्याची वाहतूक करणाऱ्या एका इसमावर राजापेठ पोलिसांनी धडक कारवाई करत विदेशी दारूचा साठा आणि स्कुटीसह एकूण ४४ हजार २५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.



राजापेठ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या आदेशानुसार परिसरात गुन्हेगार तपासणी व अवैध दारूविक्रीविरोधात विशेष मोहीम राबविण्यात येत होती. त्याचदरम्यान १६ जून रोजी पोलीस उपनिरीक्षक मिलिंद हिवरे व डीबी पथक पेट्रोलिंग करत असताना श्री विकास कॉलनी परिसरातून एक व्यक्ती स्कुटीवरून विदेशी दारू घेऊन जात असल्याची गोपनीय माहिती मिळाली. माहितीच्या आधारे पोलिसांनी श्री विकास कॉलनी परिसरात सापळा रचला. संशयित स्कुटीस्वाराला अडवून चौकशी केली असता त्याने आपले नाव प्रणीत ज्ञानेश्वर बगे (वय ५२, रा. म्हाडा कॉलनी, अमरावती) असे सांगितले. त्याच्या ताब्यातील स्कुटीची झडती घेतली असता विविध ब्रँडच्या विदेशी दारूच्या बाटल्या आढळून आल्या. कारवाईदरम्यान पोलिसांनी मॅजिक मोमेंट, ग्लेनवॉक, बॅलेन्टाईन, रॉयल स्टॅग आणि☞(पान २ वर)

# वृद्ध नागरिकाला विष पाजल्या प्रकरणी निष्पक्ष चौकशी करा

## खासदार बोंडे यांच्याकडे मागणी



**खल्लार/प्रतिनिधीः-** विहीगाव येथील ६७ वर्षीय दादाराव भगाजी अभ्यंकर यांना विष पाजल्याप्रकरणी निष्पक्ष चौकशी करून आरोपींविरुद्ध तातडीने कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी मागणी खासदार खासदार अनिल बोंडे व पोलिस प्रशासनाकडे ☞(पान २ वर)

# चिरंजीवी टुरिझमच्या संचालकांकडून पर्यटकांची फसवणूक

## -पत्रकार परिषदेत आरोप




**अमरावती/प्रतिनिधीः-**

चिरंजीवी टुरिझम चे संचालक डॉ. किरण पांडे यांच्यावर पर्यटकांनी दूरव्यवहार आणि आर्थिकरित्या फसवणूक केल्याचा गंभीर आरोप आज मंगळवार १६ जून रोजी झालेल्या पत्रकार परिषदेच्या माध्यमातून केला आहे. पर्यटकांनी सांगितले की २० ते २९ मे पर्यंत मनाली, डलहौसी, रोहतांगपास, अमृतसर या पर्यटन स्थळावर जाण्यासाठी पॅकेज प्रतिव्यक्ती २३ हजार ५०० रुपये चिरंजीवी टुरिझमच्या संचालक किरण पांडे यांनी घेतले होते. या टूरमध्ये वरिष्ठ नागरिक ,महिला आणि मुलांसह १५ लोक सहभागी होते. या पॅकेजमध्ये सर्वकाही टुरिझम कंपनीकडून देण्यात येणार होते. तरीपण २२ मे रोजी अंबाला पोचल्यावर ☞(पान २ वर)

# माती वाहतुकीमुळे वाहनचालकांच्या डोळ्यात धूळ, अपघाताचा धोका वाढला

**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर शहरात सध्या मोठ्या प्रमाणात मातीची वाहतूक सुरू असून अनेक ट्रॅक्टर-ट्रॉली व डंपर खुलेआम नियमांचे उल्लंघन करत असल्याचे चित्र दिसून येत आहे. माती वाहून नेणाऱ्या वाहनांवर कोणतेही संरक्षणात्मक आच्छादन नसल्याने वाऱ्यामुळे माती आणि धुळीचे कण रस्त्यावर उडत आहेत. परिणामी ही धूळ वाहनचालकांच्या व पादचाऱ्यांच्या डोळ्यात जात असून अपघाताची शक्यता वाढली आहे.

विशेषतः दुचाकीस्वारांना या समस्येचा सर्वाधिक त्रास सहन करावा लागत आहे. अचानक डोळ्यात धूळ गेल्यामुळे वाहनावरील नियंत्रण सुटण्याची शक्यता



निर्माण होत असून किरकोळ अपघातांच्या घटनाही घडत असल्याची माहिती नागरिकांनी दिली. तसेच रस्त्यालगतच्या दुकानदारांनाही धुळीमुळे त्रास सहन करावा लागत आहे.

नियमांनुसार माती वाहतूक करणाऱ्या वाहनांवर ताडपत्री ☞(पान २ वर)